सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २७ सप्टेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४० वे अंक ३२७ । पाने १२ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### निर्देशांकाने घेतली ६६६ अंकांची उसळी

**मुंबई :** जागतिक बाजारांतील तेजीच्या प्रभावाने वाहन व बँकिंग क्षेत्रातील दमदार खरेदीच्या बळावर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक



गुरुवारी ६६६ अंकांची उसळी घेत ८५,८३६ या नवीन विक्रमी उंचीवर बंद झाला. दिवसभराच्या सत्रात त्याने ८५,९३० अकांची पातळी गाठली होती. रा□ष्ट्रीय शेअर बाजार निफ्टीत आज सलग सहाव्या दिवशी तेजी राहिली. निफ्टी २११ अंकांनी वधारून २६,२१६ या नवीन विक्रमी पातळीवर बंद झाला. मुंबई शेअर बाजारात आज टाटा मोटर्स, बजाज फिनसर्व्ह, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, टाटा स्टील, जेएसडब्ल्यू स्टील, अल्ट्राटेक सिमेंट, बजाज फायनान्स आणि नेस्लेला सर्वाधिक फायदा झाला. मात्र, एल ॲण्ड टी आणि एनटीपीसीची घसरण झाली.

### काही दृश्ये वगळल्यास 'इमर्जन्सी'ला प्रमाणपत्र

**मुंबई :** सुधारित समितीने सुचवल्याप्रमाणे काही दृश्ये वगळल्यास खासदार कंगना राणावतच्या 'इमर्जन्सी' चित्रपटाला प्रमाणपत्र दिले जाईल, अशी भूमिका सेन्सॉर बोर्डाने मुंबई उच्च




न्यायालयात गुरुवारी घेतली. हा चित्रपट ६ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणार होता. पण, सेन्सॉर बोर्डाने प्रमाणपत्र नाकारल्यामुळे सुरू झालेल्या लढाईत हा चित्रपट रखडला आहे. कंगना या चित्रपटाची सह-निर्माती असून, तिने दिग्दर्शनही केले आहे तसेच चित्रपटात तिने इंदिरा गांधी यांची भूमिकाही पार पाडली आहे. चित्रपटाचे प्रदर्शन रखडवण्यासाठी सेन्सॉर बोर्ड प्रमाणपत्र देण्यासाठी विलंब करीत असल्याचा आरोप तिने केला आहे. ऐतिहासिक तथ्ये चुकीच्या पद्धतीने दाखवण्यात आली व समुदायाचे चित्रही चुकीचे रंगवण्यात आले, असा आरोप करीत शिरोमणी अकाली दलासह काही शीख संघटनांनी आक्षेप घेतल्यानंतर हा चित्रपट वादाच्या भोवऱ्यात अडकला. मागील आठवड्यात झालेल्या सुनावणीत न्या. बी. पी. कुलाबावाला आणि न्या. फिरदोश पुनीवाला यांच्या खंडपीठाने या मुद्यावर निर्णय घेत नसल्याबद्दल सेन्सॉर बोर्डावर ताशेरे ओढले होते.

# किमान मजुरीत वाढ

### केंद्राची सणांपूर्वी भेट

◆ **नवी दिल्ली, २६ सप्टेंबर**

केंद्र सरकारने सणांपूर्वीच कामगारांना विशेषतः असंघटित क्षेत्रातील कामगारांना गुरुवारी मोठी भेट दिली. महागाईमुळे राहणीमानाचा वाढलेला खर्च पाहता केंद्राने असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या मजुरीत वाढ केली. मजुरीचे नवीन दर १ ऑक्टोबरपासून लागू होतील, असे केंद्राने सांगितले.

सरकारने परिवर्तनशील महागाई भत्त्यांत सुधारणा करून किमान मजुरीत वाढ करण्याची घोषणा केली. कामगारांना जगण्याच्या वाढत्या खर्चाचा सामना करण्यास मदत करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला. मध्यवर्ती क्षेत्रातील आस्थापनांमध्ये इमारत बांधकाम, लोडिंग आणि अनलोडिंग, झाडूकाम, साफसफाई, घरकाम, खाणकाम आणि कृषी यासह विविध क्षेत्रांमध्ये गुंतलेल्या कामगारांना सुधारित मजुरी दराचा फायदा होईल. (वृत्तसंस्था)




किमान मजुरीचा दर कौशल्य पातळी- अकुशल, अर्धकुशल कुशल आणि उच्च कुशल तसेच भौगोलिक क्षेत्र ए, बी आणि सीवर आधारित आहेत. दुरुस्तीनंतर झोन एमध्ये बांधकाम, झाडूकाम, साफसफाई, लोडिंग आणि अनलोडिंगमध्ये काम करणाऱ्या अकुशल कामगारांसाठी किमान मजुरीचा दर **७८३ रुपये प्रति दिन** (२०,३५८ रुपये प्रति महिना) आणि अर्धकुशल कामगारांसाठी **८६८ रुपये प्रति दिन** (२२,५६८ रुपये प्रति महिना), कुशल, कारकुनी आणि शस्त्रसज्ज चौकीदारासाठी **१०३५ रुपये प्रति दिन** (२६,९१० ) मजुरी असेल.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पुण्यातील ज्या एस. पी. कॉलेज ग्राऊंडवर गुरुवारी कार्यक्रम होणार होता, त्याची मुसळधार पावसामुळे अशी दुर्दशा झाली. यामुळे मोदी यांचा कार्यक्रम रद्द करावा लागला. त्यानंतर मोदी यांनी आभासी पद्धतीने या कार्यक्रमाला संबोधित केले

# संजय राऊतांना १५ दिवसांचा कारावास

### जामीनही मिळाला

◆ **मुंबई, २६ सप्टेंबर**

भाजपा नेते किरीट सोमय्या यांच्या पत्नी मेधा सोमय्या यांच्या मानहानी प्रकरणात येथील न्यायालयाने उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खा. संजय राऊत यांना १५ दिवसांच्या कारावासाची शिक्षा ठोठावली.

न्यायालयाने संजय राऊत यांची शिक्षा ३० दिवसांसाठी स्थगित करीत त्यांना जामीनही मंजूर केला. प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी आरती कुळकर्णी यांनी राऊत यांना भादंविच्या कलम ५०० अंतर्गत दोषी ठरवले.

न्यायालयाने तुरुंगवासासोबतच त्यांना २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. न्यायालयाने या प्रकरणी निकाल देताच राऊत यांच्या वकिलाने शिक्षा स्थगित करण्यासाठी आणि जामिनासाठी अर्ज सादर केले. न्यायालयाने ते मान्य केले. (वृत्तसंस्था)

### विठुरायाच्या पूजेची आता ऑनलाईन नोंदणी

**सोलापूर :** येत्या १ ऑक्टोबरपासून श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या नित्यपूजा, पाद्यपूजा, तुळशी पूजा, चंदन उटी पूजा यांची नोंदणी सुरू होणार आहे. यापूर्वी १ सप्टेंबरपासून ही ऑनलाईन नोंदणी सुरू होणार, असे मंदिर प्रशासनाने जाहीर केले होते. मात्र, संगणक प्रणाली विकसित करण्यास उशीर झाल्याने १ ऑक्टोबरपासून भाविकांना या सर्व पूजेसाठी ऑनलाईन बुकिंग करता येणार आहे. पूजा वाटपात कायम गैरप्रकार होत असल्याची तक्रार सातत्याने होत होती. प्रशासनाने या गैरप्रकाराला पायबंद घालण्यासाठी पाऊल उचलले आहे.

# तीन स्वदेशी सुपरकॉम्प्युटर्सचे लोकार्पण

### तंत्रज्ञानातील सुधारणा गरिबांच्या सशक्तीकरणासाठी : पंतप्रधान मोदी

◆ **पुणे, २६ सप्टेंबर**

एखाद्या देशाकडे मोठी दृष्टी असेल, तर तो उच्च पातळीचे यश मिळवू शकतो. तंत्रज्ञानातील सुधारणांचा वापर गरिबांच्या सक्षमीकरणासाठी केला पाहिजे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केले. नॅशनल सुपरकॉम्प्युटिंग मिशन अंतर्गत स्वदेशी तंत्रज्ञानातून विकसित केलेल्या तीन परम रुद्र सुपरकॉम्प्युटरचे आभासी स्वरूपात लोकार्पण करताना मोदी संबोधित करीत होते. आजचा भारत शक्यतांच्या अनंत आकाशात नवीन संधी निर्माण करीत आहे, असे त्यांनी सांगितले.

**अन्य महत्त्वाचे मुद्दे**

- भारत स्वतःची सेमीकंडक्टर परिसंस्था तयार करीत आहे. ही जागतिक पुरवठा शृंखलेचा महत्त्वाचा भाग असेल.
- डिजिटल क्रांतीच्या युगात, संगणकीय क्षमता राष्ट्रीय क्षमतेचा पर्याय बनत आहे.
- विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधनाला प्राधान्य देऊन भारत पुढे जात आहे.

तंत्रज्ञानातील संशोधनांचा फायदा सामान्य माणसाला होईल, हे सुनिश्चित करण्यासाठी आमच्या सरकारने पावले उचलली. आम्ही २०१५ मध्ये नॅशनल सुपरकॉम्प्युटिंग मिशन सुरू केले आणि आता क्वांटम कॉम्प्युटिंग तंत्रज्ञानाने आघाडी घेतली आहे, ज्यामुळे आयटी, उत्पादन, एमएसएमई आणि स्टार्टअप्स सुधारण्यास मदत होईल, असे मोदी यांनी सांगितले.

१३० कोटी रुपयांचा निधीतून तयार केलेले तीन सुपरकॉम्प्युटर्स पुणे, दिल्ली आणि कोलकाता येथे अग्रेसर वैज्ञानिक संशोधनासाठी तैनात करण्यात आले आहेत, असे मोदी म्हणाले.

**हवामान संशोधनासाठी संगणकीय प्रणाली**

नरेंद्र मोदी यांच्या हस्ते हवामान संशोधनासाठी तयार केलेल्या ८५० कोटी रुपयांच्या उच्च कार्यक्षमता संगणकीय प्रणालीचे उद्घाटन केले आणि विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील ही खूप मोठी उपलब्धी असल्याचे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# हरित ऊर्जा क्षेत्रात महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षरी

### वीजनिर्मिती, रोजगारात वृद्धी होणार

### ३.४० लाख कोटींची गुंतवणूक येणार

◆ **मुंबई, २६ सप्टेंबर**

राज्य सरकारने गुरुवारी हरित ऊर्जा क्षेत्रात महत्त्वाचे सामंजस्य करार केले आहेत. या करारांमुळे राज्यात ९० हजार रोजगार, ५६ हजार मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे आणि २.९३ लाख कोटींची गुंतवणूक प्राप्त होणार आहे.



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याची माहिती दिली. ते म्हणाले, पंप स्टोरेज स्कीमच्या अर्थात् पीएसपीच्या क्षेत्रातील महत्त्वाच्या सामंज्यस्य करारांवर गुरुवारी सरकारने स्वाक्षऱ्या केल्या. यात जवळपास १५ हजार मेगावॅट वीजनिर्मिती, ८२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक मिळणार आहेत. तीन भागात आम्ही हे करार केले आहेत, यात एकट्या पीएसपीच्या क्षेत्रात महाराष्ट्राने पाच करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. त्यातून ५६ हजार मेगावॅट वीज अर्थात् क्लीन एनर्जी, ग्रीन एनर्जी महाराष्ट्राला मिळणार आहे. यात जवळपास २ लाख ९३ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे तसेच ९० हजार लोकांना यातून रोजगार मिळणार आहे.

**४७ हजार कोटींची गुंतवणूक**

इतरही अनेक सामंजस्य करारांवर आम्ही स्वाक्षऱ्या केल्या आहेत. यात सोलर ऊर्जा, विंड एनर्जी, ग्रीन हायड्रोजन एनर्जीचा समावेश असणार आहे. यात सुमारे ४७ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. १८ हजार लोकांना यातून रोजगार मिळणार आहे तर सुमारे साडेपाच हजार मेगावॅट ग्रीन एनर्जी यातून उपलब्ध होणार आहे. (वृत्तसंस्था)

# केरळ हायकोर्टाच्या मुख्य न्यायाधीशपदी निधी जमादार आरूढ

**तिरुवनंतपुरम्, २६ सप्टेंबर**

मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती निधी मधुकर जमादार यांनी गुरुवारी राजभवनात केरळ उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश म्हणून शपथ घेतली.



राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी त्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. न्या. जमादार यांना सर्वोच्च न्यायालयाच्या निवड मंडळाने पदोन्नती देऊन केरळ हायकोर्टात पाठविले होते.

न्या. जमादार यांची २१ सप्टेंबर रोजी उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. न्या. ए. जे. देसाई मुख्य न्यायाधीश म्हणून निवृत्त झाल्यानंतर न्या. ए. मोहम्मद मुस्ताक यांच्याकडे हंगामी मुख्य न्यायाधीश म्हणून जबाबदारी सोपविली होती.

जमादार या प्रशासकीय आणि घटनात्मक कायद्यात तज्ज्ञ आहेत. त्यांनी सार्वजनिक संस्थांचे प्रतिनिधित्व केले आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या संगणकीकरणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.

# सिंहगड कॉलेजमध्ये सराईत गुन्हेगार व त्याच्या साथीदारांचा धुडगूस

### घरगुती कारणावरून सुरु झालेल्या भांडणात कॉलेजच्या शिपायाला चाकूने भोकसले

### गुरुवारी दुपारी चारची घटना

### कॉलेजचे प्रशासन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात ठाण मांडून

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर -**

सोलापूर-पुणे महामार्गावरील नविन पूना नाक्याजवळील सिंहगड कॉलेजमध्ये सराईत गुन्हेगार व त्याच्या साथीदारांनी धुडगूस घालत कॉलेजच्या शिपायाला चाकूने भोकसले. घरगुती वादातून सुरु झालेल्या भांडामध्ये कॉलेजमधील शिपाई आल्याने त्याला भोकसण्यात आले. ही घटना गुरुवारी दुपारी चारच्या सुमारास घडली असून जखमींवर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान, सिंहगड कॉलेजचे प्रशासन हे रात्री उशिरापर्यंत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात ठाण मांडून असून याबाबत गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरु होते.

प्रकाश दत्तू माळी (वय ३५, रा. सिंहगड कॉलेज कॉटेज, नविन पूना नाका, केगाव, ता. उत्तर सोलापूर) असे जखमीचे नाव असून माळीवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. तर कॉलेजचे दत्तात्रय ईश्वर नवले (रा. सिंहगड कॉलेज) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अमोघ कुलकर्णी, दीपक गरड, रोहित वाडेकर, रोहित मंडलिक, गणेश कोडे, शुभम भोईट, संजय उफाडे, श्रीकांत वाघमोडे, अरमान शेख (सर्व रा. बाळे) यांच्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा दाखल झालेल्यांपैकी संजय उफाडे याची बहिण ही सिंहगड कॉलेजमधील कॅन्टीनमध्ये काम करते. ती बहिण उफाडेला खर्चापाण्यासाठी पैसे देत असते. या महिन्यात बहिणीने उफाडेला पैसे दिले नव्हते. त्यामुळे चिडून गुरुवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास संजय उफाडे हा आपल्या साथीदारांना अमोघ कुलकर्णी याच्या क्रुझर जीपगाडी व एका दुचाकीवर घेऊन कॉलेजच्या कॅन्टीनमध्ये गेला होता. त्याठिकाणी उफाडे व त्याच्या बहिणीमध्ये वादावादी होऊ लागल्याने ते एकमेकांना मोठमाठ्याने बोलून भांडू लागले. त्यावेळी कॉलेजमधील शिपाई प्रकाश माळी व इतर प्राध्यापकांनी उफाडे यास तुमचा वाद घरगुती असल्यामुळे कॉलेजमध्ये भांडू नका असे सांगितले. त्यावेळी चिडलेल्या उफाड व त्याच्या साथीदारांनी शिपाई प्रकाश माळी व इतर प्राध्यापकांना शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांची मोठी गर्दी जमल्याने उफाड याने त्याच्याकडील चाकूने शिपाई प्रकाश माळी याच्या पोटात उजव्या बाजूस (पान २ वर)

# महाराष्ट्रात भाजपाच क्रमांक एकचा पक्ष

### फडणवीस यांना विश्वास

### राष्ट्रवादी काँग्रेसविषयीच्या नाराजीचा मोठा खुलासा

**मुंबई, २६ सप्टेंबर**

लोकसभा निवडणुकीच्या निकालावरून अनेकजण भाजपा कमजोर पडल्याचे बोलत आहेत. प्रत्यक्षात निकालाच्या सर्व विश्लेषणांनी भाजपाच देशात आणि राज्यात सर्वांत मोठा पक्ष असल्याचे स्पष्ट झाले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीतही भाजपाच क्रमांक एकचा पक्ष राहील, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

एका इंग्रजी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत फडणवीस यांनी अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर आपली भूमिका स्पष्ट केली. राष्ट्रवादी काँग्रेसला सोबत घेतल्याने भाजपाचे मतदार नाराज झाले, याविषयी फडणवीस म्हणाले की, ज्या प्रमाणात राष्ट्रवादी काँग्रेसची मते आमच्याकडे वळायला हवी होती, तितक्या प्रमाणात वळली नाहीत. ती मते विभाजित झाल्याने भाजपाची लोकसभा निवडणुकीतील कामगिरी सुमार राहिली. आम्ही राष्ट्रवादी काँग्रेसला सोबत घेतले ते आमच्या मतदारांना आवडले नाही. आम्ही जेव्हा परिस्थिती त्यांच्यासमोर ठेवली, तेव्हा ते आमच्यासाबेत आले. आमच्या मतदारांच्या हे लक्षात आले की, राजकारणात अशी परिस्थिती अनेकदा उद्भवते, जेव्हा तडजोड करावी लागते. आज मी विश्वासाने सांगू शकतो की, आम्ही १०० नाही, पण ८० टक्के लोकांना समजावण्यात यशस्वी झालो आहोत.

# 'काय झाडी, काय डोंगर...एकदम ओक्के!'

### फिरण्यासाठी हवी निसर्गाची सोबत

◆ **नागपूर, २६ सप्टेंबर**

शिवसेनेची मुलूख मैदानी तोफ म्हणवले जाणारे आमदार शहाजी बापू पाटील यांच्या 'काय झाडी, काय डोंगर' या वाक्याने काही वर्षांपूर्वी अख्ख्या महाराष्ट्राला जणू भुरळ घातली होती. मुळात, यातील राजकारण हा भाग बाजूला ठेवला तर, पर्यटन हा विषयच मुळात मन प्रसन्न करणारा आणि एका वेगळ्या जगात घेऊन जाणारा असतो. म्हणूनच आता वर्षातून किमान एकदा तरी लांब कुठेतरी फिरायला जाणे, पर्यटनाला जाणे हा प्रकार वाढीस लागला आहे.



**आज जागतिक पर्यटन दिन**


पर्यटन म्हटले की, आपल्याला आठवते ते मस्त रम्य हिरवीगार निसर्गाची ठिकाणे. प्रत्येक जण आपल्या सोयीनुसार पर्यटनाचा आनंद घेत असतो. २७ सप्टेंबर हा दिवस 'जागतिक पर्यटन दिन' म्हणून साजरा होत असतो.

**प्रत्येक वर्षी २५ टक्क्यांनी वाढ**

ज्यांना मुक्त भटकायची, मनमुराद फिरायची आवड आहे, त्यांची संख्या कमी नाही. त्यामुळे अनेकांनी या आवडीपोटी पर्यटन व्यवस्थापन हे करिअर म्हणून निवडले आहे. क्षेत्रात कारकीर्द करणे सहज शक्य झाले आहे. दळवळणाच्या सुविधा वाढल्याने मुक्तसंचार करणे आता सोपे झाले आहे. देशाच्या कुठल्याही प्रदेशात किंवा परदेशात गमन करण्याकडे अलिकडे लोकांचा कल वाढू लागला आहे. पर्यटन या क्षेत्रात प्रत्येक वर्षी २५ टक्क्यांनी वाढ होते. पर्यटन व्यवस्थापन आणि नियोजन या अभ्यास शाखाही आता महाविद्यालयीन शिक्षणात आल्या आहेत. अनेक परदेशी पर्यटन कंपन्या या क्षेत्रात गुंतवणूक करत आहेत. देशातही मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो आहे. (तभा वृत्तसेवा)

**कधी झाली जागतिक पर्यटन दिवसाची सुरुवात?**

जागतिक पर्यटन दिवसाची सुरुवात १९७० पासून संयुक्त राष्ट्राच्या जागतिक पर्यटन संस्थेद्वारे केली गेली. त्यानंतर २७ सप्टेंबर १९८० रोजी पहिला जागतिक पर्यटन दिन साजरा करण्यात आला. तेव्हापासून दरवर्षी २७ सप्टेंबर रोजी जागतिक पर्यटन दिन साजरा करण्यात येतो. पर्यटनाला चालना देणे हा, जागतिक पर्यटन दिवस साजरा करण्यामागचा उद्देश आहे. या माध्यमातून रोजगार निर्मिती होऊ शकेल. लोक जेव्हा फिरायला जातात, तेव्हा तेथेच राहतात, खातात आणि खरेदीही करतात. यामुळे पर्यटन आणि रोजगारालाही चालना मिळते.





## मंद्रुपमधील महादेव नवरात्रोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी संतोष कुंभार

**मंद्रुप, २६ सप्टेंबर -**



कुंभार गल्ली येथील श्री महादेव नवरात्र महोत्सव मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा गणेश मंदिर येथे झाली. यावेळी सर्वानुमते संतोष कुंभार यांची अध्यक्षपदी, उपाध्यक्षपदी अप्पाशा परीट, राजू पंडित तर सचिवपदी अभिषेक पोतदार, सहसचिवपदी शरणप्पा कांबळे, कार्याध्यक्षपदी मल्लू लोभे व खजिनदारपदी रमेश सुतार यांची निवड करण्यात आली. प्रास्ताविक विकास शिळ्ळे यांनी केले तर प्रकाश कुंभार व महेश लोभे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी राजकुमार कुंभार, शिवानंद लोभे, आप्पासाहेब शिळ्ळे, रवी कुंभार, उमेश कुंभार यांच्यासह नागनाथ कुंभार, महादेव लोभे, श्रीशैल कुंभार, सुभाष सुतार, राहुल शिवणकर, प्रवीण कुंभार, मल्लू घाले, गोटू जोडमोटे, सिध्दू परीट, दयानंद कुंभार, गोटू लोभे, चिदानंद लोभे, काशिनाथ कुंभार, विशाल केवटे, सुभाष लोभे यांची उपस्थिती होती.



## हगलूर येथे शालेय साहित्यांचे वाटप

**मोहोळ, दि. २६ सप्टेंबर-**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले महिला आघाडीच्या राष्ट्रीय नेत्या सीमाताई रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त संस्कार संजीवनी फाऊंडेशन हगलूर सोलापूर येथे सीमाई बहुउद्देशीय सामाजिक संस्था हिवरे यांच्या वतीने ५० मुलांना शालेय साहित्य, गृहोपयोगी वस्तू व खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किरण कांबळे, महेश बनसोडे, विनोबा गामाजी, संस्कार संजीवनी फाऊंडेशनचे अध्यक्ष परमेश्वर काळे व आश्रमाचे कर्मचारी विशाल काळे उपस्थित होते. सूत्रसंचालन परमेश्वर काळे यांनी तर आभार विनोबा गामाजी यांनी मानले.



## विजयलक्ष्मी सखी प्रोड्युसर कंपनीची वार्षिक सभा खेळीमेळीत

**अणदूर, दि. २६ सप्टेंबर-**

मराठवाडा जिल्हा परिवर्तन मॉडेल अंतर्गत स्वयंशिक्षण प्रयोग व हिंदुस्थान युनिलिव्हर फाउंडेशनच्या विद्यमाने विजयलक्ष्मी सखी प्रोड्युसर कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा मोठ्या उत्साहात पडली. या सभेस नसीम शेख स्वयं शिक्षण प्रयोग, मरवाळीकर कृषी विज्ञान केंद्र, गणेश चादरे टाटा इन्सटिट्यूट, शितल गुंड, गोदावरी क्षीरसागर व चेअरमन अर्चना भोसले तसेच डायरेक्टर वैशाली शिंदे, वैशाली घुगे, सुरेखा कानडे, कल्पना कदम यांनी मार्गदर्शन केले. नसीम शेख यांनी सभासदांना सोयाबीन खरेदी-विक्रीसाठी प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. शेतीसाठी लागणारे बी-बियाणे तसेच साहित्य कंपनीमार्फत खरेदीसाठी आवाहन केले. सुरेखा कानडे यांनी प्रास्ताविक केले. अर्चना भोसले यांनी कंपनीची उलाढाल मांडली. पल्लवी जामगावकर यांनी सभासद व त्यांना होणारे फायदे याबद्दल मार्गदर्शन केले. वैशाली घुगे यांनी सूत्रसंचालन केले. वैशाली शिंदे यांनी आभार मानले.

## सिंहगड कॉलेजमध्ये सराईत...

**पान १ वरून...**

चाकूने भोकसले. त्यामुळे कॉलेज आवारात जमलेल्या गर्दीने उफाड व त्याच्या साथीदारांना पकडून चोपले व पोलिसांना याबाबत माहिती दिली.

याची माहिती मिळताच फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अरविंद माने, विकास देशमुख, सहायक पोलिस निरीक्षक शंकर धायगुडे यांच्यासह पोलिस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमी झालेल्या शिपाई प्रकाश माळी यास पोलिसांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले असून त्याची प्रकृती स्थिर आहे. दरम्यान, फौजदार चावडी पोलिस ठाण्यात कॉलेज प्रशासन आणि विद्यार्थ्यांनी गर्दी करून मारहाण करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली. त्यानुसार फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरु होते.

**संजय उफाडे हा सराईत गुन्हेगार**

बाळे परिसरात राहणारा संजय उफाडे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात अनेक गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. उफाडे याने गुरुवारी दुपारी फोनवर एका तरूणास शिवीगाळ करून ठार मारण्याची धमकी दिली असून याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर उफाडे याने गुरुवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास सिंहगड कॉलेजमध्ये जाऊन हा प्रकार केल्याचे समजते. उफाडे याचा अवैध दारूचा धंदा असल्याचेही समजते. तसेच उफाडे याने या परिसरातील अनेक जागांवरही अतिक्रमण करून कब्जा केल्याचे समजते. याबाबत पालिकेच्या अतिक्रमण विभागाकडेही अनेक जागामालकांनी अर्ज दिलेले असून त्यावर कोणतीही कारवाई झालेली नसल्याचे समजते. या प्रकाराची माहिती समजल्यानंतरही फौजदार चावडी पोलिस ठाण्यामध्ये अनेक राजकीय लोकांनी जाऊन किंवा फोन करून मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

### विद्यार्थ्यांची सुरक्षा वाऱ्यावर का...

संजय उफाडे याने आपल्या साथीदारांना घेऊन कॉलेजमध्ये जाऊन त्यानंतर झालेल्या वादावादीत कॉलेजच्या शिपायाला चाकूने भोकसले. हीच घटना कॉलेजच्या कोणत्याही विद्यार्थ्याच्या बाबतीत घडली असती तर असा प्रश्न येथे निर्माण होतो. त्यावरून कॉलेज प्रशासनाकडून विद्यार्थ्यांची सुरक्षा वाऱ्यावर सोडली आहे का असाही प्रश्न उपस्थित होतो. कॉलेजच्या मुख्य गेटमधून उफाडे आपल्या साथीदारांसह क्रुझर जीपमधून आतमध्ये येतो आणि हा प्रकार घडतो. त्यामुळे कॉलेजमध्ये येणाऱ्या-जाणाऱ्यांची चौकशी होते की नाही असा प्रश्न नागरीकांमधून उपस्थित होतो.

# ऐन पावसात सोयाबीनवर मोझॅक विषाणूचा हल्ला

**● वैराग परिसरातील शेतकऱ्यांचे मोडले कंबरडे; शेंगांची संख्या घटण्याची भीती**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २६ सप्टेंबर-**



बार्शी तालुक्यामधील वैराग भागामध्ये सोयाबीन पिकावर पिवळा मोझॅक या विषाणूजन्य रोगाने मोठ्या प्रमाणावर ॲटक केल्याचे दिसून येत असून अशातच परतीच्या मुसळधार पावसाने सोयाबीन पिकाचे मात्रे होऊ लागले आहे. त्यामुळे सोयाबीन पीक हे दुहेरी संकटात सापडले असून याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसणार आहे.

या रोगामुळे सोयाबीनचे उत्पन्न घटणार आहे. या रोगामुळे सोयाबीनच्या शेंगा टचबाज भरणार नसून त्या पोचट राहणार आहेत. त्यामुळे पर्यायाने उत्पन्न घटणार आहे. या रोगामुळे पिकाचे ७० ते ९० टक्क्यापर्यंत नुकसान होऊ शकते. २० दिवसांचा पावसाचा खंड पडला व नंतर पाऊस पडला तर सोयाबीनचे पीक पिवळे दिसायला लागते. म्हणजे येलो मोझॅकची लक्षणे दिसायला लागतात. सुरुवातीला रोगग्रस्त झाडावरील पानांच्या शिरांमधील भागावर फिकट निस्तेज, पिवळे ठिपके दिसतात. कालांतराने ठिपक्यांच्या आकारमानात वाढ होऊन संपूर्ण पान पिवळे पडून त्यातील हरितद्रव्याचा ऱ्हास होतो. अशा पिवळ्या पानांवर तांबूस-करपट रंगाचे ठिपके दिसतात. रोगग्रस्त विषाणू झाडांवरील पाने अरुंद व वेडीवाकडी होऊन त्यांचा आकार लहान होतो. रोगग्रस्त झाडांवरील शेंगांची संख्या कमी होऊन त्यात लहान आकाराचे दाने भरतात किंवा संपूर्ण शेंगा दाणेविरहीत व पोचट होतात आणि पर्यायाने उत्पादनात लक्षणीय अशी घट येते. या येलो मोझॅक रोगामुळे लवकरच सोयाबीनची पाने गळू लागली आहेत. अशातच पावसाचा जोर वाढत चालला आहे. पाने गळाल्यामुळे पिकाच्या कांड्या राहिल्या असून दररोज पाऊस पडत असल्यामुळे सोयाबीनची काढणी करणे शेतकऱ्यांना मुश्कील झाले आहे. पावसामुळे मजुरांची मजुरी वाढत चाललेली आहे. एक एकर सोयाबीन काढणीला मजूर ६ हजार रूपये मागू लागले आहेत. येलो मोझॅकमुळे घटलेले उत्पन्न, वाढलेली मजुरी त्यामुळे इकडे आड, तिकडे विहीर अशी शेतकऱ्यांची अवस्था झालेली आहे.

### पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान

सोयाबीनचे पीक काढणीला येताच परतीच्या पावसाने सोलापूर जिल्ह्यात धुमाकूळ घातला आहे. हाता तोंडाशी आलेले पीक पुन्हा पाण्याखाली गेले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. तर आणखी पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवल्याने बळीराजा धास्तावला असून तोंडचे पाणी पळाले आहे. एकीकडे येलो मोझॅकमुळे सोयाबीनच्या उत्पन्नात घट होणार असे असताना तर दुसरीकडे पावसाने सोयाबीन कुजून वाहून जाणार अशी अवस्था सोयाबीन पिकाची झालेली पहावयास मिळत आहे.

# सत्ता नसल्याने विकासकामांना मोठ्या अडचणी

**● खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांची खंत; पिलीव परिसरातील नागरिकांतर्फे सत्कार**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २६ सप्टेंबर-**



महाराष्ट्रात व केंद्रात आपल्या विचाराची सत्ता नसल्यामुळे विकासकामांना अडचणी येत आहेत. तरीही जनतेचे मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार आहे. आपली सत्ता नसल्यामुळे अधिकारीसुद्धा म्हणावा तसा प्रतिसाद देत नाहीत, अशी खंत व्यक्त करत म्हसवड-पंढरपूर रोडचे अर्धवट काम, पुलाची अर्धवट कामे, दुष्काळी पट्ट्यातील गावाला नीरा देवधरचे पाणी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सांगितले.

पिलीव परिसरातील नागरिकांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. पिलीव पेठेतून वाजत-गाजत उघड्या जीपमधून त्यांची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती संग्रामसिंह जहागिरदार, माजी सरपंच दादासाहेब शिंगाडे यांच्या सहकार्याने जहागिरदार पार्टी, संग्राम दोस्ती मंडळ, संग्रामराजे प्रतिष्ठान, विविध सामाजिक व गणेश मंडळे, बचेरी, झिंजेवस्ती, कुसमोड, शिंगोर्णी, सुळेवाडी, चांदापुरी, पठाणवस्ती ग्रामपंचायत व नागरिकांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक माजी जि. प. सदस्य गणेश पाटील यांनी केले. माजी जि. प. सदस्य गणेश पाटील, नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण, दामोदर लोखंडे, माजी सरपंच नितीन मोहिते, ॲड. विजय पवार, हरिश्चंद्र मगर, चंद्रकांत जाधव, दादासाहेब शिंगाडे, नानासाहेब मदने, माजी सरपंच अमोल मदने, कुमार भैस, संतोष पडळकर, अविनाश जेऊरकर, मोहन करांडे, सरपंच राहुल जावळे, शिवाजी सावळजकर, राजेंद्र करांडे, मोहसीन शेख, रणधिरसिंग जामदार, तानाजी लोखंडे, समशेरसिंग रजपूत, दुर्योधन सोलंकर, भानुदास सुळे, सचिन मदने यांच्यासह पदाधिकारी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती संग्रामसिंह जहागीरदार यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. माजी सरपंच नितीन मोहिते यांनी आभार मानले.

## देव दर्शनासाठी गेलेल्या चौघांचा अपघातात जागीच मृत्यू

**विजयपूर, दि. २६ सप्टेंबर-**

देव दर्शनासाठी गेलेल्यांचा अपघातामध्ये चौघांचा मृत्यू झाल्याची घटना हुनगुंद तालुक्यातील धन्नूर गावाजवळ घडली.





विजयपूर जिल्ह्यातील मुद्देबिहाळ शहरातील महांतेश नगर येथील रहिवासी रामण्णा नायकमक्कळ (वय ५७), लक्ष्मण वड्डर (वय ५५), बैलप्पा बिरादर (वय ४६), मुहम्मद रफीक (वय २३) अशी मृतांची नावे आहेत. मयत होस्पेट येथील हुलीगेम्मा देवीचे दर्शन करून कारने परतत असताना हुनगुंद तालुक्यातील धन्नूर गावच्या टोलनाक्याजवळ मुद्देबिहाळकडून येणाऱ्या एका ट्रकला धडक बसून भीषण अपघात झाला. कारमधील चार जणांचा मृत्यू झाला. दोन्ही वाहनांच्या धडकेमुळे कारचा पुढील भाग पूर्णपणे चक्काचूर झाला तर ट्रक रस्ता सोडून शेजारच्या शेतात पडला. धन्नूरजवळ मध्यरात्री २.१० वाजता ही ट्रक टोल नाका पास केल्याची माहिती मिळाली आहे. हुनगुंद पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले आहे.



## अणदूर येथे रेखाकला ग्रेड परीक्षा सुरू

**अणदूर, दि. २६ सप्टेंबर-**

अणदूर येथील जवाहर विद्यालय येथे २५ सप्टेंबरपासून शासकीय रेखाकला ग्रेड परीक्षा सुरू झाल्या. शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचलित जवाहर विद्यालयला ह्या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांनी केंद्र मान्यता दिली आहे. शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव रामचंद्र आलुरे, ग्रा. प. सदस्य बालाजी घुगे, मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी, कैलास बोंगरगे यांनी केंद्राचे नियमानुसार उद्घाटन फित कापून केले. अणदूर केंद्रांतर्गत जवाहर विद्यालय, अणदूर, संत विनोबा भावे विद्यालय, खुदावाडी, साने गुरुजी विद्यालय, केशेगाव येथील ४७० विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. पहिल्या दिवशी २७५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. केंद्र संचालक म्हणून गोपाळ कुलकर्णी, केंद्रप्रमुख किरण गायकवाड आदी उपस्थित होते.

## महांतेश्वर प्रशालेस निर्भया पथकाची भेट

**अक्कलकोट :** इब्राहिमपूर येथील श्री महांतेश्वर प्रशालेला निर्भया पथकांनी भेट दिली. विभागीय पोलीस अधिकारी विलास यामवार यांनी मार्गदर्शन केले. निर्भया पथक प्रमुख निलेश बागव, महिला अंमलदार मियावाले, गाजरे व मोमीन यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी संस्थेचे संचालक शरणप्पा बिराजदार, मुख्याध्यापक बी. एन. हिरेमठ, आर. बी. शेरीकर, जी. आर. जालवादी, पीआय कल्याणी, प्रशांत बिराजदार, संजय पाटील, एस. बी. विरक्तमठ व काशिनाथ किरनळ्ळी आदी उपस्थित होते.

## तिकोटा येथे विजेच्या धक्क्याने सख्ख्या भावंडांचा जागीच मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**विजयपूर, दि. २६ सप्टेंबर-**



जिल्ह्यातील तिकोटा तालुक्यातील बाबानगर गावात द्राक्ष बागेत काम करत असताना विजेचा धक्का लागून श्रीकांत दुंडप्पा विजापूर (वय २९) व राजकुमार दुंडप्पा विजपूर (वय ३१) या दोघा भावांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

शेतातील डीपीमधून बोअरवेलला वीजपुरवठा करणाऱ्या वायरमुळे विजेचा शॉक लागल्याने श्रीकांत खाली पडला. हा प्रकार लक्षात येताच त्याचा भाऊ राजकुमार त्यास सोडवण्यासाठी गेले असता त्यालाही विजेचा धक्का बसला आणि दोघांचाही जागीच मृत्यू झाला. तिकोटा पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. श्रीकांत व राजकुमार नेहमीच शेतामध्ये एकत्र काम करायचे. त्यांच्यात फारच एकी होती. दोघेही काम करताना एकमेकांशी भविष्यातील नियोजनाबाबत चर्चा करत होते. दरम्यान श्रीकांतला तारेचा स्पर्श झाला आणि ते खाली कोसळले. वाचवण्यासाठी गेलेल्या भावाचाही यातच मृत्यू झाला.

# जिल्ह्यातील जलजीवनची कामे ठप्प

**● चौकशीच्या नावाखाली बिलांची अडवणूक; कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन हतबल**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप,दि. २६ सप्टेंबर-**



जलजीवन मिशनची कामे करताना येणाऱ्या विविध अडचणीकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्यामुळे व ठेकेदारांना आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. ग्रामीण पाणीपुरवठा कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनने २० सप्टेंबरपासून कामबंद आंदोलन सुरू केले आहे.

जिल्ह्यातील जलजीवन मिशनची कामे ठप्प झाल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना वेठीस धरण्याचा प्रकार दिसून येत आहे. प्रशासनाच्या असहकार्यामुळे ठेकेदार मात्र आर्थिक कोंडीत सापडले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हर घर जल मिशन पूर्ण होण्यासाठी जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजना सुरू करण्यात आली. मात्र जलजीवन मिशनची कामे सुरू असताना प्रशासनाकडून विविध कारणाने ठेकेदारांना त्रास देण्याचा प्रयत्न होत आहे. चौकशीच्या नावाखाली कामाची बिल अडवणूक करून प्रशासनाकडून ठेकेदारांना त्रास देण्यात येत आहे. ६४ गावांतील जलजीवन मिशनची कामे पूर्ण झाल्यानंतरही वेळेवर बिल मिळत नसल्याने ठेकेदारांची उपासमार सुरू आहे. जिल्ह्यात पूर्ण झालेल्या कामांसाठी ६० कोटी रूपये निधीची गरज असताना शासनाकडून केवळ ७ कोटी रूपये मिळाली आहेत. जिल्ह्याला पुरेसा निधी आणण्यासाठी वाली नसल्याने निधी उपलब्ध होत नाही. त्यामुळे ठेकेदारांवर कामबंद करण्याची वेळ आली आहे. जिल्ह्यातील ६४ गावां तील जलजीवन मिशनची कामे चौकशीच्या नावाखाली बंद आहेत. म्हणून प्रशासनाला निवेदन देऊन बिल देण्याची मागणी केली होती. मात्र प्रशासनाने निवेदनाची दखल न घेतल्याने २० सप्टेंबरपासून ठेकेदारांकडून जलजीवन मिशनची पाणीपुरवठा योजनेचे कामबंद आंदोलन सुरू आहे.



**चौकशीच्या नावाखाली अडवणूक करण्यात आलेली देयके व जिल्ह्याला पुरेसा निधी मिळेपर्यंत जलजीवन मिशनचे कामबंद आंदोलन सुरू राहणार आहे. प्रशासनाने ठेकेदारांच्या अडचणी जाणून घेऊन त्वरित बिल अदा करावे.**
**-मोतीलाल राठोड, जिल्हाध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा कॉन्टॅक्टर्स असोसिएशन**

# ‘कर्मयोगी आबासाहेब’ चित्रपटाला प्रदर्शनापूर्वीच आंतरराष्ट्रीय पुरस्कार

**स्व. गणपतराव देशमुखांवर चित्रपट; दिग्दर्शक अल्ताफ शेख आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २६ सप्टेंबर-**



सांगोला मतदारसंघाचे तब्बल अकरावेळा आमदार आणि कॅबिनेट मंत्री म्हणून काम केलेले स्व. गणपतराव उर्फ आबासाहेब देशमुख यांच्या जीवन चरित्रावर ‘कर्मयोगी आबासाहेब’ हा चित्रपट तयार करण्यात आला असून या चित्रपटाला आंतरराष्ट्रीय दर्जाचा पुरस्कार मिळाला आहे. तर लेखक, दिग्दर्शक अल्ताफ शेख यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कर्मयोगी आबासाहेब चित्रपटाची इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलमध्ये निवड झाली आहे. साऊथ आफ्रिका येथे कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाचे स्क्रीनिंग झाले. यावेळी वाणिज्य दुत पनामा, हेड ऑफ रीजन मेरीटाईम ऑथरिटी जिजस कॅंपोस, डॉ. अमजदखान, नाशिकच्या विभागीय आयुक्त संगीता धायगुडे यांच्या हस्ते अल्ताफ शेख यांना सन्मानित करण्यात आले. मायाक्का माऊली फिल्म प्रोडक्शन आणि मुंबई किएशन एंटरटेनमेंट निर्मित कर्मयोगी आबासाहेब चित्रपटाचे बाळासाहेब एरंडे व मारुती बनकर हे निर्माते असून २५ ऑक्टोबरला जगभर हिंदी आणि मराठी भाषेत रिलीज होत आहे. प्रमुख भूमिका अभिनेता अनिकेत विश्वासराव साकारत असून हर्षद जोशी, विजय पाटकर, अभिनेत्री देविका दप्तरदार, निकिता सुखदेव, सैराटफेम अरबाज शेख, तानाजी गुलगुंडे, अहमद देशमुख, सुरेश विश्वकर्मा, प्रदीप वेलणकर, अनिल नगरकर, प्रतीक प्रताप (छोटा पुढारी) घनश्याम दरोडे, वृंदा बाळ यांच्या भूमिका आहेत. अवधूत गुप्ते यांनी संगीत दिले आहे, तर चित्रपटातील गाणी बॉलीवूड सिंगर कुणाल गांजावाला आणि मनीष राजणे यांनी गायली आहेत. छाया चित्रकार कुमार डोंगरे, स्टील फोटोग्राफर राजेंद्र कोरे, वेशभूषा संगीता चौरे व पोर्णिमा मराठे, एक्झिक्युटिव्ह प्रोड्यूसर अमजदखान शेख, प्रोडक्शन कंट्रोल (सफर) उर्फ सय्यद दादासो शेख, पोस्ट प्रोडक्शन मॅनेजिंग अविनाश जाधव तर या चित्रपटासाठी विशेष सहकार्य उल्हास धायगुडे पाटील यांनी केले आहे.

### प्रथमच धनगरी ओव्या हिंदीतून

मी सातवीत असताना स्वर्गीय आबासाहेबांनी मला तू खूप मोठा होशील असा आशीर्वाद दिला होता. त्यानंतर २५ वर्षांनी मी आबासाहेबांच्या जीवन चरित्रावर चित्रपटचे लिखाण केले हा एक योगायोग आहे. या चित्रपटांमध्ये आबासाहेबांनी आयुष्यभर सर्वसामान्य जनतेची निष्कलंक सेवा केली. आबासाहेबांना कधीच तमाशा, चित्रपट बघण्याचा छंद नव्हता तर ते गावगाड्यातील जत्रा-यात्रांमध्ये सामील होत असत. त्यामुळे त्यांना धनगरी ओवी ऐकण्याचा आणि बघण्याचा प्रचंड छंद होता तर या चित्रपटांमध्ये पहिल्यांदा हिंदीतून धनगरी ओवी गायन केली आहे.

**- अल्ताफ दादासाहेब शेख, लेखक, दिग्दर्शक**




## नळदुर्ग येथे बोरी धरण ओव्हर फ्लो पाण्याचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २६ सप्टेंबर-**

परतीच्या पावसाने दमदार हजेरी लावल्यामुळे नळदुर्ग येथील बोरी धरण तलाव शंभर टक्के क्षमतेने तुडुंब भरल्यामुळे अणदूर येथील खडकाळी मॉर्निंग ग्रुपच्या वतीने बोरी धरण पाण्याचे पूजन, धरणातील पाण्याची खणा नारळाने ओटी भरून महाआरती करण्यात आली. यावेळी डॉ. जितेंद्र कानडे मार्गदर्शन केले.

बोरी धरण भरल्याने नळदुर्ग, तुळजापूर अणदूरसह अनेक गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार असून हजारो शेतकऱ्यांच्या शेतीसाठी पाणीदेखील उपलब्ध होणार आहे. त्यामुळेच खडकाळी मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी जलपूजनकेले. धरण ओव्हर फ्लो होऊन पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे. या ओव्हर फ्लो पाण्यामुळे एक दोन दिवसात नळदुर्ग येथील ऐतिहासिक किल्लयातील नर-मादी धबधबा सुरू होणार आहे. धबधबा पाहण्यासाठी महाराष्ट्र-कर्नाटक राज्यातील पर्यटकांच्या संख्येत वाढ होणार आहे. जलपूजनप्रसंगी खडकाळी मॉर्निंग ग्रुपचे डॉ. जितेंद्र कानडे, डॉ. नागनाथ कुंभार, डॉ. हरिदास मुंडे, सिद्धाराम धमुरे, बाळकृष्ण पाटील, अविनाश मोकाशे, पत्रकार अजय अणदूरकर, गुरुनाथ कबाडे, चंद्रकांत गुड्ड, प्रसन्न कंदले, बाबू शेख, गुणवंत मुळे, वैजिनाथ कुंभार, प्रा. एम. बी. बिराजदार, सुहास कंदले, संजू मोकाशे, मल्लिकार्जुन नरे, खंडू मुळे, सचिन ढेपेंसह खडकाळी मॉर्निंग ग्रुपचे पदाधिकारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/




# राहुल गांधी भारतीय आहेत की विदेशी?

### उच्च न्यायालयाची केंद्राला विचारणा

◆ **अलाहाबाद, २६ सप्टेंबर**

राहुल गांधी यांच्या नागरिकत्वाची सीबीआय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करणारी जनहित याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. राहुल गांधी हे भारतीय नसून, ब्रिटनचे नागरिक आहेत, असा दावा याचिककर्त्याने केला असून, या प्रकरणी न्यायालयाकडे केंद्र सरकारला माहिती सादर करण्याचा निर्देश दिला आहे.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नागरिकत्वाबद्दल दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर न्या. राजन रॉय आणि न्या. ओम प्रकाश शुक्ला यांच्या खंठपीठासमोर सुनावणी झाली. न्यायालयाने अतिरिक्त महान्यायाभिकर्ता सूर्यभान पांडे यांना असा निर्देश दिला आहे की, केंद्रीय गृह मंत्रालयाकडून यासंदर्भातील माहिती सादर करावी. कर्नाटकातील भाजपा कार्यकर्ते एस. विग्नेश शिशिर यांनी ही जनहित याचिका दाखल केली आहे.

लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी यांना रायबरेली मतदारसंघातून निवडणूक लढवली. त्याला शिशिर यांनी तीन महिन्यापूर्वी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यावेळी दाखल याचिकेत शिशिर यांनी म्हटले होते की, राहुल गांधी हे भारतीय नसून, ब्रिटनचे नागरिक आहेत. त्या आधारावर त्यांचा उमेदवारी अर्ज बाद करण्यात यावा. त्यावेळी न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळली होती. ◀(वृत्तसंस्था)

#### राहुल गांधींच्या नागरिकत्वाबद्दल पुन्हा याचिका

याचिका फेटाळताना न्यायालयाने म्हटले होते की, याचिकाकर्त्याने नागरिकत्व कायद्यानुसार संबंधित प्राधिकरणाकडे तक्रार करावी. त्यावर आता याचिकाकर्त्याने म्हटले आहे की, राहुल गांधी ब्रिटनचे नागरिक असल्याचे माझ्याकडे पुरावे आहेत. प्राधिकरणाकडे दोन वेळा तक्रार केली, पण कोणतीही कार्यवाही केली गेली नाही. त्यामुळे याचिका करीत आहे. सुनावणीत न्यायालयाने नागरिकत्व कायदा १९५५ नुसार केंद्र सरकारच्या संबंधित अधिकाऱ्याकडे केलेल्या तक्रारीवर काय कार्यवाही केली, याबद्दल सविस्तर माहिती सादर करण्याचा आदेश दिला. तसेच केंद्रीय गृह मंत्रालयालाही माहिती सादर करण्यास सांगितले आहे. या प्रकरणात पुढील सुनावणी ३० सप्टेंबर रोजी होणार आहे. ■



उत्तराखंडच्या चमोली जिल्ह्यात गुरुवारी सकाळी हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला. यामुळे वातावरण अधिकच आल्हाददायक झाले होते. शिवाय, निसर्गाचे सौंदर्यही फुलले होते. त्यात बद्रीनाथ धामचा परिसर अधिकच सुंदर दिसत होता

## आता जगन मोहन रेड्डी करणार क्षमायाचना अनुष्ठान

◆ **अमरावती, २६ सप्टेंबर**

तिरुपती लाडू प्रकरणाने सर्वांत जास्त अडचण वायएसआयसीपीचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांची झाली आहे. त्यांनी याचे क्षालन करण्यासाठी २८ सप्टेंबर रोजी राज्यातील मंदिरांमध्ये क्षमायाचना अनुष्ठान करण्याचे जाहीर केले असून, त्यासाठी नागरिकांनी आयोजनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.



आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी काही दिवसांपूर्वी तिरुपती मंदिरातील लाडूमध्ये प्राण्यांची चरबी वापरल्याचा आरोप करून खळबळ उडवून दिली. त्यानंतर देशभरातील धार्मिक संस्थांनी आपल्या प्रसाद व्यवस्थेचा आढावा घेतला. माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांच्या कार्यकाळात हा प्रकार झाल्याने त्यांच्याविषयी रोष उफाळून आला. सुरुवातीला रेड्डी यांनी यासंदर्भात पंतप्रधान मोदींना पत्र लिहून चंद्राबाबू खोटे बोलत असल्याचे म्हटले. तरी, असंतोष कमी होत नसल्याने त्यांनी आता थेट देवालाच शरण जाण्याची भूमिका स्वीकारली आहे. त्याच पृष्ठभूमीवर रेड्डी यांनी राज्यभरातील मंदिरांमध्ये क्षमायाचना अनुष्ठान आयोजित केले आहे. ◀(वृत्तसंस्था)

## हिमाचल प्रदेशातही दुकान मालकांची नावे फलकांवर लावण्याची सक्ती

### उत्तरप्रदेशनंतर हिमाचलमधील आदेश चर्चेत

◆ **चंदीगड, २६ सप्टेंबर**

दोन महिन्यांपूर्वी उत्तरप्रदेश सरकारने काढलेला एक आदेश चर्चेत आला होता. कावड यात्रेच्या मार्गावर असणारे हॉटेल, ढाबे आणि खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्या दुकानांच्या बाहेर मालकाचा व कर्मचाऱ्यांचा तपशील जाहीर करण्यात यावा, असा हा आदेश होता. त्यावरून बराच वाद झाला. हे प्रकरण कोर्टातही गेले होते. आता काँग्रेसची सत्ता असलेल्या हिमाचल प्रदेशातही अशाच प्रकारचा आदेश देण्यात आला आहे.




हिमाचल प्रदेशच्या सार्वजनिक बांधकाम व नगर विकास विभागाचे मंत्री विक्रमादित्यसिंह यांनी हा आदेश जारी केला आहे. यात अन्नपदार्थ विक्री करणाऱ्या प्रत्येक दुकानाच्या बाहेर मालकाचे ओळखपत्र जाहीर करणे सक्तीचे करण्यात आले आहे.

यासंदर्भात विक्रमादित्य यांनी सविस्तर भूमिका मांडली. मला फक्त हे म्हणायचे आहे की, हा निर्णय हिमाचल प्रदेशला केंद्रस्थानी ठेवून घेण्यात आला असून, त्यात राज्यातील नागरिकांचे हित साधले जाईल, असा उद्देश आहे, असे ते म्हणाले.

विक्रमादित्य यांनी असे उत्तर दिले असले तरी यामागे मंडी येथील मशीद प्रकरणाची पृष्ठभूमी कारणीभूत असल्याची चर्चा आहे. ◀(वृत्तसंस्था)

## अधिवेशन आयोजित करण्यास बंगाल सरकारचा विरोध

### ज्युनियर डॉक्टर्सचा आरोप

◆ **कोलकाता, २६ सप्टेंबर**

कार रुग्णालयातील पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी सुरू केलेल्या चळवळीची पुढील दिशा ठरवण्यासाठी शुक्रवारी आयोजित केलेल्या अधिवेशनाची परवानगी ममता सरकारने मागे घेतली, असा आरोप पश्चिम बंगालमधील ज्युनियर डॉक्टर्सने केला.




बंगालमधील स्वास्थ्य भवनसमोर ११ दिवस चाललेले आंदोलन डॉक्टरांनी मागील आठवड्यात मागे घेतले होते आणि राज्य सरकारसोबत झालेल्या चर्चेनंतर सरकारी रुग्णालयांमधील आपत्कालीन सेवा अंशतः सुरू केली होती.

बलात्कार व हत्या प्रकरणात सहभागी सर्व आरोपींना अटक करावी, या मागणीवर ठाम असलेल्यांवर खोटे खटले दाखल केले जात आहेत, असा आरोप सरकारी व खाजगी रुग्णालयांतील प्रतिनिधींच्या बुधवारी झालेल्या बैठकीनंतर या डॉक्टरांनी केला.

आम्ही गतिरोध संपवण्याचा इरादा आणि लवचिकता दाखवल्यानंतरही प्रशासन सूडबुद्धीची वृत्ती दाखवत असल्याचे दिसून येते. एक महिन्याचा काळ उलटला असला तरी, आमच्या भगिनीवरील बलात्कार व हत्येचा तपास वेगाने पुढे जात असल्याचा पुरावा नाही, असे अनिकेत महतो नावाच्या डॉक्टरने सांगितले. एका सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या अधिवेशनाची परवानगी मागे घेण्यात आली तसेच सरकार इतर सभागृहांमध्येही बुकिंग होऊ देत नाही. याचा फटका निश्चितपणे राज्य सरकारला बसेल. आम्ही न्यायासाठी सुरू केलेल्या आंदोलनाच्या मार्गावरून हटणार नाही, असे निवेदनात म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### ११ वर्षांनंतर भर पावसात श्रद्धाची पुन्हा 'त्याच्या'शी भेट



**मुंबई** : 'आशिकी २' या चित्रपटाने श्रद्धा कपूर आणि आदित्य रॉय कपूर दोघांच्या करिअरने भरारी घेतली. सोबतच त्यांची मैत्रीही फुलली. त्यावेळी चित्रपटातील त्यांचे भर पावसात भेटल्याचे दृश्य लोकप्रिय झाले होते. कालांतराने दोघांमध्ये दुरावा आला. मात्र, नुकतेच अगदी त्याच फिल्मी स्टाईलमध्ये दोघे भर पावसात भेटले. दोघे मुंबईतील एका कार्यक्रमात एकत्र दिसले होते. या कार्यक्रमातील त्यांचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडीओमध्ये आदित्य आणि श्रद्धा एकमेकांना मिठी मारतात आणि त्याचवेळी जोरदार पाऊस सुरू होतो. हा सीन पाहून चाहत्यांना मोहित सूरीच्या 'आशिकी २' चित्रपटाची आठवण झाली. ■

### वीणा जगताप होणार खलनायिका



**मुंबई** : अभिनेत्री वीणा जगताप ही छोट्या पडद्यावरील प्रसिद्ध अभिनेत्री 'राधा प्रेम रंगी रंगली' या मालिकेतून राधाच्या भूमिकेतून ती घराघरांत पोहोचली. मात्र, आता ती एक वेगळ्या भूमिकेत प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यास सज्ज झाली आहे. 'सावळ्याची जणू सावली' मालिकेत अभिनेत्री वीणा जगताप पहिल्यांदाच खलनायिकेच्या भूमिकेत दिसणार आहे. या मालिकेत अभिनेत्री वीणा जगताप, ऐश्वर्या मेहेंदळेची भूमिका साकारणार आहे. कायम एकाच प्रकारची भूमिका करण्यापेक्षा वेगवेगळ्या पद्धतीने स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळाली, तर त्यापेक्षा चांगली गोष्ट काय असू शकते, हा विचार करून मी ही आव्हानात्मक भूमिका स्वीकारल्याचे वीणा सांगते. ■

### लोकप्रिय कलाकारांच्या यादीत प्रिया बापट अव्वल



**मुंबई** : प्रिया बापट मराठीबरोबरच बॉलिवूडमध्येही स्वतःची ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरली आहे. प्रियाने आयएमडीबी अर्थात् इंटरनेट मूव्ही डाटाबेसच्या लोकप्रिय भारतीय अभिनेत्रींच्या यादीत दुसरे स्थान पटकावले आहे. या यादीत पहिल्या क्रमांकावर ईशान खट्टर आहे. आयएमडीबीच्या लोकप्रिय भारतीय कलाकारांच्या यादीत दुसरे स्थान मिळवल्यानंतर प्रियाने आनंद व्यक्त केला. प्रियाने जगतसुंदरी आणि अभिनेत्री ऐश्वर्या रायला मागे टाकले आहे. ऐश्वर्या तिसऱ्या स्थानावर असून, चौथ्या स्थानावर करिना कपूर, सहाव्या स्थानावर शाहरुख खान आणि तेराव्या स्थानावर सलमान खान आहे. ईशान खट्टरनेही सलग तिसऱ्या वर्षी त्याचे पहिले स्थान कायम ठेवले आहे. 'तुंबाड' सिनेमाचा निर्माता आणि अभिनेता सोहम शाहने पाचवे स्थान पटकावले आहे. ■

### ३९ वर्षांपासून कैलास खेरचे गोड खाणे बंद

**मुंबई** : एरवी कोणतेही सेलिब्रिटी वजन वाढू नये म्हणून गोड खाणे बंद करतात. विशिष्ट वयानंतर मधुमेहामुळे अनेकांचे मिठाई खाणे बंद होते. मात्र, यापैकी कोणतेही कारण नसताना गायक कैलास खेरने मागील ३९ वर्षांपासून गोड खाल्ले नाही. यामागील कारण सांगताना तो म्हणाला की, मी १२ वर्षांचा असताना कुटुंबासोबत जोरदार भांडण झाले, तेव्हा मी घर सोडण्याचा निर्णय घेतला. मी जाण्याच्या बेतात असताना आई म्हणाली, तू माझ्याशिवाय कसा राहणार, तुला माझ्या हातचे कलाकंद आवडते, गोड पदार्थ आवडतात. ते तू कसे खाणार, त्यावर मी म्हटले की, मी तुझ्या हाताच्या मिठाईशिवाय कधीही कोणतेही गोड खाणार नाही. त्या क्षणापासून आजतगायत मी मिठाईला स्पर्श केलेला नाही. ■

## महालक्ष्मीचे ५९ तुकडे करणाऱ्या आरोपीची आत्महत्या

◆ **बंगळुरू, २६ सप्टेंबर**

२९ वर्षीय महालक्ष्मीचे ५९ तुकडे करण्याच्या घटनेमुळे भारताची सिलिकॉन व्हॅली म्हणून ओळखले जाणारे बंगलुरू हादरले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महालक्ष्मी हत्याकांडाचा मुख्य आरोपी मुक्ती रंजन रॉयने आत्महत्या केली आहे.

बंगळुरू पोलिस अधीक्षक शेखर टेक्कनवर यांनी याची पुष्टी केली. रॉयचा मृतदेह ओडिशात सापडला. महालक्ष्मीची हत्या केल्यानंतर मृतदेहाचे ५९ तुकडे करून रेफ्रिजरेटरमध्ये ठेवल्याचा आरोप त्याच्यावर होता. पोलिसांच्या मते, रॉयने गळफास लावून आत्महत्या केली. मृतदेहाजवळ सापडलेल्या पत्रात त्याने महालक्ष्मीसोबत वाद झाल्याने तिचा खून करून ५९ तुकडे केल्याची कबुली दिली. रागाच्या भरात केलेल्या कृत्याचा आपल्याला पश्चात्ताप झाल्याचेही त्याने लिहिले.

महालक्ष्मीच्या हत्येने केवळ बंगळुरूच नाही, तर संपूर्ण देशात खळबळ उडाली होती. सोशल मीडियावर लोकांचा रोष पाहून हत्येच्या तपासासाठी विशेष पोलिस पथके तैनात करण्यात आली होती. पोलिसांना रॉयचे ओडिशामधील ठिकाण सापडले. आम्ही हे प्रकरण गांभीर्याने घेतले आहे, असे पोलिसांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)



हिमाचल प्रदेशच्या शिमला शहर आणि परिसरात गुरुवारी वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने झड लावली. अनेक भागांमध्ये झाडे उन्मळून पडली असून, यामुळे विविध ठिकाणी मार्ग बंद झाले होते व वाहतूक खोळंबली होती

## पूजा खेडकरच्या अंतरिम संरक्षणाची मुदत वाढवली

◆ **नवी दिल्ली, २६ सप्टेंबर**

नागरी सेवेच्या परीक्षेत दिव्यांग व ओबीसी कोट्यातील फायदा चुकीच्या पद्धतीने मिळवल्याच्या आरोपाखाली दाखल गुन्ह्यांमध्ये माजी प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकरच्या अंतरिम संरक्षणाची मुदत ४ ऑक्टोबरपर्यंत वाढवण्याचा निर्णय दिल्ली उच्च न्यायालयाने गुरुवारी दिला.

अटकपूर्व जामिनासाठी पूजा खेडकरने दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणी न्यायालयाने तिच्या वकिलाने केलेल्या विनंतीनुसार समोर ढकलली. बनावट दस्तावेज तयार करण्याचा मोठा कट समोर आला असल्याने सुनावणीला मोठी स्थगिती देऊ नये, अशी मागणी सरकारी वकिलाने केली.

याचिकाकर्त्याच्या वकिलाने केलेल्या विनंतीनुसार हे प्रकरण ४ ऑक्टोबरला सुनावणीसाठी सूचीबद्ध केले जात आहे. तोपर्यंत अंतरिम दिलासा कायम राहील, असे न्या. सिंह यांनी स्पष्ट केले. आरक्षणाचा लाभ मिळावा यासाठी पूजा खेडकरने २०२२ मधील यूपीएससी परीक्षेसाठी दाखल केलेल्या अर्जात चुकीची माहिती दिल्याचा आरोप असून, तिने तो फेटाळला आहे.



पूजा खेडकरने अटकपूर्व जामिनासाठी दाखल याचिकेत खोटी वक्तव्ये केल्याच्या यूपीएससीने केलेल्या आरोपाला उत्तर देण्यासाठी आणखी वेळ हवा असल्याची मागणी पूजा खेडकरच्या वकिलाने केली होती. ◀(वृत्तसंस्था)

## इअरबड्सचा कानातच स्फोट

### तरुणी झाली कायमची बहिरी

◆ **अंकारा, २६ सप्टेंबर**

सॅमसंगच्या टीडब्ल्यूएस इअरबड्सचा स्फोट झाल्याची धक्कादायक घटना समोर आली. कानामध्येच इअरबडसचा स्फोट झाल्याने महिलेची ऐकण्याची क्षमता गेली असून, ती कायमची बहिरी झाली.

बयाजित नावाच्या विद्यार्थ्याकडे सॅमसंग एस२४ अल्ट्रा फोन होता. त्याच्यासोबत वापरण्यासाठी त्याने सॅमसंगचे इअरबड्स घेतले. त्याने इअरबड्स चार्ज केले नाही. कारण, त्यात सुमारे ३६ टक्के बॅटरी होती. नवीन इअरबड्स असल्याने त्याची गर्लफ्रेंड जास्तच उत्साहित होती, तिने ते कानात घातले. त्याचा वापर करीत असतानाच तिच्या कानात एका इअरबडचा स्फोट झाला.

विद्यार्थ्याकडे डॉक्टरांचा एक अहवाल आहे, जो या स्फोटामुळे दुखापत झाल्याची पुष्टी करतो. तक्रारीनंतर सॅमसंगने नवीन इअरबड्स देण्याची ऑफर दिली, पण सुरक्षेबाबत काहीही सांगितले नाही. सॅमसंगने या संपूर्ण प्रकरणावर अद्याप कोणतेही अधिकृत विधान जारी केले नाही.

जेव्हा हा तरुण स्फोट झालेले इअरबड्स घेऊन पहिल्यांदा सर्व्हिस सेंटरमध्ये गेला, तेव्हा त्याची अवस्था पाहून सर्व्हिस सेंटरचे कर्मचारी माफी मागताना दिसले. दोन दिवसांच्या तपासानंतर त्यांनी निष्कर्ष काढला की, फक्त बड्स डॅमेज झाले आहेत. त्याचा कोणताही स्फोट झालेला नाही. सर्व्हिस सेंटरच्या कर्मचाऱ्यांनी इअरबड्सच्या मॉडल रिप्लेसमेंटची ऑफर दिली. ◀(वृत्तसंस्था)

#### करू नका 'ही' चूक

आजकाल बाजारात उपलब्ध असलेले बहुतेक इअरबड्स वॉटरप्रूफ असतात. स्मार्टफोन किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांप्रमाणे इअरबडमध्ये लिथियम-आयर्न बॅटरीचा वापर केला जातो. इअरबड्समध्ये ३५ ते ५० एमएएचपर्यंत बॅटरी दिली जाते. अशा परिस्थितीत इअरबड्स वापरण्यापूर्वी बड्स गरम आहेत की नाही, हे तपासून पाहावे. शॉर्ट सर्किटमुळे बड्समध्ये असे घडू शकते. जर त्यात कोणत्याही प्रकारचे लीकेज होत असेल तर, शॉर्ट सर्किट होण्याची शक्यता असते. ■

## हल्लेखोरांनी दिव्यांग तरुणाचे जानवे कापले

### तामिळनाडूतील घटनेची केंद्रीय मंत्र्यांकडून दखल

◆ **तिरुनेलवेली, २६ सप्टेंबर**

तामिळनाडूमधील तिरुनेलवेली येथे एका ब्राह्मण मुलाचे जानवे चार अज्ञात हल्लेखोरांनी बळजबरीने कापल्याची तक्रार त्याच्या वडिलांनी केली. मात्र, तामिळनाडू पोलिसांनी तक्रारीकडे लक्ष न दिल्यामुळे केंद्रीय मंत्री एल. मुरुगन यांनी पीडित कुटुंबीयांची भेट घेऊन प्रकार जाणून घेतला.



तक्रार प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रण तपासले असून, त्यांना या घटनेचा सबळ पुरावा सापडलेला नाही. तक्रारदार एम. सुंदर यांनी सांगितले की, त्यांचा मुलगा अखिलेश हा दिव्यांग आहे. तो २१ सप्टेंबर रोजी घराजवळ असलेल्या ब्राह्मण समाज केंद्रात धार्मिक कार्यक्रमासाठी जात होता. दुपारी ४.३० च्या सुमारास दोन दुचाकीवरून आलेल्या चार हल्लेखोरांनी त्याला अडवले आणि त्याच्या अंगावरील जानवे कापले. जानवे कापल्यानंतर हे पुन्हा घालू नको, असेही त्यांनी धमकावले.

एम. सुंदर यांनी त्याच दिवशी पेरुमलपुरम् पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. मात्र, त्यांची तक्रार समुदाय सेवा रजिस्टरमध्ये नोंदविण्यात आली. पोलिसांच्या मते, हा प्रकार अदखलपात्र आहे, असा आरोप सुंदर यांनी केला. दुसऱ्या दिवशी काही हिंदुत्ववादी संघटनांनी या विषयावर आवाज उचलला, तेव्हा केंद्रीय मंत्री मुरुगन यांनी या कुटुंबाची भेट घेऊन संपूर्ण प्रकार जाणून घेतला. ◀(वृत्तसंस्था)

# 'विमानसेवा शुभारंभ'

## एका डोळ्यात हसू अन् दुसऱ्या डोळ्यात आसू!




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**
गेल्या काही महिन्यांपासून जिल्ह्यातील विविध विकासकामांना प्राधान्य देत विमानतळाच्या कामलाही गती देवून सोलापूरकरांचे स्वप्न साकार करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी पायाला भिंगरी लावून काम केले होते. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासनातील आवश्यक त्या सर्व गोष्टींचा पाठपुरावा केला आणि आ. कल्याणशेट्टी यांनी हायटेक नेत्यांच्या गाठीभेटी घेवून विमानसेवा उद्घाटन सोहळ्यापर्यंत हा विषय आणून सोडला होता. मात्र पावसाने घोटाळा केल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आजचा (दि. २६) पुण्याचा दौराच रद्द झाला आणि वरील दोघांसह जिल्हावासियांच्या एका डोळ्यात हसू तर दुसऱ्या डोळ्यात आसू तरळले.



असो एकदाचे विमानतळाचे लायसन्स तरी मिळाले आहे आणि आता काही दिवसांत पुन्हा मोदी यांचा दौरा कार्यक्रम येईल...व या विमानतळाचे उद्घाटन होणार आहे. सोलापूर विमानतळाच्या त्रुटी दूर करण्यासाठी ६५ कोटीच्या झालेल्या कामाच्या पाहणीसाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी विमानतळाला वारंवार भेटी देवून कामाला गती दिली होती आणि अत्यल्प कालावधीत लायसन्सही मिळविले होते. तर आ. सचिन कल्याणशेट्टी यांनीही मुंबई, दिल्ली अशा फेऱ्या करून आपल्या राजकीय वजनाचा फायदा करून घेतला होता. या दोघांच्या कामाची दखल माध्यमांनी घेवून तोंड भरून कौतुकही केले...या विमानतळाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन होणार असले तरीही योग्य ती तयारी सोलापूर विमानतळावर केली होती...उद्घाटनाच्या क्षणाला अवघे काही तास उरले होते...मात्र अती पावसामुळे मोदींचा दौरा अचानक रद्द झाला आणि या दोघांसह जिल्हावासियांचा विमानतळाबाबत हिरमोड झाला. हे विमानतळ २०१० सालापासून बंद आहे. यानंतर एक-दोन वेळा ही विमानसेवा सुरू करण्याचा प्रयत्न झाला होता. मात्र ही सेवा अल्प काळच चालली. विमानसेवेअभावी शहराची होत असलेली अधोगती पाहून काहीजणांनी विमानसेवेची पुन्हा मागणी राज्यातील हायटेक नेत्यांकडे केली. यामुळे २०१७ साली एअरपोर्ट ॲथोरिटी ऑफ इंडिया, महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरण यांच्या दोन्ही पथकांनी या ठिकाणी येवून विमानतळाची पाहणी केली. या पथकांनी अनेक त्रुटी काढल्या. यामध्ये श्री सिध्देश्वर साखर कारखाना चिमणी पाडकाम, विमानतळ जागेवरील अतिक्रमण आदींसह इतर विविध विषय होते.

यानंतर महापालिका विमानतळ प्राधिकरण आणि कारखान्याचा चिमणीचा न्यायालयीन लढा सुरू झाला. २०२२ मध्ये न्यायालयीन लढा थांबून १५ जून २०२३ रोजी चिमणी पाडली. यानंतर लगेच विमानतळ जागेचा कब्जा घेणे, विमानतळ रनवे आदी विविध कामांना गती आली. विमानतळ प्राधिकरणकडून भरघोस निधी आल्याने या निधीतून सर्व त्रुटी भरून घेण्यासाठी सध्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी लीड घेवून प्रवासीसेवा सुरू करण्यासाठी विमानतळ सज्ज केले. आजपर्यंत केवळ विमानसेवा नसल्याने शहराची औद्योगिक व इतर क्षेत्रात पिछेहाट होत असल्याचे सर्वांना समजल्याने जिल्हावासियांनी जिल्हाधिकाऱ्यांना आणि आ. कल्याणशेट्टी यांना खंबीर साथ दिली. यामुळे आता लवकरच उद्घाटन होवून नोव्हेंबर महिन्यात विमानाचे टेकऑफ होणार आहे. यापूर्वी विमानतळ सुरू करण्यासाठी माजी पालकमंत्री दत्तात्रय मामा भरणे, राधाकृष्ण विखे पाटील, सध्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, मा. खा. जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामी, खा. प्रणिती शिंदे यांनीही विशेष प्रयत्न केले होते. दरम्यान, जिल्हाधिकारी आशीर्वाद आणि आ. कल्याणशेट्टी यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आता यश आले असून, नवनवे उद्योग-उद्योजक सोलापुरात येणार आहेत. मोठे उद्योग, आयटी कंपन्या आल्यास सोलापूरच्या सुशिक्षित युवकांना मोठ्या रोजगाराच्या संधी मिळणार आहेत. जिल्ह्यातील धार्मिक आणि पर्यटन स्थळांनाही गर्दी होणार आहे. एकंदरीत, विमानसेवा सुरळीत झाल्यास जिल्ह्यात विकासाची नवी पहाट निघणार आहे.

# भारताचा दैदिप्यमान इतिहास शिकवला तरच सद्य परिस्थिती बदलेल : अभिनेते शरद पोंक्षे

## मसाप दक्षिण सोलापूर शाखेकडून आयोजित कार्यक्रमाला गर्दीच गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. २६ सप्टेंबर-**
सद्य परिस्थिती बदलायची असेल तर आपल्या देशाचा दैदिप्यमान इतिहास शिकवण्याची गरज आहे. असे प्रतिपादन अभिनेते शरद पोंक्षे यांनी केले. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर यांच्या वतीने आयोजित स्वातंत्र्यवीर सावरकर आणि सद्य परिस्थिती या विषयावर ते बोलत होते.

ब्रिटीशांनी जातीचे विष पेरून तोडा आणि राज्य करा अशी निती वापरत आपल्या देशावर अनेक वर्ष राज्य केले, तीच परिस्थिती काहीजण निर्माण करीत आहेत. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्यासारख्या परखड हिंदुत्वाची सद्या देशाला गरज आहे. महाराष्ट्राला जातीचा शाप लागलेला आहे. प्रभु श्रीराम यांनी रामराज्य निर्माण केले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्य निर्माण केले. त्यावेळी त्यांनी कोणत्याच जाती धर्माचा विचार केला नाही. हिंदु संस्कृतीमध्ये मनुष्यधमला महत्वाचे स्थान आहे. माणूस हा जन्मा पेक्षा त्याच्या कर्माने श्रेष्ठ ठरतो हाच विचार हिंदु धर्मामध्ये शिकवलेला आहे. आणि हाच दैदिप्यमान इतिहास आपल्या हिंदुस्थानचा आहे. अनेक महान राष्ट्रपुरूष आपल्या हिंदुस्थानमध्ये जन्मले त्यांचे कर्तुत्व आणि त्यांनी मांडलेला विचार आजच्या पिढीला आणि आजच्या समाजाला प्रेरणादायी आहे. सर्वसामान्य जनतेने मनावर घेतले तर राष्ट्राची जडण घडण चांगली होवू शकते. जगाचे कल्याण करायचे असेल तर हिंदुच ते करू शकतील. हिंदुचे हक्काचे ठिकाण हे हिंदुस्थान आहे. जपानी लोकांचा आपण आदर्श घेतला पाहिजे. प्रत्येक हिंदुच्या मनात प्रखर राष्ट्रप्रेम असले पाहिजे. जगाच्या पाठीवर जन्मलेला हा प्रत्येक माणूस प्रथम हिंदुच असतो. प्रत्येकाने स्वातंत्र्यवीर सावरकर आणि छत्रपती शिवाजी महाराज हे वाचले पाहिजे आणि ते समजून घेतले पाहिजे असेही अभिनेते शरद पोंक्षे यांनी सांगितले.




हुतात्मा स्मृती मंदिर मध्ये झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रेणुका महागांवकर यांनी केले अभिनेते पोंक्षे यांचे स्वागत भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार यांच्या हस्ते पवार यांचा सत्कार मसापचे उपाध्यक्ष हास्यसम्राट दिपक देशपांडे यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यवाह जितेश कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रकाश मोकाशे यांनी केले. यावेळी कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, सल्लागार अविनाश महागांवकर, प्रसिध्दी प्रमुख विनायक होटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# अमित शाह, देवेंद्र फडणवीसांना अक्षय शिंदेच्या वडिलांचे पत्र

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ सप्टेंबर-**
बदलापूर बालिका अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदे एन्काऊंटरमध्ये मारला गेला असताना त्याबाबतचे कवित्व अद्याप संपलेले नाही. त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यासाठी जागा मिळत नाही तर त्याच्या वडिलांनी आपल्या कुटुंबीयांना व वकिलाच्या जीवाला धोका असल्याचे सांगून संरक्षण मागितले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्याबाबत पत्र लिहून तातडीने योग्य खबरदारी घेण्याची विनंती केली आहे.

अक्षय शिंदे यांच्या एन्काऊंटर बद्दल उच्च न्यायालयानेही बुधवारी राज्य सरकारवर ताशेरे ओढले आहेत त्याबाबतचे सर्व पुरावे तीन ऑक्टोबरला सादर करण्याचे निर्देश दिले असल्याने एन्काऊंटर बाबत सांशकता व्यक्त होत आहे .तर अक्षयच्या मृतदेहाचा शवविच्छेदन होऊन ४८ तास उलटूनही नातेवाईक यांनी याचा एन्काऊंटरमध्ये खात्मा करण्यात आला. त्यानंतर त्याच्या एन्काऊंटर वरून न्यायालयाने अनेक प्रश्नही उपस्थित केले. त्याच्या एन्काऊंटरनंतर काही ठिकाणी जल्लोष झाला तर काहींनी टिकाही केली. अक्षयवर अंत्यसंस्कार कुठे करायचे? यावरूनही वाद सुरू आहे. त्याचा मृतदेह बदलापूरमध्ये दफन करण्यासाठी विरोध होत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आता अक्षय शिंदेचे वडील अण्णा शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना थेट पत्र लिहीले आहे. या पत्राची आता सर्वत्र चर्चा आहे. या पत्रातून अक्षयचा एन्काऊंटर नाही तर तो पोलिसांनी नियोजनबद्ध केलेला खून आहे असा आरोप अक्षयच्या आई वडिलांनी केला. या याचिकेवरील सुनावणी वेळी कोर्टाने ही पोलिसांच्या कामगिरीवर ताशेरे मारत अनेक प्रश्न उपस्थित केले. या प्रकरणात संस्था चालक मात्र प्रकरणानंतर फरार आहेत. त्यांचा कोणताही पत्ता लागलेला नाही. अशात आता अक्षयच्या वडिलांनी थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना एक पत्र लिहीले आहे. त्या पत्रात त्यांनी आमच्या जिवाला सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांकडून धोका असल्याचे म्हटले आहे. शिवाय आमच्या वकिलाच्या जिवालाही धोका निर्माण झाल्याचे त्यांनी या पत्रात सांगितले आहे. त्यामुळे आम्हाला संरक्षण मिळावे अशी विनंती त्यांनी या पत्रातून केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या बरोबर महाराष्ट्राचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, ठाणे पोलीस आयुक्त, नवी मुंबई पोलीस आयुक्त यांना ही पत्र पाठवत ही मागणी केली आहे.

# कोणीही कायदा हातात घेऊ नये : पोलिस आयुक्त राजकुमार

## नवरात्रौत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्तालयात बैठक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**
उत्सव साजरा करताना बऱ्याचवेळी कायदेशीर बाबींचे उल्लंघन होत असते, कोणीही कायदा हातात घेऊ नये, कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास पोलीसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी केले.

गुरुवारी सायंकाळी सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयामध्ये आगामी नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समिती व मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. त्यावेळी आयुक्त राजुकमार ह बोलत होते. या बैठकीस पोलिस उपायुक्त अजित बोऱ्हाडे, विजय कबाडे, डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त प्रताप पोमण, राजन माने, खिरडकर, महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे, महावितरणचे कार्यकारी अभियंता आशिष मेहता, सारिका आकुलवार, धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडील आसिफ शेख, अग्निशामक अधिकारी अच्युत दुधाळ, पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते.




यावेळी बोलताना आयुक्त राजकुमार यांनी सोशल मिडीयावरुन काही अक्षेपार्ह मेसेजेस, फोटो, पोस्ट व्हायरल होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत त्वरीत पोलीस यंत्रणेस कळवावे. नवरात्रौत्सव-२०२४ मंडळानी ऑनलाईन, ऑफलाईन पध्दतीने परवानगी घेणे बंधनकारक आहे याची नोंद घ्यावी. ऑनलाईन व ऑफलाईन नोंदणीकरीता प्रत्येक पोलीस ठाणे येथे स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. पोलीसांनी दिलेल्या सुचनांचे पालन करावे. तसेच कोजागिरी पोर्णिमेनिमित्त पायी तुळजापूरला जाणारे देवी भक्तांना कोणत्याही प्रकारचे त्रास व अडथळा होवू नये, तसेच कायदा, सुव्यवस्था आबाधित राहण्याकरीता योग्य तो चोख पोलीस बंदोबस्त नेमण्यात येईल असे सांगितले.

मोकाट जनावरांपासुन मुर्तीस धोका होणार नाही याची खबरदारी मंडळांनी घ्यावी, देखावे चित्र आक्षेपार्ह नसावेत, उत्सवाचे पावित्र्य राखावे, मंडळांकडुन आरोग्य विषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित कराव्यात, तसेच स्वच्छता, जलसंवर्धन, वृक्षारोपण, साक्षरता, सायबर गुन्हेगारी यंत्रणाबाबत जनजागृती करावी, देखावे, रोषणाई पाहण्यास येणाऱ्या महिला व पुरुष भाविकांकरीता स्वतंत्र रांगेची सोय करावी, प्रवेशाकरीता आणि बाहेर जाण्यास स्वतंत्र गेट असावेत. सांस्कृतिक कार्यक्रमांसोबत आरोग्य विषयक उपक्रम/शिबीरे आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे, ध्वनीप्रदुषण कायद्याच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे, मंडाळांनी अधिकृत विद्युत जोडणी करुन घ्यावी, मिरवणुकीत सामिल होणाऱ्या वाहनांची आर टी ओ कडुन तपासणी करावी, मिरवणुकीमध्ये मोठे व लांब कंटेनर वापरु नये, वाहनांवरील देखाव्यांची उंची अडथळा होणारी नसावी, मिरवणुक संवेदनशिल ठिकाणी जास्त वेळ रेंगाळत ठेवू नये, मिरवणुकीच्या वेळी ट्रिपलशिट फिरू नये, वाहनांचे सायलेंन्सरच्या पुंगळ्या काढून वाहने चालवू नये व हुल्लडबाजी करू नये, मिरवणुक मार्गात बदल करू नये, इतर धर्मांच्या भावना दुखावणार नाही यांची काटेकोर दक्षता घ्यावी अशा सूचना यावेळी पोलिस विभागाच्यावतीने देण्यात आल्या. यावेळी उपस्थित शांतता समिती सदस्यांकडून मिरवणुक मार्गातील झाडे, कचरा, रस्त्यांवरील खड्डे, मोकाट जनावरे या ठरलेल्या प्रश्नांची प्रशासनावर सरबत्ती केली. आणि या प्रश्नांना पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दरवेळीप्रमाणे उत्तरे देऊन समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले.

यावेळी शहरातील नवरात्र मंडळाचे पदाधिकारी, शांतता समिती सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फायनान्सवर कर्ज घेऊन घेतलेली दुचाकी जप्त करताना मारहाण

## उपचारावेळी एकाचा मृत्यू; दोघांना अटक

## विजापूर नाका परिसरातील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर -**
फायनान्सवर कर्ज घेऊन घेतलेली दुचाकी ही ब्लॅकलिस्ट झाल्याने जप्त करण्यासाठी फायनान्सकडून वसुलीसाठी आलेल्या चौघांना करण्यात आलेल्या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या तरूणाचा उपचारावेळी मृत्यू झाला. याप्रकरणी विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी दोघांना अटक केली आहे.

लक्ष्मण जाधव (रा. सेटलमेंट कॉलनी, सोलापूर) असे मरण पावलेल्या तरूणाचे नाव आहे. याबाबत तुषार कैलास गायकवाड (वय २०, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर ३, सलगर वस्ती पोलीस ठाणे शेजारी) याने दिलेल्या फिर्यादीवरून अविनाश मदनावाले, राजेश मदनावाले, विशाल जाधव व एका अनोळखी इसमाविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी अविनाश मदनावाले व राजेश मदनावाले (रा. कुमठा नाका, सोलापूर) यांना अटक केली असून न्यायालयाने त्यांना एक दिवस पोलिस कोठडी सुनावली आहे. इतर दोघांचा शोध पोलिसांकडून सुरु आहे.



स्पर्श फायनान्स कंपनीकडून अविनाश मदनावाले याने कर्ज घेऊन एमएच १३ ईडी ९२८६ क्रमांकाची दुचाकी विकत घेतली होती. या दुचाकीचे हप्त मदनावाले याने न भरल्यामुळे फायनान्स कंपनीकडून मदनावाले याची दुचाकी ही ब्लॅकलिस्ट करून ती जप्त करण्याचे काम तुषार गायकवाड व इतरांच्या ग्रुपला दिले होते.

२३ सप्टेंबर रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास जुना विजापूर नाका परिसरातील नुराणी मशिद परिसरात मदनावाले व त्याची दुचाकी तुषार गायकवाड व त्याच्या टिमला मिळून आली. त्यामुळे गायकवाड व इतर हे दुचाकी जप्त करीत असताना अविनाश मदनावाले याने खोऱ्या घेऊन लक्ष्मण जाधव याला थांब तुला खल्लास करतो असे म्हणून जिवे मारण्याच्या उद्देशाने डोक्यात व छातीत खोऱ्याने मारून जखमी केले. तसेच लक्ष्मण जाधव हा मारहाणीत जखमी होऊन खाली पडला असतानादेखील त्याला अविनाश आणि राजेश यांनी मिळून परत जाणीवपूर्वक जीवे मारण्याच्या उद्देशाने फरशी डोक्यात घालून मारहाण केली. तर इतर दोघांनी गायकवाड व इतरांना मारहाण करून जखमी केले. लक्ष्मण याच्या डोक्यात गंभीर जखमा झाल्याने त्यांस उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता उपचार सुरु असताना गुरुवारी लक्ष्मण याचा मृत्यू झाला. त्यामुळे सेटलमेंट कॉलनी परिसरातील नागरीकांनी शासकीय रुग्णालयात मोठी गर्दी केली होती. यावेळी सदर बझार आणि विजापूर नाका पोलिसांनी शासकीय रुग्णालयात येऊन नागरीकांची समजूत काढली. यपुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णू गायकवाड हे करीत आहेत.

# बंडू यादव यांचे निधन

**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**
तळे हिप्परगा येथील बंडू मच्छिंद्र यादव (वय ४९) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. येथील प्रसिद्ध मूर्तिकार मच्छिंद्र यादव यांचे ते चिरंजीव होत.



**नावात बदल**

माझे जुने नाव - **हमीद लतीफ चौधरी** असे होते. ते बदलून मी माझे नवीन नाव - **अब्दुलहमीद अब्दुललतीफ चौधरी,** (पत्ता- मार्केट गल्ली, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर पिन कोड - ४१३४०२) असे केले आहे. तरी मला आजपासून माझे नवीन नावाने ओळखावे.
**शपथ पत्र नं. २८४७/२०२४**
**दि. २६/०९/२०२४**

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLAIRED THAT MY OLD NAME IS **HAMID LATIF CHOUDHARI** HAS BEEN CHANGE TO NEW NAME IS **ABDULHAMID ABDULLATIF CHOUDHARI** (R/O MARKET GALLI, VAIRAG, TAL.- BARSHI, DIST.- SOLAPUR- 413 402) KINDLY NOTE THE SAME.
**AFFIDAVIT NO. 2847/2024**
**DATE : 26/09/2024**

**तेल्हारा नगर परिषद तेल्हारा**
**ई-निविदा सूचना २०२४-२०२५**

नगर परिषद तेल्हारा जिल्हा अकोला यांच्यावतीने वैशिष्ट्यपूर्ण योजना अंतर्गत ०४ कामाची ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या **https://www.mahatenders.gov.in** वेबसाईडवर **दिनांक २७/०९/२०२४ रोजी** प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदरची ई निविदा **दिनांक ०३/१०/२०२४ ला सायंकाळी ३:०० वाजेपर्यंत** भरणा करण्यात येईल. इतर शर्ती व अटी **https://www.mahatenders.gov.in** वेबसाईटवर उपलब्ध आहेत. इच्छूकांनी आपल्या ई-निविदा उपरोक्त शासनाच्या वेबसाइटवर ऑनलाईन भरणा करावी.
जा.क्र. न.प.ते.बा.वि.१८५८
दिनांक २६/०९/२०२४
**स्वा/- प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**नगर परिषद तेल्हारा**

Classifieds

**शेतीविषयक**
**नर्सरी (शेती) काम करणारे जोडपे, ड्रायव्हर पाहिजेत. राहण्याची उत्तम सोय. पगार : १८ ते २२ हजार महिना जोडीला.**
**संपर्क**
**9922004242**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११**
**(महाराष्ट्र शासन उपक्रम)**
**कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्रमांक ८, सोलापूर यांचे कार्यालय सिंचन भवन, गुरुनानक चौक, क्लब कैंटीन जवळ, सोलापूर**
**दूरध्वनी क्रमांक - ०२१७-२७३२८५३**
ई-मेल - **ucd8.solapur@gmail.com**

**ई निविदा सूचना क्र. ५ सन २०२४-२५**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने **कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र.८, सोलापूर,** जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडुन खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र.८, सोलापूर** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

**कामाचे नाव :-** बार्शी उपसा सिंचन योजने अंतर्गत डावा कालवा सा.क्र. १२१० ते २४२५ मधील पर्यायी पाईप लाईनचे काम, कुडुवाडी ते लातुर या राष्ट्रीय महामार्गास जोड कालवा मुख्य वाहिनी व मुख्य कालव्याच्या वितरण व्यवस्थेस छेदणा-या ठिकाणी तसेच सोलापुर, तुळजापुर व धाराशीव या रस्त्यास पुच्छ वितरिका वितरण व्यवस्था छेदणाऱ्या ठिकाणी पुशिंगचे काम.
**जिल्हा :- सोलापूर**
**निविदेची किंमत रुपये :- ९४४.७९ लक्ष**
**१. निविदा उपलब्ध कालावधी :-** दि. २७/०९/२०२४ ते दि. ११/१०/२०२४
**२. निविदा उघडण्याचा दिनांक :-** दि. १४/१०/२०२४ रोजी

**जा.क्र. उकावि-८/निविदा/ /उजनी कालवा विभाग क्र. ८, सोलापूर दि. / /२०२४**
**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**उजनी कालवा विभाग क्र. ८, सोलापूर**
DGIPR/Roc-2024-25/C-5/C3398

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my Old Name Mr. KUSHAL RAMESH DEDHIA has been changed to New Name **Mr. KHUSHAL RAMESH DEDHIA** and residing At- 101, Mandar Appartment Railway Lines, SOLAPUR, Dist- SOLAPUR-413001. Kindly Note The Same.

**जाहीर प्रसिध्दीकरण**
एस.आर. नं. ४०६/२०२४

**पंढरपूर येथील मे. तहसीलदारसाो पंढरपूर यांचे कोर्टात**

**प्रकाश उत्तम गंगथडे - अर्जदार**
विरूध्द
**मा. मुख्याधिकारी,**
**पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर - सामनेवाला**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, यातील अर्जदार यांनी अर्जदार याची आई रुक्मिणी उत्तम गंगथडे हे दिनांक २४/०६/२०२१ रोजी शहर पंढरपूर येथे राहते घरी मयत झाले म्हणून पंढरपूर येथील पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर येथील मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये अर्जदार यांचे आईच्या मृत्यूची नोंद होवून मिळणेसाठी या न्यायालयाने आदेश करावा म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

तेव्हा सदर मृत्यूच्या नोंदीचा आदेश देण्यासंबंधी कोणाची हरकत तक्रार असल्यास या न्यायालयास ३० दिवसापुर्वी अथवा नेमली तारीख २६/१०/२०२४ आपले म्हणणे समक्ष हजर राहून अथवा वकीलामार्फत हजर होवून द्यावे.

वरील मुदतीत म्हणणे अथवा हरकत न आल्यास सदरचे न्यायालय अर्जदार याचे आईचे मृत्यूची नोंद होण्यासंबंधीचे सामनेवाला यांना योग्य ते आदेश पारीत करतील. याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख २६/०९/२०२४

शिक्का
**सही/-**
**मे तहसीलदार सो पंढरपूर**

**ग्रामपंचायत लोंढेवाडी, ता. माढा, जि. सोलापूर**
**टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत लोंढेवाडी ता. माढा, जि. सोलापूर यांचेकडून खालील कामे करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदारादारकडून बंद लखोट्यात निविदा मागवण्यात येत आहे.

**लेखाशिर्ष :- अटल भूजल बक्षिस - ग्रामनिधीतून**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | पुरवठा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | इमारतीवर रेन वॉटर हॉर्वेस्टींग करणे | ३ लाख | १% | १००/- | ३ महिने | नोंदणीकृत |
| २ | शोषखड्डे दुरस्ती व नवीन कामे करणे | ३ लाख | १% | १००/- | ३ महिने | नोंदणीकृत |

**टीप -**
१ कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी २७/०९/२०२४ सकाळी १० पासून
२ भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक ०२/१०/२०२४ पर्यंत सकाळी ११.०० ते ५.०० वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत लोंढेवाडी, ता. माढा, जि. सोलापूर
३ निविदा उघडण्याचा दिनांक ०५/१०/२०२४ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता
४ निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायतमध्ये पहावयास मिळतील.
५ निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत लोंढेवाडी**
**ता. माढा, जि. सोलापूर**

# ॲड. राजन दीक्षित यांची सोनार समाज राज्य मुख्य समन्वयक पदी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**
येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते ॲड. राजन दीक्षित यांची दादर मुंबई येथे झालेल्या समस्त सोनार समाजाच्या राज्य मुख्य समन्वयक पदी निवड झाली.



सोनार हितकारणी सभेच्या मेळाव्यात मानद अध्यक्ष सुरेंद्रभाऊ शंकरशेठ यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड. दीक्षित यांना राज्य मुख्य समन्वयकपदी निवड केल्याचे पत्र देवून सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक प्रा. अभिजीत पंडीत यांनी केले. या प्रसंगी माजी आ. जयप्रकाश भावीसकर, माजी आ. रविंद्र दादा मिर्लेकर, माजी कलेक्टर शिवानंद टाकसाळे, माजी सहकार आयुक्त संजीव कडकेसह आदी उपस्थित होते. नुतन अध्यक्षपदी संजीव मंडलिक यांची व महासचिवपदी सचिन पितळे यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी पद्मिणीताई शंकरशेठ, रविंद्र भदरगे, शिवाजी विसपूते, करण लोळगे, विसपूते आदीसह राज्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थितीत होते. या मेळाव्यात एकूण १२ ठराव मंजूर करण्यात आले असून मुंबईचे शिल्पकार ना. नाना शंकरशेठ यांचे नांव मुंबई विद्यापीठास द्यावे व भारतरत्न सन्मान दयावा, संत नरहरी आर्थिक विकास महामंडळ सुरु करावे व आगामी विधान सभेत सोनार समाजाला सर्व राजकीय पक्षानी दहा उमेदवार दयावेत अशी ठरावाद्वारे मागणी करण्यात आली.

---

● पंतप्रधान मोदींचा पुण्याचा दौरा रद्द झाल्याने

# सोलापूर विमानतळाचे उद्घाटन लांबणीवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**
राज्यातील विधानसभा निवडणूक तोंडावर आलेली असताना, आज (दि. २६) सपंतप्रधान नरेंद्र मोदी पुणे दौऱ्यावर येणार होते. मात्र मुसळधार पावसाच्या शक्यतेमुळे मोदींचा पुणे दौरा रद्द करण्यात आला आहे. मोदींचा पुणे दौरा तात्पुरता रद्द करण्यात आला असून, त्याची नवीन तारीख लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. यामुळे सोलापूर विमानतळाचे आज पंतप्रधान मोदींच्या हस्ते होणारे उद्घाटनही लांबणीवर पडल्याची माहिती सोलापूर जिल्हा प्रशासनाकडून मिळाली.

पंतप्रधान मोदी यांची गुरूवारी सायंकाळी स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर जाहीर सभा होणार होती. परंतु, या सभेवर जोरदार पावसाचे सावट आहे. मागील दोन दिवसांतील पावसाने या मैदानावर व सभा मंडपातही पाणी साचले आहे. त्याचा निचरा करून मैदान कोरडे करण्यासाठी प्रशासनाने प्रयत्नांची




शर्थ केली. सभेला गर्दी व्हावी, यासाठी भाजपा पदाधिकारी, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह महायुतीच्या इतर नेत्यांचेही प्रयत्न सुरू होते. अशातच मोदींचा दौरा रद्द करण्याचे वृत्त समोर आल्याने सर्वांचीच निराशा झाली आहे.

तर महाविकास आघाडीच्या बड्या नेत्यांच्या हाती आयते कोलीत मिळाल्याने नेत्यांनी मात्र या दौऱ्यावर उलट-सुलट टिप्पणी केली. पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते मेट्रो प्रकल्पाच्या जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या भूमिगत मार्गाचे उद्घाटन आणि स्वारगेट ते कात्रज या मार्गाचे भूमिपूजन होणार होते. इतकेच नाहीतर नव्या रूपात दिसत असलेल्या सोलापूर विमानतळासह एकूण बारा प्रकल्पांचे उद्घाटन व भूमिपूजन मोदींच्या हस्ते होणार होते. यानिमित्ताने स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर पंतप्रधान मोदी यांची सभा होणार होती. परंतु आता ती पुढे ढकलली जाणार आहे.

**सभेच्या मैदानावर चिखल आणि दलदल :** पंतप्रधान मोदी दौऱ्याच्या मैदानावर गेल्या दोन-तीन दिवसांत झालेल्या जोरदार पावसाने मोठ्या प्रमाणावर चिखल आणि दलदल झाली आहे. त्यामुळे यावर खडी पसरविण्यासाठी प्रशासनाची धावपळ सुरू होती. मैदानावर काही ठिकाणी प्लायवूड टाकण्यात आले. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स. प. महाविद्यालय येथे ठाण मांडले आहे. याशिवाय जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही स. प. महाविद्यालयाची पाहणी करून सूचना केल्या होत्या. मात्र हवामान विभागाकडून पुण्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आल्याने मोदींचा दौरा रद्द करण्यात आला होता.

**सोलापूर जिल्हावासियांचीही निराशा :** वाहतूक महासंचालनालयाची टीम सोलापूर विमानतळाच्या विविध सुरक्षा मानके याबाबत तपासणी करण्यासाठी नुकतीच येवून गेली होती. तपासण्याची सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर डीजीसीएकडून सोलापूर विमानतळाला बुधवारीच (दि. २५) विमान लँड होणे, को टेकऑफ करण्याचे लायसन्स प्राप्त झालेले आहे. त्यामुळे सोलापूर विमानतळ येथून विमानसेवा सुरू होण्याची कार्यवाही लवकरच करण्यात येईल, अशी अपेक्षा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आणि नागरिकांना होती. मात्र उद्घाटन कार्यक्रमच रद्द झाल्याने सर्वांचीच निराशा झाली.

---



# जैन श्वेतांबर श्रावक संघाने दमाणी ब्लड सेंटरच्या ८३ मुलांना घेतले दत्तक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**
येथील श्री जैन श्वेतांबर स्थानकवासी श्रावक संघ यांनी इंडियन रेड क्रॉस सोसायटी श्रीमती गोपाबाई दमाणी ब्लड सेंटरच्या थ्यलेसेमिया सेंटर मधील ८३ मुलांना दत्तक घेतले. श्रावक संघाने दमाणी ब्लड सेंटरला भेट दिल्यानंतर त्यांनी हे जाहीर केले. यावेळी सर्वश्री पदम राका व सदस्य अशोक छाजेड, उमेश करणावत, केतन वोरा, संजय नाहटा, आकाश रांका, अमोल सांचेती, आशीष छाजेड, हार्दिक गांधी व विजय बलदोटा, इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे मानद सचिव जयेश पटेल व मानद सहसचिव खुशाल देढिया उपस्थित होते. याकामी केतन वोरा व राजू वोरा यांचे सहकार्य लाभले.

---

# युवती प्रदेशाध्यक्ष संध्या सोनवणे आज सोलापुरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**
राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या आदेशान्वये आगामी विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युवती प्रदेशाध्यक्ष संध्या सोनवणे हे महाराष्ट्र दौरा करत आहेत.

उद्या दि. २७ सप्टेंबर रोजी सोलापूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या स्वागतासाठी युवक व युवती सेलच्या पदाधिकाऱ्यांकडून तयारी केली आहे. युवती प्रदेशाध्यक्ष संध्या सोनवणे यांचे सकाळी ७ वा. सोलापुरात आगमन होईल. सकाळी ८ वा. ग्रामदैवत शिवयोगी श्री सिध्देश्वर मंदिरात दर्शन, सकाळी ९:३० वा.उमाबाई श्राविका प्रशाला सम्राट चौक स्वाक्षरी मोहीम, युवती संवाद - सकाळी १० वा. संगमेश्वर कॉलेजमध्ये होय आम्ही सक्षम, आपलं शासन भक्कम या विषयावर युवती युवक संवाद-सकाळी ११ वा. बुर्ला कॉलेज, ११:४५ वा. छत्रपती शिवाजी सायं.वाणिज्य महाविद्यालय, दयानंद कॉलेज आणि इतरही काही कॉलेजमध्ये युवती-युवक संवाद होणार आहे. तर सायंकाळी ४ वा.प्रमुख पदाधिकारी भेट - सायंकाळी ५ वा. युवक - युवती कार्यकारिणी बैठक घेणार आहेत. या सर्व कार्यक्रमाचे पूर्व नियोजन जिल्हा समन्वयक आमदार यशवंत माने, जिल्हाध्यक्ष संतोष पवार व कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्या नेतृत्वात आयोजन करण्यात आले आहे.



---

# पक्षकार संघाचा उद्या कर्ज मुक्ती अभियान मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर -**
कर्जदार व जामीनदार यांच्या कायदेशीर न्याय हक्काच्या मागण्या संदर्भात पक्षकार संघाच्या वतीने २८ सप्टेंबर रोजी कर्ज मुक्ती अभियान मेळावा आयोजित करण्यात आल्याची माहिती बसवराज येरनाळे यांनी दिली.

राष्ट्रीयकृत बँका, को-ऑपरेटिव बँका, पतसंस्था इत्यादी वित्तीय संस्थांकडून उद्योग कर्ज, गृह कर्ज, व्यापार कर्ज, शेती कर्ज, वाहन कर्ज, शैक्षणिक कर्ज इत्यादी प्रकारचे कर्ज कर्जदारांकडून थकीत झाल्यामुळे बँकेमार्फत कर्जदार व जामीनदारांना मालमत्ता जप्तीची नोटीस पाठवणे अथवा मालमत्ता सील करणे अशा प्रकारच्या कारवाई होते. यामुळे हताश, हतबल व त्रस्त झालेल्या कर्जदार व जामीनदारांना त्यांचे कायदेशीर अधिकार व हक्क मिळणे संदर्भात पक्षकार संघाच्या वतीने शनिवार दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी समाज कल्याण केंद्र रंगभवन चौक सोलापूर येथे दुपारी साडेतीन वाजता कर्जमुक्ती अभियान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या मेळाव्यास माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, ॲड. ए. आर. जनवाडकर, ॲड. शिवानंद होरगिनमठ, ॲड. राजन दीक्षित, ॲड. गोविंद पाटील, ॲड. खतीब वकील, ॲड. आशितोष होरगिनमठ, ॲड. रोहिदास पवार, ॲड. सौ. उर्मिला जहागीरदार आदी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तरी सदर मेळाव्यास कर्जदार व जामीनदार यांनी उपस्थित राहावे असे आवाहन पक्षकार संघाचे राज्यसचिव बसवराज येरनाळे, मन्नूसिंग बाबावाले, सतीश शिंदे, सत्यनारायण गड्डम, सुरज बिलोरे, कल्पना शर्मा, जावेद शेख इत्यादींनी केले आहे.

---

# ऑस्ट्रेलियामधील आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये प्रा.लोखंडे 'विशेष तज्ञ'

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर -**
ऑस्ट्रेलिया मधील आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये प्रा.बी. जे.लोखंडे यांचा ''विशेष तज्ञ'' म्हणून सहभाग सोलापूर: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील भौतिकशास्त्र संकुलाचे संचालक प्रा. डॉ. बाळकृष्ण लोखंडे यांना क्वीन्सलंड युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी ब्रिस्बेन ऑस्ट्रेलिया येथे संपन्न होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये निमंत्रित व्याख्याता म्हणून व्याख्यान देण्याचा बहुमान मिळाला आहे.



ही आंतरराष्ट्रीय परिषद २५ ते २७ सप्टेंबर २०२४ रोजी संपन्न होणार आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये अनेक देशातील नामवंत संशोधकांचा सहभाग असणार आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेचा विषय ''प्रगत साहित्य संश्लेषण वैशिष्ट्यीकरण आणि अनुप्रयोग'' असा आहे. ऊर्जा साठवणूक आणि सुपरकपॅसिटर या विषयावरील सखोल संशोधन या मुळे प्रा. लोखंडे यांना हा बहुमान लाभला आहे.

आंतरराष्ट्रीय परिषदेतील या सहभागासाठी कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर सर, प्र कुलगुरू प्रा.लक्ष्मीकांत दामा , कुलसचिव योगिनी घारे तसेच सर्व सहकारी यांच्याकडून प्रा.लोखंडे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

---

# लोक अदालतीत ११ हजार मिळकत कर थकबाकीदारांची प्रकरणे

## ● ७० हजार ७२१ मिळकतदारांनी घेतली २० कोटींवर सुट

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**
महापालिकेकडून लोक अदालतीत सुमारे ११ हजार मिळकत कर थकबाकीदारांची तब्बल १०० कोटी रुपयांची प्रकरणे ठेवण्यात आली आहेत. दरम्यान, तत्पर भरणा आणि ऑनलाईन भरणा यामध्ये मिळणाऱ्या ५ टक्के आणि ६ टक्के या सूटसह मिळकत कर भरण्याच्या बुधवार शेवटच्या दिवसाअखेर शहरातील मिळकतदारांनी सूटसह ७० कोटी रुपयांचा कर महापालिकेच्या तिजोरीत जमा केला आहे.



महापालिकेकडून शहरातील सुमारे ११ हजार थकबाकी मिळकतदारांची प्रकरणे लोक अदालतीत ठेवण्यात आली आहेत. या लोक अदालतीत सहभाग घेऊन मिळकत कराची प्रकरणे निकाली काढल्यानंतर त्यांनाही सूट मिळण्याची संधी प्राप्त व्हावी यासाठी सूटसह मिळकत कर जमा करण्याची मुदत ३० सप्टेंबर पर्यंत वाढविण्याच्या हालचाली महापालिका प्रशासनाकडून सुरू आहेत.

यामुळे आणखी कर जमा होण्याची शक्यता आहे. यंदाच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील मिळकतकरांची बिले तयार करण्यास संगणक विभागाकडून उशीर झाल्याने वितरणासाठी देखील विलंब झाला अद्यापही मिळकत कराची बिले वाटण्याची प्रक्रिया महापालिकेच्या मालमत्ता कर विभागातील पथकाकडून सुरू आहे. या प्रक्रियेसाठी विलंब लागत असल्याने ऑगस्ट अखेरपर्यंत तत्पर भरणा आणि ऑनलाइन यावर पाच आणि सहा टक्के सूट देण्याची योजना २५ सप्टेंबर पर्यंत वाढविण्यात आली होती. या प्रक्रिये दरम्यानच वर्षानुवर्षे मिळकत कर थकबाकी असलेल्या ११ हजार मिळकतदारांची तब्बल १०० कोटी रुपयांची प्रकरणे लोक अदालतीत ठेवण्यात आली आहेत. या लोक अदालतीचे आयोजन महापालिकेच्या आवारात दि. २८ सप्टेंबर रोजी होणार आहे. यामुळे त्या मिळकतदारांमधून सूट मिळण्याची संधी लोकअदालतीनंतर आम्हालाही मिळावी अशी मागणी झाल्याने मालमत्ता कर विभागाकडून मुदतवाढ मिळण्याचा प्रस्ताव वरिष्ठांकडे सादर करण्यात आला असून यावर प्रशासन निर्णय घेणार आहे.

चालू आर्थिक वर्षातील मिळकत कर बिले वाटल्यानंतर शहर हद्दवाढ मधील २ लाख ६० हजार मिळकतदारांमधून ७० हजार ७२१ मिळकतदारांनी आज कार्यालयीन वेळेअखेर ६९ कोटी ७४ लाख रुपयांचा कर महापालिकेच्या तिजोरीत जमा केला आहे त्यांनी तत्पर भरणा पाच टक्के सूट आणि ऑनलाईन भरणे एक टक्के सूट अशामधून सुमारे २० ते २५ कोटी रुपयांवर सुट मिळविली आहे. दरम्यान, मागील वर्षाची थकबाकी असणाऱ्या मिळकतदारांच्या मिळकतीवर अथवा प्राप्त अधिकारानुसार अन्य कोणत्याही मिळकतीवर अटकावणी व जप्तीची कार्यवाही दि. १ ऑक्टोबर पासून करण्यात येणार आहे.

**● कटू कारवाई टाळण्यासाठी कर भरण्याचे आवाहन**
यानंतर मात्र थकबाकी मिळकतदारांवर सीलबंद कारवाई, घरगुती मिळकतदारांचे नळ जोड तोडण्याची आणि मोठ्या प्रमाणात थकबाकी असलेल्या मिळकतदारांची मालमत्ता जप्त करण्याची कारवाई महापालिका प्रशासनाकडून हाती घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. यामुळे आता थकबाकी मिळकतदारांनी तातडीने वेळेच्या आत आपला कर जमा करून सूटही घ्यावी तसेच आपल्यावरील कारवाई टाळावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

---









सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## पंढरपूरच्या उपोषणकर्त्यांचे संभाजीनगरच्या जात पडताळणी कार्यालयासमोर पुन्हा उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २६ सप्टेंबर-**

धनगर समाजाच्या एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी पंढरपूर येथील टिळक स्मारक मैदानात १६ दिवसाचे उपोषण स्थगित केल्यानंतर छत्रपती संभाजी नगर येथील जात पडताळणी कार्यालयाकडून खिल्लारी कुटुंबाचे जोपर्यंत दाखले रद्द होत नाहीत तोपर्यंत त्याच कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. परंतु त्या कार्यालयाकडून उपोषणकर्त्यांना गोलमाल उत्तरे दिली जात असून टाळाटाळ केली जात असल्याचे उपोषणकर्ते गणेश केसकर यांनी सांगितले.

धनगर समाजाच्या एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी अडथळा ठरलेले छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील खिल्लारी कुटुंबाचे बोगस दाखले रद्द करण्याच्या मागणीसाठी उपोषणकर्त्यानी जात पडताळणी विभागाच्या अधिकाऱ्यांची समक्ष भेट घेतली. त्यावेळी त्यांच्या चर्चेनुसार त्यांनी एक दिवसाचा वेळ मागून घेतला होता. परंतु आज पुन्हा त्यांनी शनिवारपर्यंत मुदत मागितले असून त्यामुळे चिडलेल्या उपोषणकर्त्यांनी जात पडताळणी कार्यालयासमोरच जोपर्यंत खिल्लारी कुटुंबाचे दाखले रद्द होत नाहीत तोपर्यंत कार्यालयासमोरच उपोषण सुरू केले आहे

# पंढरपुरात संततधार; पिकांसह भाजीपाल्यांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २६ सप्टेंबर-**

मोसमी नैऋत्य वाऱ्यांनी दिशा बदलली असून ते २४ सप्टेंबरला राजस्थान आणि गुजरातच्या बहुतांश भागातून माघारी परतण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात परतीच्या पावसाने हजेरी लावली. येत्या २५, २६ व २७ सप्टेंबरला राज्याच्या बहुतांश भागात मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आल्याची माहिती हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.

जिल्ह्यात पंढरपूर, मोहोळ, बार्शी, माळशिरस, मंगळवेढ्यासह अन्य तालुक्यातही पाऊस झाला. दरम्यान, हवामान विभागाने पुढील दोन दिवसही पावसाचा अंदाज वर्तवला आहे. पंढरपूर शहर व तालुक्यात मागील दोन दिवसापासून पावसाची संततधार सुरू असून शेती पिकाचे भाजीपाल्याचे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे. मान्सूनची दिशा बदलली असल्याने राज्यात होणारा पाऊस हा परतीचा आहे. तसेच महाराष्ट्रातून ३ ते १३ ऑक्टोबरदरम्यान मान्सूनची माघार पूर्ण होऊ शकते. मात्र हा कालावधी निश्चित नसतो. त्यामुळे २७ सप्टेंबरनंतरही पावसाची शक्यता कायम आहे, हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी सांगितले.

**पंढरपुर तालुक्यातील मंडलनिहाय पर्जन्यमान**

करकंब- ०६ मिमी, पटवर्धन कुरोली- ११ मिमी, भंडीशेगाव-०४ मिमी, भाळवणी- ०९ मिमी, कासेगाव - १३ मिमी, पंढरपूर- ०४ मिमी, तुंगत- १३ मिमी, चळे- ९.२ मिमी, पुळूज- १० मिमी, आजचा एकूण पाऊस ७९.२ मि.मी, सरासरी पाऊस ८.८ मि.मी.

# उजनीतून भीमा नदीत ३० हजार क्युसेक विसर्ग

## भीमाकाठी सावधानतेचा इशारा



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २६ सप्टेंबर-**

परतीचा मान्सून पावसाने उजनी पाणलोट क्षेत्रात जोरदार हजेरी लावल्याने उजनी धरणातून भीमानदीत ३० हजार क्युसेक विसर्गाने पाणी सोडण्यात आले आहे.

दौंड येथून सायंकाळी १० हजार ५०८ क्युसेक विसर्ग सुरू असून, पुणे जिल्ह्यातदेखील पावसाने जोरदार पुनरागमन केल्याने दौंड येथील विसर्गात वाढ होणार आहे.मात्र तीन दिवसांपासून भीमा खोऱ्यातील धरणक्षेत्रात जोरदार पाऊस सुरू असल्याने २४ रोजी सायंकाळी पाच हजार क्युसेकने पुन्हा सुरू करण्यात आला आहे. बुधवारी सायंकाळी हा विसर्ग ३० हजार क्युसेक करण्यात आला आहे.सध्या उजनी धरणातून उजनी मुख्य कालवा १ हजार ८०० क्युसेक, वीजनिर्मिती १ हजार ६००, दहीगाव ६० तर भीमा-सीना जोडकालव्यातून ४० क्युसेक विसर्ग सुरू आहे.

**उजनी धरणाची पाणीपातळी १०९.४५ टक्के**

सध्या उजनी धरणाची पाणीपातळी १०९.४५ टक्के असून, एकूण पाणीसाठा १२२.२९ टीएमसी असून ५८.६४ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा आहे. १ जूनपासून उजनी पाणलोट क्षेत्रात एकूण ४८७ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

## मातंग समाजातर्फे आज आ.शहाजीबापू पाटील यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २५ सप्टेंबर-**

सांगोला शहरात मातंग समाज स्मृतीभवन बांधण्यासाठी आ. शहाजीबापू पाटील यांनी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल सांगोला विधानसभा मतदारसंघातील सकल मातंग समाजाच्या वतीने आ. शहाजीबापू पाटील यांचा सत्कार समारंभाचे आयोजन शुक्रवारी २७ सप्टेंबर रोजी स.११ वा. सदानंद मल्टिपर्पज हॉल, मिरज रोड, सांगोला येथे करण्यात येणार आहे. यावेळी लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णूभाऊ कसबे, विधानपरिषदेचे नूतन सदस्य आ. अमित गोरखे, सामाजिक कार्यकर्ते अंकल सोनवणे यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन सकल मातंग समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

# संततधार पावसामुळे खरीप पिके धोक्यात

## ● पीकविमा कंपनीकडून तक्रारी फेटाळल्या; बळीराजांच्या हिताबाबत लोकप्रतिनिधी मात्र शांत

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २६ सप्टेंबर-**

दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे खरीप हंगामातील पिके धोक्यात आली आहेत. उडीद, भूईमूग, मूग, सोयाबीन, तूर यासह इतर अनेक पिकांची मुळे अतिरिक्त पावसामुळे कुजली असून उत्पन्नावर परिणाम होत आहे. पीक नुकसानीबद्दल विमा कंपनीकडे तक्रार केल्यानंतरही तक्रारीची दखल न घेता प्रस्ताव फेटाळण्यात येत आहेत. शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत असताना राजकीय नेते मात्र मूग गिळून गप्प असल्याने शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

गतवर्षी कमी पावसामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला होता. त्यामुळे यावर्षी शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत होते. रोहिणी व मृग नक्षत्राने पेरणीयोग्य हजेरी लावल्याने बहुतांश शेतकऱ्यांनी तूर, उडीद, मूग, सोयाबीन, भूईमूग व बाजरी पिकांची मोठ्या प्रमाणात पेरणी केली. अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात कांदा लागवड केली आहे. मात्र पुष्य, मघा व उत्तरा नक्षत्राच्या संततधार पावसामुळे व ढगाळ हवामानामुळे पिकांची मुळे कुजून पिके करपत आहेत. संततधार पावसामुळे भाजीपालाही करपून जात आहे. ढगाळ हवामानामुळे पिकांवर आळ्यांचे प्रादुर्भाव वाढले आहे. अनेक शेतकऱ्यांनी पावसातही पावसाची तमा न बाळगता उडीद पिकाची काढणी केली. मात्र उत्पन्न घटले. सोयाबीन व उडीद काढणीदरम्यान पावसाची रिपरिप असल्याने वाढीव मजुरीचाही भुर्दंड सोसावा लागला. भूईमुगाची मुळे कुजल्याने उत्पन्नावर परिणाम होणार आहे. पीकविमा कंपनीने शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामा



करून नुकसानभरपाई देण्याची मागणी होत आहे.

> पुष्य, मघा व उत्तरा नक्षत्राच्या संततधार पावसामुळे खरीप हंगामातील पिके धोक्यात आली आहेत. उडीद काढणी काळात पाऊस असल्याने महिला व पुरूषांना दोनशे ते तीनशे रूपये वाढीव मजुरी द्यावी लागली आहे. यावर्षी संततधार पाऊस शेतकऱ्यांसाठी हानिकारक ठरत आहे.
>
> **-अप्पासाहेब पाटील, माजी सरपंच, लवंगी**

मघा व उत्तरा नक्षत्राच्या संततधार पावसामुळे खरीप हंगामातील शेतकऱ्यांची भरवशाची पिके तूर व भूईमुगाचे नुकसान झाले. मुळे कुजल्याने पिके करपून जात आहेत. संततधार पावसामुळे पाच एकरावरील तुरीचे नुकसान झाले आहे. ढगाळ व कोंदट वातावरणामुळे पिकांवर रोगांचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

**-शिवपुत्र म्हेत्रे, प्रगतशील शेतकरी**

दक्षिण तालुक्यात मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांनी पीकविमा कंपनीकडे तक्रार केल्यानंतर विविध कारण सांगत तक्रार फेटाळत आहे. त्यामुळे राजकीय नेत्यांनी शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करण्याची गरज आहे.

**-श्रीकांत भरले, शेतकरी, हत्तूर**

## अधिकाऱ्यांकडून नुकसानग्रस्त पिकांची पाहणी



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ सप्टेंबर-**

बार्शी तालुक्यातील गौडगाव व उपळे दुमाला मंडळात गेल्या ६ ते ७ दिवसापासून पडत असलेल्या मुसळधार व सततच्या पावसाने सोयाबीन पिकाचे हजारो हेक्टर सोयाबीन पाण्याखाली गेले आहे.

या पिकाची पाहणी करण्यासाठी तहसीलदार एफ. आर. शेख व तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले यांनी गौडगाव व उपळे दुमाला मंडळातील पिकाची पाहणी केली. अनेक शेतकऱ्यांचे काढणीला आलेले सोयाबीन पीक पाण्यात गेले आहे तर काढून टाकलेल्या ढिगाऱ्याखाली पाणी साचले आहे. त्यामुळे लाखो शेतकऱ्यांना मोठा फटका सहन करावा लागला आहे. त्यामुळे हाता तोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून नेला असल्याने शेतकऱ्यांना खूप मोठी आर्थिक झळ यावर्षी सहन करावी लागणार आहे. शेती पिकाचे तर कधीही न भरुन येणारे नुकसान झाल्याने शेतकरी हतबल झाला असून त्याला आर्थिक मदतीची गरज आहे. तहसीलदार साहेबांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिले की, पिकाच्या पाहणीचा अहवाल तात्काळ जिल्हाधिकारी यांना पाठवतो. यावेळी गौडगाव मंडळ अधिकारी मनोजकुमार संकपाळ, सामाजिक कार्यकर्ते राहुल भड, अनिल यादव, युवराज काजळे, बालाजी भड, चिंटू देशमुख, संपत भड, मदन ननवरे, लक्ष्मण लाटे, कृषी सहाय्यक ए. एफ. शिंदे आदी उपस्थित होते.

# क्रीडा



## छत्रपती शिवाजी रात्र प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्चस्व

**शालेय शहर धनुर्विद्या स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**

शालेय धनुर्विद्या स्पर्धेत छत्रपती शिवाजी रात्र प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंनी वर्चस्व प्राप्त केले.

धनुर्विद्या प्रशिक्षण केंद्र कुमठा नाका येथे झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन मनपा क्रीडा अधिकारी श्रीकांत घोलप, क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, विद्यापीठ सिनेट सदस्य प्रा. सचिन गायकवाड, प्रा. संतोष गवळी, एनसीसी १३ बटालियनचे विशेष अधिकारी जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी भारतीय संघात निवडलेल्या साईराज हानमे व प्रशिक्षक दीपक चिकणे यांचा सत्कार करण्यात आला.

**अंतिम निकाल (प्रथम तीन) : रिकर्व्ह :** १४ वर्ष मुले) नमन साखरे (इंडियन मॉडेल स्कूल),योगीराज शिंदे (लिटिल फ्लॉवर स्कूल ), स्वराज्य केत (मॉडेल पब्लिक स्कूल). मुली : सर्वज्ञा गाढवे (पोलीस पब्लिक स्कूल), देवयानी तिवारी (मॉडेल पब्लिक स्कूल ) कार्तिकी दाभाडे (व्हीएम मेहता स्कूल). १७ वर्षे मुले : स्वराज्य लोकरे (केएलई स्कूल), उत्तरेश्वर काळे, अथर्व चव्हाण (दोघे छत्रपती शिवाजी रात्र). मुली : प्रगती शिंदे (लिटिल फ्लावर स्कूल) वेदिका गुर्रम (अरिहंत स्कूल), मानसी पाटोळे (सेवासदन). १९ वर्ष मुले : साईराज हानमे, सिद्धार्थ साखरे (छत्रपती शिवाजी रात्र), सुमित ढवण (निर्मलाताई ठोकळ प्रशाला). मुली : मेहेक पठाण (छत्रपती शिवाजी)

**कंपाऊंड :** १४ वर्षे मुलेः आदित्य पवार (व्हि.एम.मेहता स्कूल), नयन साखरे (इंडियन मॉडेल स्कूल), सृजन कीर्तीकर (नागेश करजगी स्कूल). मुली : जानवी पाटोळे (सेवासदन स्कूल), स्वरा खरात (मॉडेल पब्लिक स्कूल). १७ वर्ष मुले : स्वरीत धवन (बीएफ दमाणी) जय जाधव (आसावा प्रशाला), ओम टाकले (निर्मलाताई ठोकळ प्रशाला). मुली : समिधा चव्हान (निर्मलाताई ठोकळ प्रशाला), वैभवी निकम (श्री महालक्ष्मी प्रशाला). १९ वर्षे मुले : ओम शेळके (निर्मलाताई ठोकळ प्रशाला), गणेश शासन (छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय), गणेश शरणार्थी (छत्रपती शिवाजीरात्र कनिष्ठ महाविद्यालय). मुली : प्रेरणा हरिदास, सानिया भगवान, सिद्धी सोनटक्के (छत्रपती शिवाजी रात्र कनिष्ठ महाविद्यालय)

**इंडियन राउंड :** १४ वय वर्षे मुली : विद्या लोहार, जीविका कोरे (बी.एफ दमाणी), वैष्णवी पोळ (छत्रपती शिवाजी प्रशाला). १७ वर्ष मुले : प्रतीक पाटील, दर्शन शेळके (निर्मलाताई ठोकळ प्रशाला),जॅक भार्डे (छत्रपती शिवाजी प्रशाला). मुली : साक्षी वाघमारे (सेवासदन), दिपाली माने (छत्रपती शिवाजी). १९ वर्ष मुले : पवन कमलापुरे, सोहम हरिहर, विवेक सिंह लिखित (छत्रपती शिवाजी रात्र). मुलीः रोशनी चव्हाण, प्रिया दुधनी (दोघी छत्रपती शिवाजी रात्र).

# सोलापुरात रणजीसह चार क्रिकेट सामने होणार

## सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे चेअरमन रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**

येथील जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे गेल्या ३ महिन्यात महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वरिष्ठ पुरुष गटाच्या रणजी संभाव्य संघातील खेळाडूंचे सराव शिबिर तसेच विदर्भ संघासोबतचे सराव सामने व त्या पाठोपाठ वरिष्ठ महिलांच्या टी-२० सराव सामन्यासोबत २३ वर्षाखालील मुलांचे सराव सामन्याचे उत्तम आयोजन नियोजन लक्षात घेता महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने मागील वर्षाप्रमाणे यावर्षी देखील २०२४-२५ या सिझनसाठी बीसीसीआयच्या देशांतर्गत



विविध गटातील ४ सामने आयोजनाची संधी सोलापूर दिली असून हे सर्व सामने येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर होणार असल्याची माहिती जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सु यांनी कळविले आहे. महाराष्ट्राच्या या ४ सामन्यात देशातील प्रसिद्ध अश्या रणजी स्पर्धेतील दुसऱ्या सत्रातील १ सामना, २ सामने १९ वर्षाखालील मुलांच्या कूच बिहार स्पर्धेतील आणि १ सामना २३ वर्षाखालील मुलांच्या सी के नायडू स्पर्धेतील आहे.

सोलापूर महापालिकेचे वतीने गेल्या दोन वर्षांपूर्वी नव्याने व अद्ययावत करण्यात आलेल्या इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवरील हिरव्यागार खेळपट्टीवर गेल्या वर्षी देखील बीसीसीआयचे ४ सामने झाले होते. पैकी २ रणजी आणि १-१ सामने हे कूच बिहार व सी. के. नायडू स्पर्धेतील होते. पैकी ३ सामने महाराष्ट्राने जिंकले होते. अश्याच प्रकारचे आणखी एक मैदानासाठी जागा महापालिकेच्या वतीने सोलापूरात उपलब्ध झाल्यास सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे वतीने महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन मार्फत योग्य ते मैदान, खेळपट्टी व व्यवस्था करून जास्तीत जास्त बीसीसीआयचे सामने घेण्याचे प्रयोजन असल्याचे तसेच भर पावसाळ्यात देखील सोलापूरात कमी पाऊस आणि पाऊस झाला तरी पाण्याचा निचरा लवकरात लवकर होण्याची जी सुविधा सोलापुरातील इंदिरा गांधी ह्या शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या स्टेडियम वर असल्याने भविष्यात भारतीय संघाचे सराव शिबिर-सराव सामने देखील सोलापूरात होऊ शकतात.

त्यामुळे सोलापूर महापालिकेच्या वतीने अश्या उपयुक्त जागेची पूर्तता केल्यास राज्य क्रिकेट संघटनेचे युवा अध्यक्ष आमदार रोहित पवार यांचे नेतृत्वात अपेक्स कौन्सिल सदस्य यांचे मार्गदर्शन व जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे चेअरमन आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, सचिव खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रयत्नाने नवीन मैदान लवकरात लवकर तयार करू शकतो अशी आशा जिल्हा संघटनेचे पदाधिकारी, माजी खेळाडू, राज्य निवड समिती सदस्य, राज्य खेळाडू यांनी व्यक्त केली असून मनपा आयुक्त यांनी याविषयी योग्य ती मदत करावी, अशी अपेक्षा सोलापूरकरांना आहे.

**असे होणार सोलापुरातील रणजी सामने**

६ ते ९ नोव्हेंबर : १९ वर्षाखालील महाराष्ट्र विरुद्ध केरळ.
२० ते २३ नोव्हेंबर : १९ वर्षाखालील महाराष्ट्र विरुद्ध आसाम.
२५ ते २८ जानेवारी :२३ वर्षाखालील महाराष्ट्र विरुद्ध चंदीगड.
३० जाने ते २ फेब्रुवारी : रणजी महाराष्ट्र विरुद्ध त्रिपुरा.



## तिवारी व खरातची धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**

शालेय शहर धनुर्विद्या स्पर्धेत १४ वर्षाखालील गटात मॉडेल पब्लिक स्कूलच्या देवयानी तिवारी हिने रिकर्व्ह प्रकारात व स्वरा खरात हिने कंपाउंड प्रकारात द्वितीय क्रमांक पटकविला व या कामगिरीच त्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक रविकिरण आवटे व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक दिपक चिकणे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका अदिती कुलकर्णी व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

# वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयास विजेतेपद

## सोलापूर विद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धा : वैयक्तिक गटात रिद्धी उपासे व रजत आडम अजिंक्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ सप्टेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत महिला गटात रिद्धी उपासे हिने सहापैकी सहा गुण प्राप्त करत तर पुरुष गटात वालचंद अभियांत्रिकीच्याच आंतरराष्ट्रीय गुणांकनप्राप्त रजत आडम याने ६.५ गुणांसह अजिंक्यपद पटकाविले. तसेच सांघिक स्पर्धेत मुलात वालचंद इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलजीने स्पर्धेत वर्चस्व राखत मुले व मुलीत विजेतेपद पटकाविले.

ब्रह्मदेवदादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी बेलाटी व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या स्पर्धेचा समारोप ब्रह्मदेवदादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर प्रा. राहुल माने, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, प्राचार्य एस. जी. कुलकर्णी, क्रीडा संचालक गोकुळ यादव, आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ पंच सुमुख गायकवाड, स्पर्धेचे सचिव नागनाथ पुदे, क्रीडा संचालक अशोक पाटील आदींच्या उपस्थितीत झाला. स्पर्धेत प्रमुख पंच म्हणून वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे, युवराज पोगुल, विजय पंगुडवाले यांनी काम पाहिले. या बुद्धिबळ स्पर्धेत विविध महाविद्यालयातील १३० खेळाडूंनी सहभाग नोंदविला असून प्रेक्षणीय लढती पहावयास मिळाल्या. या स्पर्धेसाठी संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार दिलीप माने, संस्थेचे उपाध्यक्ष पृथ्वीराज माने, सचिवा जयश्रीताई माने, विश्वस्त स्नेहल माने यांचे मार्गदर्शन लाभले.



**अंतिम निकाल (अनुक्रमे १ ते ६, गुण व बोकोल्स गुणांसह) : वैयक्तिक - पुरुष :** रजत आडम (७) तेजस दौंडे (६,३०, सांगोला कॉलेज), पल्लव चौधरी (६,२८, वालचंद अभियांत्रिकी), पृथ्वीराज वाघमोडे (६,२७.५,डी. एस. गरड कॉलेज मोहोळ), प्रज्वल कोरे (५.५, ३३.५,हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स), अभिजीत गोरे ( ५.५, ३१.५, छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय) **महिला :** रिद्धी उपासे (६), वृंदाक्षी बुरांडे (५, २२, उमा महाविद्यालय पंढरपूर), नेहा झिरपे (५,१८.५, स्वेरी,पंढरपूर), प्रिती धुळे (५,१८, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स), मयूरी कोरे (४.५, एस. बी. पाटील महाविद्यालय मंद्रुप), तृप्ती शिंदे (४,२२.५,श्री. संत दामाजी महाविद्यालय मंगळवेढा).

**सांघिक- पुरुष :** वालचंद अभियांत्रिकी (८ गुण), संगमेश्वर महाविद्यालय (५,३०.५), बी.एम.आय.टी. कॉलेज बेलाटी (५,२६). **महिला :** वालचंद अभियांत्रिकी (५, ८ गुण), हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स (५, ५ गुण). स्वेरी, पंढरपूर (४).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


स्वच्छता ही सेवा 2024
स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता

INVEST MADHYA PRADESH
ग्लोबल इन्वेस्टर्स समिट
7-8 फरवरी 2025, भोपाल

MPIDC
MP INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION LTD.
MSME
MADHYA PRADESH
The heart of Incredible India

नया भविष्य गढ़ता मध्यप्रदेश...



रीजनल इंडस्ट्री कॉन्क्लेव, सागर

शुभारंभ
डॉ. मोहन यादव
मुख्यमंत्री, मध्यप्रदेश
द्वारा
27 सितंबर, 2024 | पूर्वाह्न 10:00 बजे
जवाहरलाल नेहरू
पुलिस अकादमी ग्राउंड, सागर



नरेन्द्र मोदी, प्रधानमंत्री



डॉ. मोहन यादव, मुख्यमंत्री

मुख्य बिंदु ▶ 3500+ प्रतिभागी | वन-टू-वन मीटिंग | बायर-सेलर मीटिंग | सेक्टर आधारित सत्र | औद्योगिक इकाइयों हेतु भूमि आवंटन | एक जिला एक उत्पाद (ODOP) पर कार्यशाला | राउंड टेबल मीटिंग | वर्चुअल भूमिपूजन एवं लोकार्पण

फोकस एरिया ▶ पेट्रोकेमिकल्स | नवीकरणीय ऊर्जा | कृषि, डेयरी और खाद्य प्रसंस्करण | कपड़ा और परिधान | माइनिंग और खनिज | हथकरघा और हस्तशिल्प | पर्यटन

"प्रगति के पथ पर अग्रसर बुन्देलखण्ड"

Website : invest.mp.gov.in

सीधा प्रसारण @Cmmadhyapradesh @jansampark.madhyapradesh @Cmmadhyapradesh @jansamparkMP JansamparkMP

EY Building a better working world Knowledge Partner | CII Confederation of Indian Industry National Partner

MPIDC(@MPIDC)/Twitter MP Industrial Development Corporation (MPIDC) MPIDC I Facebook MPIDC (@mpidc_gomp) MPIDC - YouTube

मध्यप्रदेश जनसम्पर्क द्वारा जारी
आकल्पन : म.प्र. माध्यम/2024

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अक्कनबळग महिला मंडळातर्फे उद्यापासून मैत्रीण प्रदर्शन व विक्री

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**

अक्कनबळग महिला मंडळाच्यावतीने दि. २८ व २९ सप्टेंबर २०२४ रोजी सोलापुरात लिंगशेट्टी मंगल कार्यालय येथे सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत हे मैत्रीण प्रदर्शन व विक्री सर्वांसाठी खुले असल्याची माहिती सचिवा रंजीता चाकोते पत्रकार परिषदेत दिली.

अनेक महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व योग्य दिशा मिळावी या हेतूने मंडळाने हे मैत्रीण प्रदर्शन व विक्री उपक्रम आयोजित केला आहे. शनिवार दि. २८ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता या प्रदर्शनाचे उद्घाटन उमा काडादी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या प्रदर्शनात विविध प्रकारचे कपडे, दागिने, होम डेकोरेशन, बॅग, स्किन केअर, हेल्थ केअर, चप्पल, गिफ्ट, गोल्ड, सिल्वर, डायमन्ड ज्वेलरी, गिफ्ट, आर्टिकल्स तसेच खाद्यपदार्थ यासह सुमारे६५ स्टॉल्स उपलब्ध राहणार आहेत. अक्कन बळग मंडळ हे वीरशैव लिंगायत महिलांचे सर्वात जुने मंडळ असून साठ वर्षांपूर्वी स्थापना झाली. प्रदर्शनाचे हे सातवे वर्ष आहे. वर्षभर हे मंडळ सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक असे अनेक उपक्रम राबवित असते, असे सचिवा रंजीता चाकोते यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस सुरेखा बावी, विद्या जोडभावी, निर्मला किणगी, अंबिका लिगाडे, सुरेखा घटोळे, स्मिता नाईक आदी उपस्थित होते.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### कुराण मानवतेसाठी मार्गदर्शन मोहिमेस सुरुवात

**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**

पवित्र कुराण काय आहे. कुराणचे महत्त्व आणि आज समाजामध्ये शांतता आणि मानवता नांदण्यासाठी त्याचे महत्त्व काय आहे यासाठी स्टुडन्ट इस्लामिक ऑर्गनायझेशन ऑफ इंडियातर्फे कुराण मानवतेसाठी मार्गदर्शन मोहीम सुरु झाली आहे. ही मोहिम ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत राबविण्यात येत आहे, अशी माहिती प्रदेश अध्यक्ष एहतेशाम खान यांनी पत्रकार परिषदेत दिली. या दरम्यान सोलापूर शहरातील विविध शाळा आणि महाविद्यालयांमधून या मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. लोक जसे भौतिक प्रगतीच्या मार्गावर जात आहेत. अध्यात्मिकता आणि संस्कृती पासून दूर होत चालले आहेत. मानवी आयुष्यातील प्रगती हे तेव्हाच शाश्वत असू शकते जेव्हा त्यासाठी घेतलेल्या मार्गदर्शनाचा स्त्रोत शाश्वत असेल. यासाठी पवित्र कुराण मधील विविध गोष्टी उलगडून सांगण्यात येणार आहेत. या मोहिम अंतर्गत शाळा - महाविद्यालयांमध्ये व्याख्याने तर होणारच आहेत. ज्यामध्ये विविध क्षेत्रातील अधिकारी पोलीस प्रशासन पत्रकार डॉक्टर वकील विविध संस्थांचे मान्यवर विचारवंत आणि जनतेचा सहभाग असणार आहे. तसेच या उपक्रमाची माहिती शहरवासीयांना मिळावी यासाठी मानवी साखळीचे आयोजन करण्यात आले. तसेच समाजातील मान्यवरांना मराठीमध्ये अनुवाद केलेली कुराणची प्रत भेट दिली जाणार आहे, असे एहतेशाम खान यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस मसुद्दीक खान, उजेर अहमद रंगरेज, अशपाक पठाण, अशपाक अहमद, उसेब अहमद आदी उपस्थित होते.

### घरखर्चासाठी पैसे मागितल्याने पत्नीला दगडाने मारहाण

**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर -**

घरखर्चासाठी पैसे मागितल्याने पत्नीला पतीकडून दगडाने मारहाण करण्यात आली. पुष्पा अजय शिंदे (वय २४, रा. अंबिका नगर, बाळे, सोलापूर) असे जखमी पत्नीचे नाव असून त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत.



२६ सप्टेंबर रोजी सकाळी पुष्पा शिंदे यांनी घरी पती अजय यांस घरखर्चासाठी पैसे मागितले. त्यावेळी अजयने दगडाने पुष्पा हिस मारहाण करून लाथाबुक्क्याने मारहाण केल्याने त्या जखमी झाल्या. त्यामुळे त्यांना उपचारासाठी मावशी विजयालक्ष्मी यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### सासरवाडीत जावयास मारहाण

**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर -**

सोलापूर - बायकोची डिलीव्हरी झाल्याने तिला भेटण्यासाठी सासरवाडीला आलेल्या जावयास मारहाण करण्यात आली. किरण अरूण पवार (वय २४, रा. राळेरास, ता. बार्शी) असे जखमीचे नाव असून त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत.



किरणची बायको डिलीव्हरी झाल्याने तो सोलापूरातील सेटलमेंट कॉलनीतील अंबाबाई मंदीराजवळील सासूच्या घरी आला होता. २५ सप्टेंबरला सायंकाळी मागील भांडणाचा राग मनात धरून मायकल चव्हाण, वैशाली चव्हाण व इतर दोन जणांनी किरण यास लाथाबुक्क्यांनी मारहाण करून विषारी औषध पाजले. त्यामुळे किरण यास त्रास होऊ लागल्याने त्यास आई आशाबाई यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पतीकडून पत्नीस मारहाण

**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर -**

आचेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे पतीबरोबर वाद झाल्याने पतीने केलेल्या मारहाणीत पत्नी जखमी झाली. वनिता दादाराव सोनकांबळे (वय ४५) असे जखमी पत्नीचे नाव असून त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी घरी पतीबरोबर वाद झाल्याने वनिता यांना पतीने विटाने व लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. वनिता यांना उपचारासाठी नातेवाईक ऋषिकेश सर्वगोड यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# नको ऽऽ नको रे पावसा, असा अवेळी धिंगाणा!

**● सोलापूर @६१७ मिमी ● सोयाबीन, कांद्यासह अन्य पिके संकटात ● उत्तरानंतर आता हस्तही बरसण्याचा अंदाज**

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**

राज्याला गेले ३ महिने झोडपून काढणारा पाऊस आता परतीच्या प्रवासातही रौद्र स्वरुप धारण करत आहे. परत जाणारा उत्तरा नक्षत्रातील पाऊस सोलापूर जिल्हाच नाही तर अवघ्या राज्यात सध्या धुमाकूळ घालू लागल्याने सर्वत्र पावसाचीच चर्चा सुरू आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे विजांच्या कडकडाटासह मुसळधार पडत असून, हवामान विभागाकडून अनेक जिल्ह्यांना अलर्ट जारी करण्यात आला आहे. आता सोलापूर शहर आणि जिल्ह्यात हा पाऊस दिवस-रात्र हजेरी लावू लागल्याने नको ऽऽ नको रे पावसा, असा अवेळी धिंगाणा असे म्हणण्याची वेळ सर्वांवर आली आहे. इतकेच नाही तर खरिपातील सोयाबीन, कांदा आणि अन्य पिकेही संकटात सापडल्याने हातातोंडाशी आलेला घास हातातून जातो की काय? याची भीती शेतकरी बांधवांना वाटत आहे.

सोलापूर शहरातही आज दिवसभर कमी-जास्त प्रमाणात पाऊस पडल्याने अवघे जनजीवनच विस्कळीत झाले आहे. शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी आणि चाकरमान्यांचेही अनेक ठिकाणी पाणी साचल्याने हाल होत आहेत. दुचाकीसह अन्य वाहनांनाही तारेवरची कसरत करावी लागत आहे. वायव्य राजस्थान आणि कच्छ परिसरातून यंदा सात दिवस उशिराने पावसाचा परतीचा प्रवास सुरू झाला आहे. राज्यात पुढील चार दिवस मुसळधार पावसाची शक्यता असून मराठवाडा, विदर्भातील काही जिल्ह्यांत जोरदार पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. यंदा रोहिण्या, मृग, आर्द्रा, आश्लेषा, पुष्य, पुनर्वसू, मघा, पूर्वा, उत्तरा या सर्वच नक्षत्रातील सरी बसरल्या. यातील एकदोन नक्षत्रात पावसाने विश्रांती घेतली असली तरी मघा उत्तराने यात भरीव कामगिरी केली आणि गुरूवारी रात्रीदीडपासून हस्त नक्षत्राच्या पाऊसधारा बसरणार आहेत. दरम्यान, पावसाचा जोर असाच राहिला तर खरिपातील हातातोंडाशी आलेली पिके वाया जाण्याची भीती जाणकार शेतकरी वर्तवित आहेत.





### सोलापूरला यलो अलर्ट

विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पुढील चार दिवस मुसळधार पावसाचा अंदाज आहे. पालघर, ठाणे, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, नगर, पुणे, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, लातूर, धाराशीव, अमरावती, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा, वाशीम, यवतमाळ या जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. यामुळे पावसाची संततधार सुरूच आहे. या आठवड्यात कधीही पाऊस कोसळत असल्याने सोलापूर शहरातील अनेक नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याच्याही घटना घडल्या आहेत. तर या परतीच्या पावसाचा जोर आणखी वाढणार असल्याचा, इशारा हवामान विभागाकडून देण्यात आलाय.



**जिल्ह्यात आजतागायत सरासरी ६१७ मिमी पाऊस :** शहर-जिल्ह्यात गुरूवार (दि. २६) सकाळपर्यंत सरासरी ६१७.३ मिमी पाऊस झाला आहे. तालुकानिहाय पाऊस पाहता उत्तर सोलापूर तालुक्यात ६३८.४ मिमी, दक्षिण सोलापूर ५८१.२, बार्शी ८०७.२, अक्कलकोट ६०८.१, मोहोळ ७१४.२, माढा ७१४.७, करमाळा ६४७.७, पंढरपूर ५६३.७, सांगोला ५७८.५, माळशिरस ४०२.६ आणि मंगळवेढा तालुक्यात ५३२.६ मिमी इतका पाऊस झाला आहे. तर जिल्ह्यात ६१७.३ टक्के पाऊस झाला आहे. जिल्ह्यात सर्वाधिक पावसाची नोंद बार्शी तालुक्यात आहे तर त्या खालोखाल मोहोळ, माढा येथे आहे आणि सर्वात कमी पाऊस माळशिरस तालुक्यात आहे. काही झाले तरी या भारी पावसामुळे जिल्ह्यातील उजनीसह मध्यम प्रकल्प, साठवण तलाव, पाझर तलाव, नदी-नाले, विहिरी ओसंडून वाहत आहेत.

**द्राक्ष बागायतदार यंदा येणार संकटात :** यंदा अती पावसामुळे द्राक्ष उत्पन्नात आघाडीवर असलेल्या नाशिक विभागातील द्राक्षबागांच्या ऑगस्ट ते सप्टेंबरमध्ये होणाऱ्या छाटण्या लांबल्या आहेत. याचबरोबर पुणे विभागाचा पट्टाही छाटणीत मागेच आहे. यामुळे सोलापूर, धाराशिव, लातूर विभागातील द्राक्षबागांच्या छाटण्याबरोबर नाशिक, पुणे पट्ट्यातील बागांच्या छाटण्या होवून द्राक्ष उत्पन्न एकदम बाजारात आल्याने प्रचंड कमी भाव मालाला सापडणार आहे. जशा बागांच्या छाटण्या लांबतील तसतशी या बागांना अवकाळी पावसाचीही भीती निर्माण होणार आहे. यामुळे द्राक्ष बागायतदार कमालीचे आर्थिक अडचणीत येण्याची शक्यता आहे.

- **हणमंत गवळी,** संचालक, द्राक्ष बागायदार संघ, पुणे विभाग

**रब्बी पेरणीही लांबण्याची भीती :** दरवर्षी मंगळवेढा, सांगोला आणि बार्शी तालुक्याच्या काही भागात हस्त नक्षत्राचा पाऊस पडला की, रब्बी हंगामातील ज्वारीची पेरणी होते. यंदा मात्र हस्त नक्षत्र निघाले तर अजून पाऊस उघडीच देत नाही. यामुळे यावर्षी रब्बी हंगामातील पेरणीसाठी वापसा लवकर होणार नसल्याने जिल्ह्यातील बळीराजा उशिरानेच तिफणीवर हात ठेवणार आहे. आता पावसाने उघडीप दिल्यास दसरा-दिवाळीस पेरणी मोठ्या प्रमाणात होईल.

- **राजकुमार मोरे,** कृषी उपसंचालक सोलापूर

## हद्दवाढ भागाच्या विकासासाठी आ. सुभाष देशमुख यांनी दिला निधी

### बिनबुडाच्या आरोपाद्वारे प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न : केंगनाळकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**

भाजपचे आ. सुभाष देशमुख यांनी हद्दवाढ भागाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला. वैयक्तिक स्वार्थासाठी देशमुख यांच्यावर बिनबुडाचे आरोप करुन त्यांची प्रतिमा मलिन केली जात आहे. हद्दवाढ विभागाच्या विकासासाठी आम्ही सदैव आ. सुभाष देशमुख यांच्या पाठीशी आहोत, अशी भूमिका माजी नगरसेवक बसवराज केंगनाळकर यांनी पत्रकार परिषदेत मांडली.



आ. सुभाष देशमुख यांनी प्रभाग क्रमांक १९ मध्ये मूलभूत सोयी सुविधांसाठी २२ कोटी पेक्षा जास्त निधी दिला. केंद्र शासनाच्या अमृत योजनेअंतर्गत १३० किलोमीटरचे भुयारी गटार योजना राबविण्यासाठी या भागातील विविध नगरात त्यांच्या प्रयत्नातून कामे केली. अनेक कामे केले असतानाही भाजप पक्षातील माजी नगरसेवक, महापालिकेच्या माजी पदाधिकारी यांनी वैयक्तिक स्वार्थासाठी आ. देशमुख यांच्यावर बिनबुडाचे आरोप केले आहेत. संबंधितांनी प्रत्यक्ष येऊन काम पाहूनच बोलावे. भाजपला बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे. पक्षाच्या वरिष्ठांनी या घटनेची दखल घेऊन संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी माजी नगरसेवक व काही पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत केली. या पत्रकार परिषदेत व्यंकटेश कोंडी, नागनाथ शिवसिंगवाले, अर्जुन जाधव, अर्चना वडनाल , आनंद गदगे आदी उपस्थित होते.

## जिल्ह्यातील मतदार यादीत आपल्या नावाची खात्री करा!

**● जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद**

### ३७ लाख ६३ हजार ७८९ जिल्ह्यात मतदार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्ह्याची अंतिम मतदार यादी दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असून, यामध्ये ३७ लाख ६३ हजार ७८९ इतकी एकूण मतदार संख्या आहे. या अंतिम मतदार यादीमध्ये आपले नाव आहे किंवा नाही याची मतदारांनी खात्री करावी, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.



दि. ६ ऑगस्ट २०२४ च्या प्रारुप मतदार यादीमध्ये एकूण ३६ लाख ९२ हजार ४०९ इतकी असून, यामध्ये पुरूष १९ लाख ८ हजार १४६, महिला १७ लाख ८३ हजार ९६६ व इतर २९७ मतदाररांचा समावेश होता. दि.३० ऑगस्ट २०२४ च्या अंतिम मतदार यादीमध्ये एकुण ३७ लाख ६३ हजार ७८९ इतकी असून यामध्ये पुरूष १९ लाख ३५ हजार ९७९, महिला १८ लाख २७ हजार ५०८ व इतर ३०२ मतदारांचा समावेश आहे. यामध्ये ७५ हजार ८२४ इतक्या मतदारांची वाढ झालेली आहे. जिल्ह्यातील वयोगटानुसार आकडेवारी २०-२९ अनुमानीत संख्या ९ लाख ४५ हजार ५०५ टक्केवारी २७.९३%, अतिम रोल २३ जोनवारी २०२४ पर्यंत ६ लाख ९० हजार २५३ टक्केवारी १९.२९%, दुसरा एसएसआर रोल ६ ऑगस्ट २०२४ पर्यंत ७ लाख ४३ हजार ३०९ टक्केवारी २०.१३%, फायनल रोल २३ जानेवारी २०२४ पर्यंतची संख्या ७ लाख ७३ हजार ८४३, २०.५६%.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये एकूण ३ हजार ६१७ मतदान केंद्र होती. यामध्ये मतदान केंद्राचे सुसुत्रीकरण करून १२४ मतदान केंद्राची नव्याने वाढ होवून मतदान केंद्राची संख्या ३ हजार ७२३ झालेली आहे. एकुण ३ हजार ७२३ मतदान केंद्रांपैकी शहरी १ हजार १७७ व ग्रामीण भागामध्ये २ हजार ५४६ मतदान केंद्राचा समावेश आहे.

**मतदारांनी ऑनलाईन नोंदणी करावी-**

ऑनलाईन मतदार नोंदणीसाठी मतदारांनी www.voters.eci.gov.in या संकेतस्थळावरून मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करू शकतात. मतदार यादीसंदर्भात काही माहिती आवश्यक असलेल्या अथवा काही दुरूस्ती असल्यास संबंधित सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार कार्यालयाशी संपर्क साधावा, असे जिल्हा निवडणूक प्रशासनामार्फत कळविण्यात येत आहे.

## सोलापुरात आजपासून बीबीएन कलाउत्सव प्रदर्शन व विक्रीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर**

ब्राह्मण बिझनेस नेटवर्क (बीबीएन)सोलापूर शाखेच्या वतीने दि. २७ ते २९ सप्टेंबर २०२४ दरम्यान बीबीएन कला उत्सव २०२४ या प्रदर्शन तसेच विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संयोजिका आश्लेषा निपुणगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

व्यावसायिक महिला उद्योजिकाना एक हक्काचे व्यासपीठ देण्याचा प्रयत्न कला उत्सव २०२४ च्या माध्यमातून करण्यात येणार आहे. सोलापुरात सिध्देश्वर मंदिराजवळील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत या प्रदर्शन भरविण्यात येत आहे. कला उत्सवाचे यदाचे हे ७ वे वर्ष आहे.

शुक्रवारी दि. २७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता खा. प्रणिती शिंदे, प्रीसिजनच्या डॉ. सुहासिनी शहा, डॉ. मीना गुंजोटीकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. खास महिलांनी महिलांसाठी आयोजीत केलेल्या या प्रदर्शनात आपटे दूध, इलेक्ट्रॉनिक्स - होम अप्लायसेन्स, इमिटेशन ज्वेलरीज, कुंदन ज्वेलरी वैविध्यपूर्ण साड्या, गिफ्ट आयटम्स, ड्रेस, सायकल, डिझायनर ब्लाऊज, लहान मुलांचे ड्रेस, किचन ट्रोली, विविध प्रकारचे मसाले, पूजा साहित्य शेती व घरगुती पम्प्स, गोधन उत्पादने, विविध प्रकारचे मसाले, केक, टूर्स व ट्राव्हल, फराळाचे विविध पदार्थ, आयुर्वेदिक उत्पादने, कुरुड्या, पापड, कॉस्मेटिक, मसाजर, बिल्डर व डेव्हलपर खाद्यपदार्थ यासह इतर अनेक गोष्टीच्या स्टॉल्सचा समावेश राहणार आहे. प्रदर्शनात आकर्षक ऑफर्स, दररोज लकी ड्रॉ कूपन शेवटच्या दिवाणी रायडर सायकलतर्फे सायकल बंपर लकी ड्रॉ कूपन देण्यात येणार आहे. असेही आश्लेषा निपुणगे यानी सांगितले.

या पत्रकार परिषदेस पृथा हलसगीकर, मानसी कुलकर्णी, मनीषा औरंगाबादकर आदी उपस्थित होते.

# सुवर्णपदक विजेता मल्ल वाल्मिक माने राखताहेत शेळ्या

**● सोलापूर जिल्हा क्रीडा कार्यालयाचे दुर्लक्ष**

**तभा वृतसेवा, ॲड.विजयकुमार जाधव**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**

मोहोळ तालुक्यातील हराळवाडी येथील कुस्तीपटू वाल्मिक माने यांनी कुस्तीमध्ये राज्याचे व देशाचे नाव मोठे केले. त्यांनी पदके जिंकत देशाला सन्मान मिळवून दिला. मात्र, नंतरच्या काळात त्यांना कुठलीही शासकीय मदत मिळत नाही. त्यामुळे त्यांना अत्यंत हालाखीचे जीवन जगावे लागते. देशपातळीवर कुस्तीचे मैदान मारून सुवर्णपदक मिळवलेल्या माने यांच्यावर आज शेळ्या राखून संसाराचा गाडा चालविण्याची वेळ आली आहे.

मल्ल माने यांनी १९७९ साली शिमला येथे झालेल्या रेसलिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या कुस्ती स्पर्धेत देशपातळीवर चौथा तर महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या स्पर्धेत राज्य पातळीवर सुवर्णपदक पटकावले होते. काळाच्या ओघात माने यांच्यावर हालाखीचे जीवन जगण्याची वेळ आली आहे. त्यांच्यावर आता गावाकडे शेळ्या राखून घर चालवण्याची वेळ आली आहे.

माने यांनी गावातील एका टेलरकडून लंगोटा शिवून घेतला आणि गावच्या तालमीत कुस्तीसाठी पहिले पाऊल ठेवले. त्यानंतर गावोगावी यात्रांमध्ये कुस्तीच्या स्पर्धा जिंकल्या. पुढे येथील पत्रा तालमीत मेहनत करून अनेक मैदाने मारली. राज्य आणि देशपातळीवर अनेक कुस्ती स्पर्धा खेळल्या व अनेक पदके मिळवली. येथील सिद्धेश्वर आखाड्यातही त्यांनी कुस्तीची स्पर्धा लढली. एकनाथ धोडमिसे हे त्यांचे वस्ताद होते.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली माने यांनी राज्य व देश पातळीवर कुस्ती खेळली. पण सध्या संसाराचा गाडा ओढण्यासाठी माने यांना रानात शेळ्या राखून जीवन जगावे लागत आहे. म्हणून त्यांना शासनाच्या जिल्हा क्रीडा कार्यालयाने मानधन सुरू करावे, अशी त्यांची अपेक्षा आहे.





शासनस्तरावर नेहीमीच कुस्तीपटूंना पेन्शन योजना देण्यात येत आहेत. जे कुस्तीपटू हयात नाही त्यांच्या पत्नीला पेन्शन देण्यात येत आहे. मोहोळ तालुक्यातील हराळवाडी येथील वाल्मिक माने यांना पेन्शन मिळत नसेल तर त्यांना पेन्शन मिळवून देण्याचा आपण प्रयत्न करु. त्यांना शासनाकडून जास्तीत जास्त मदत मिळवून देण्याचा प्रयत्न जिल्हा क्रिडा कार्यालयाकडून करण्यात येईल.

-**नरेंद्र पवार,** जिल्हा क्रीडाधिकारी, सोलापूर

**शासनाकडून मदतीची अपेक्षा आहे. तरुणांना कुस्तीचे प्रशिक्षण देण्याची मला खूप आवड आहे. हराळवाडीत शासनाने सुविधा उपलब्ध करून दिली. तर तरुणांना कुस्तीचे प्रशिक्षण देण्याची माझी तयारी आहे.**

**- वाल्मिक माने, कुस्तीपटू**



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८९७

**प्रभु महाभूतांचे पंचक । तेथै देखत आहे अनेक ।
आणि भूतग्राम एकेक । भूतसृष्टीचे ।।**

युध्द भूमीवर युध्दासाठी आलेल्या अर्जूनाच्या मनात मोह निर्माण झाला होता.या मोहातून त्याला बाहेर काढणे अत्यंत आवश्यक होते. मोहामूळे त्याला आप-पर हा भेद जाणवत होता. आपण मारणारे आहेत आणि समोरचे आपल्याहातून मरणारे आहेत, असेही अर्जुनाला वाटत होते. आपल्या शिष्याला आप-पर असा भेद दिसतो आहे, त्याचबरोबर मी पणाचा गर्वही आला आहे, हे भगवंताला आवडले नाही. हे विश्व म्हणजे नेमके काय आहे ? हे चराचर भिन्न कसे नाहीत? सर्व जीवसृष्टी एकच कशी आहे ? ही सर्व भूतसृष्टी एकाच ईश्वराची निर्मिती कशी आहे ? या सर्व प्रश्नाची उत्तरे देऊन अर्जुनाला स्थिर करण्याच्या दृष्टीकोनातून भगवंतानी विश्वरुप दाखविण्यास प्रारंभ केला होता. हे विश्वरुप पाहतांना अर्जूनाला वेगळीच अनुभूती येत होती. एका ईश्वरातच हे सर्व भूतमात्र सामावल्याचेत्याला दिसत होते. ज्याला तो भगवंत मानत होता, तो भगवंतही अर्जूनाला त्या विश्वरुपात दिसत होता. अर्जुन स्वत:लाही त्या विश्वरुपात पाहात होता. भगवंताच्या विश्वरुपात भगवंतालाही, स्वत:लाही इतर सर्व प्राणीमात्रासोबत पाहिल्याने अर्जूनाला समतेची, एकात्मतेची दृष्टी प्राप्त होत होती. सर्व भूतमात्र या विश्वरुपात पाहिल्याने आपण या विश्वरुपात काय पाहात आहोत हे सांगतांना अर्जून म्हणाला, प्रभु महाभूतांचे पंचक । तेथे देखत आहे अनेक । आणि भूतग्राम एकेक । भूतसृष्टीचे ।।.


ज्ञानेश्वर महाराज

अर्थात, हे प्रभो, आपल्या विश्वरुपात महाभूतांच्या अनेक पंचकडया आणि भूतसृष्टीतील प्रत्येक भूतसमूदाय मला दिसत आहे. सर्व भूतमात्र तर दिसतच आहेत, पण वेगवेगळया देव-देवताही मला या विश्वरुपात दिसत आहेत. या सर्वांना एकत्र पाहिल्याने मला खऱ्या भगवंताची प्रचिती येत आहे. आजपर्यत आम्ही लहान-मोठा, बरा-वाईट, आपला-परका असा भेद करीत होतो. पण तुझे विश्वरुप पाहिल्यानंतर लक्षात येत आहे की, असा भेद करण्याचे कारणच नाही. कारण एका तुझ्या ठिकाणी हे सर्वस्व सामावलेले आहे. तू नाहीस असे स्थान नाही, तुझ्यात नाही असे जगात काही नाही. सर्व प्राणीमात्र म्हणजेच तू आहेस त्यामुळे तुला वेगळे शोधण्याची गरज वाटत नाही. प्राणीमात्रांबरोबर आपुलकी जोडली म्हणजे तुझ्याबरोबर आपुलकी जोडल्यासारखे आहे. तुझ्यात प्राणीमात्र आणि प्राणिमात्रात तू असल्याचा अनुभव आज प्रत्यक्ष घ्यावयास मिळाल्याने आपण धन्य झाल्याचेही अर्जून म्हणाला. आपणाला विश्वरुप पाहावयास मिळेल असे मला वाटत नाही. पण अर्जूनाने पाहिलेले व सांगितलेले विश्वरुपाचे वर्णन ऐकून आपणही त्याच्याप्रमाणे सर्वत्र समत्व पाहू या. हे समत्वच आपणा सर्वांना खऱ्या सुखाचा अनुभव देईल यात शंका असण्याचे कारण नाही.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शुक्रवार
दि. २७ सप्टेंबर २०२४
विक्रम संवत् २०८०,
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - भाद्रपद
कृ. दशमी (१३.१९)
ऋतु - वसंत
नक्षत्र- पुष्य (२५.१९)
योग - शिव (२३.३२)
करण - बव (२६.००)
सुर्योदय - ०६.३०
सूर्यास्त - १८.२८

दिनविशेष -
पर्यटन दिन
हादगा (भोंदला)
गजगौरी व्रत

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३ ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या** : लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. मानसिक संतोष निर्माण होईल.

# हिंदूंच्या अस्तित्वासाठी १०० टक्के मतदान करा

## ● प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी यांचे विश्व हिंदू परिषद धर्माचार्य चिंतन संमेलनात आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**

हिंदूच्या विचारांचे लोकप्रतिनिधी निवडून येण्याकरीता, सर्वांनी सज्ज राहावे. यापुढची लढाई आंदोलनाची नसून येणाऱ्या निवडणुकीत हिंदू विचाराचे लोकप्रतिनिधी व आपल्या धर्माचे सरकार आणण्यासाठी एकजुटीने १०० टक्के मतदान करावे, असे आवाहन प.पू.स्वामी गोविंद देव गिरिजी महाराज यांनी, उपस्थित संत, महंत, धर्माचार्य, शिवाचार्य हरिभक्त परायण महाराज यांना केले.




विश्व हिंदू परिषदच्या षष्ठब्दीपूर्ती निमित्त सोलापुरात धर्माचार्य चिंतन संमेलन पार पडले. याप्रसंगी ते बोलत होते. त्यांनी संत, महंत, धर्माचार्य, शिवाचार्य हरिभक्त परायण महाराज यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी व्यासपीठावर श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी, निलकंठ हिरेमठ महास्वामी, राचोटेश्वर महास्वामी, शिवलिंगेश्वर महास्वामी, लक्ष्मण चव्हाण महाराज, सुधाकर इंगळे महाराज, मारुती तुणतुणे महाराज, संजय मुद्राळे, क्षेत्रीय धार्मिक पुंज प्रमुख, किशोर चव्हाण प्रांत मंत्री, जिल्हाध्यक्ष अभिमन्यू डोंगरे महाराज, नागनाथ बोंगरगे प्रांत धर्माचार्य संपर्क सहप्रमुख, ह.भ.प. शिवाजी मोरे, भागवत महाराज चवरे, शीख संप्रदायाचे रमेश सिंग, सिंधी संप्रदायाचे पंकज शर्मा, रा. स्व. संघाचे हेमंत हरहरे, मोची समाजाचे अविनाश सज्जन महाराज उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, धर्म म्हणजे कर्तव्य, देशात आपण टिकलं पाहिजे याकरिता, आपले कर्तव्य म्हणून धर्माच्या कामांसाठी सर्व हिंदू बांधव जर आपण यात थोडेही गाफील राहिलात, तर बांगलादेशात हिंदूवर जे अत्याचार घडत आहे ते आपल्या घरापर्यंत यायला उशीर लागणार नाही. सर्वांनी स्वास्थ्य, सुरक्षितता व शांतता निर्माण होण्याकरिता पहिले धर्म म्हणून काम केले पाहिजे. आगामी काळात ''जो हिंदू हित की बात करेगा वही देश पे राज करेगा'' याकरीता देशातील मंदिरे, गोमाता, देशाची सुरक्षितता व साधु संत महंत यांचे सर्व हिंदूनी रक्षण केले पाहिजे. त्यासाठी आपल्या विचारांचे सरकार असणे गरजेचे आहे.

सध्या आपल्या हिंदू धर्माबद्दल विरोधकांनी अपप्रचार सुरू केला असून त्यास आळा घालण्यासाठी विश्व हिंदू परिषदेने जिल्हा ''धर्माचार्य चिंतन संमेलने'' आयोजित केली आहे, अशी माहिती विश्व हिंदू परिषदेचे क्षेत्रिय धार्मिक पुंज प्रमुख संजय मुद्राळे यांनी दिली. सर्व धर्माचार्यांनी धर्मप्रसाराचे काम करण्यासाठी जास्तीत जास्त वेळ द्यावा, असे आवाहन अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुधाकर इंगळे महाराज यांनी केले. मागील लोकसभेच्या निवडणुकीत विरोधी पक्षाच्या एका नेत्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व विश्व हिंदू परिषदेला संपवायचे आहे असे म्हटल्याचे निदर्शनास आणून देत, श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी म्हणाले, वसुधैव कुटुंब पध्दतीने राहून सर्व कुटुंबातील सदस्यांवर संस्कार घडवावेत. हिंदू समाजाच्या पुनरूत्थानासाठी पंचपरिवर्तन, समरसता, पर्यावरण, कुटुंब प्रबोधन, नागरी शिष्टाचार, स्वदेशी भाव हे नमूद करून सर्व जगात हिंदू धर्मच श्रेष्ठ आहे, असे काशी जगद्गुरु यांनी आशीर्वचनातून सांगितले. किर्तनकार महाराजांनी, आपल्या कीर्तनातून सर्व हिंदू बांधवांनी हिंदूंच्या रक्षणार्थ आपल्या विचारांचे सरकार आणण्यासाठी बटन दाबून हिंदूंचे लोकप्रतिनिधी विजयी होण्याकरिता प्रयत्न करावा, असे आवाहन ह.भ.प.लक्ष्मण चव्हाण महाराज यांनी केले आहे. प्रत्येक महाराजांनी तालुक्यातील पाच गावी किर्तने करुन धर्माचा प्रसार करावा, असे आवाहन मारुती तुणतुणे महाराज यांनी केले. हिंदू बांधवांनी प्रबोधन मंचच्या माध्यमातून प्रत्येक घरापर्यंत जागृतीचे काम करावे, असे मत हेमंत हरहरे यांनी व्यक्त केले.

आपण केलेल्या धर्माच्या कामावरून ओळखले जावे. याकरीता आपण धर्माच्या कामात सक्रिय व्हावे, असे आवाहन शिख समाजाचे धर्मगुरू रमेश सिंह यांनी केले. किर्तनात मोक्षावर बोलत असताना धर्मावर ही बोलत जावे, असे आवाहन संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे विद्यमान वंशज- शिवाजी मोरे महाराज यांनी केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा मंत्री संजयकुमार जमादार, परिचय व स्वागत विभाग सहमंत्री विजयकुमार पिसे यांनी केले.

# शिक्षण संचालक डॉ. देवाळणकरांच्या आदेशानंतर आंदोलन स्थगित

● पुण्यात राज्यातील महाविद्यालयीन युनियन पदाधिकारी आंदोलन मागे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. २६ सप्टेंबर-**

पुण्यातील शिक्षण संचालक उच्च शिक्षण कार्यालयासमोरचे महाराष्ट्र राज्य महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांचे सरचिटणीस डॉ. आर.बी.सिंह यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेले धरणे आंदोलन शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्या आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले.

प्रलंबित मागण्यासाठी हे आंदोलन सोमवारपासून सुरू करण्यात आले होते. या धरणे आंदोलनाची दखल घेऊन संचालक डॉ. देवळाणकर यांच्या दालनात त्यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी दुपारी सहसंचालक डॉ.प्रकाश बच्छाव, प्रशासन अधिकारी सुयश दुसाने, सहाय्यक संचालक वित्त विभाग शिवाजी ठोंबरे यांच्या समवेत महासंघाचे शिष्टमंडळ अध्यक्ष रा. जा. बढे, कार्याध्यक्ष शशिकांत कामटे , चिटणीस दिलीप मोरे, दिलीप पवार, दत्तू गडवे, उमेश पाटील, राममोहन बर्डीया, दिलीप गुरव, राजाभाऊ म्हालुंगे, कॉलेज कर्मचारी युनियनचे सोलापूरचे अध्यक्ष दत्ता भोसले, अनिल कळसकर उपस्थित होते.



### बैठकीत चर्चा करण्यात आलेले महत्वाचे विषय

१) प्रयोगशाळा परिचर अणि ग्रंथालय परिचर ४००० -६००० मध्ये वेतन घेतलेल्यांना २४००-२८५० नुसार वेतन निश्चितीस वित्त विभागाच्या समवेत संचालक अणि संघटनेचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक दहा दिवसांत आयोजित करून सदर प्रश्न निकाली काढण्यात येईल.

२) प्रयोगशाळा सहाय्यक पदाची २४००-४२०० ग्रेड वेतनात वेतन निश्चिती करिता २०१३ च्या विकल्पाची सेवा पुस्तकात नोंद तसेच एकत्रीत सेवा जेष्ठता यादी प्रस्तावा समवेत सादर करणे बंधनकारक राहील.

# महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक, कर्मचारी महासंघाचे पुरस्कार जाहीर

● रविवारी होणार पुरस्कार शिवस्मारकमध्ये वितरण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**

महारा आणि कर्मचारी महासंघाचे २०२४ चे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. रविवार दि. २९ सप्टेंबर रोजी २०२४ रोजी सकाळी ११ वाजता शिवस्मारक सभागृह, सोलापूर येथे या पुरस्काराचे वितरण सोहळा होणार आहे, अशी माहिती प्रदेश अध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर यांनी दिली.

या पुरस्काराचे हे ८ वे वर्ष आहे. या पुरस्काराचे वितरण माजी मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, शिवसेना जिल्हा अध्यक्ष अमोल शिंदे, माध्यमिकचे शिक्षण अधिकारी सचिन जगताप, प्राथमिकचे शिक्षण अधिकारी कादर शेख, मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ प्रशासन अधिकारी संजय जावीर आदी मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. या पुरस्कार वितरण सोहण्यास उपस्थित राहावे, असे आवाहन महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर, राज्य सरचिटणीस बोधिप्रकाश गायकवाड, राज्य उपाध्यक्ष रमेश लोखंडे, प्रा. पी. एस. शिंदे, जिल्हाध्यक्ष युवराज भोसले, जिल्हा सेक्रेटरी रवी देवकर, दाऊत आतार यांनी केले आहे.

### हे आहेत पुरस्काराचे मानकरी

विश्वरत्न बाबासाहेब आंबेडकर गुणवंत पत्रकार पुरस्कार - विक्रम खेलबुडे, मनोजकुमार भालेराव , क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले गुणवंत शिक्षक पुरस्कार - प्राचार्य विजयकुमार वाघमोडे , पर्यवेक्षक विक्रमसिंह माने, राजकुमार वसेकर, सहशिक्षक सुधीर मागाडे, अशोक कांबळे, प्र. सहायक शाहू वाघमारे, सहशिक्षक दिपक कांबळे, यशवंत भामरे, क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले गुणवंत शिक्षिका पुरस्कार - शोभा चंदनशिवे, संगीता शिवशरण, राजर्षी शाहू महाराज गुणवंत कर्मचारी पुरस्कार - आगतराव बनसोडे, सिध्दाराम मुली, विलास गोरे, खंडू कोकरे, दत्तात्रय पाटील आदींचा पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.



# संविधान भवन निर्माण होण्यातील अडचणी सोडवा

● माजी महापौर कोठे व समितीचे खा. शरद पवारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**

संविधान भवन निर्माण होण्यातील अडचणीसंदर्भात समितीचे पदाधिकारी व माजी महापौर महेश कोठे यांच्या नेतृत्वाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान व संविधान भवन निर्माण समितीने बारामती येथील गोविंद बागेत खासदार शरद पवार यांना निवेदन दिले.

येथील नॉर्थकोटच्या जागेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान याकरिता एक एकर जागा शासनाकडून मंजूर आहे. परंतु या जागेवर फक्त उद्यानच न होता त्या ठिकाणी सोलापुरातील बहुजन समाजासाठी संविधान भवन ज्यामध्ये मल्टीपर्पज हॉल असणार आहे अशा प्रकारचे वास्तु निर्माण व्हावे याकरिता संविधान भवन निर्माण समितीच्या वतीने प्रयत्न करण्यात येत होते. परंतु गेले तीन वर्षेपासून प्रयत्नाला यश येत नव्हते. तेव्हा खा.पवार यांच्याबरोबर चर्चा केली. त्यांनी लगेच संबंधित प्रकरणाची चौकशी करून संबंधित खात्याच्या मुख्य सचिव मनीषा वर्मा यांच्याशी संपर्क साधून याची कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

# अभियंता हा देशाच्या जडणघडणीतील महत्त्वाचा कणा समजला जातो

● अभियंता पुरस्कारप्रसंगी डॉ. नसिम पठाण यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**

अभियंता हा देशाच्या जडणघडणीतील महत्त्वाचा कणा समजला जातो, असे प्रतिपादन अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत व माजी प्राचार्या डॉ. नसीम पठाण यांनी केले.

शासकीय अधिकारी व कर्मचारी बहुउद्देशिय कल्याणकारी सेवाभावी संघांच्या वतीने अभियंत्यांचे आद्यजनक भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या दिनाचे औचित्य साधून विविध शासकीय कार्यालयातील १४ अभियंत्यांना उत्तम अभियंता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. याप्रसंगी महावितरण सोलापूरचे अधिक्षक अभियंता सुनिल माने, जी. एम. मागासवर्गीय संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघमारे, कार्यकारी अभियंता शरावती लामकाने, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सोलापूरचे आगार प्रमुख जुंदळे, राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्कार मानकरी डॉ. विवेक चंदालिया यांच्या उपस्थितीमध्ये पुरस्कार मान्यवरांना पुरस्कार देण्यात आला. याप्रसंगी विजय पाटील, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या वेळेस कार्यक्रमाप्रसंगी राऊळ, शाखा अभियंता यांनी देखील या पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमाचे कौतुक केले. उपस्थित मान्यवरांनी पुरस्कार हा सातत्याने सुरू राहावा, यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रस्तावना आशुतोष नाटकर यांनी केले. सुत्रसंचालन आदर्श शिक्षक पुरस्कार मानकरी प्रा. भैरवनाथ कानडे यांनी केले. उपस्थितांना आपल्या मधुर आवाजाने प्रफुल्ल सोनवणे व डॉ.राजीव मोहोळकर यांनी विविध प्रकारची गाणी सादर केली.



### यांचा झाला सन्मान

इंजि. राकेश जवादे, विजय पाटील, अमर जाधव, अजयकुमार तेली, श्रीशैल बोधले, भिमाशंकर कोंडगुळी, सिद्राम गोलेकर, आरती वाडकर (गुंड), अमोल तिटवे, अविनाश शिंदे, सुजित विभुते, पृथ्वीराज पारसे, जुबेर शेख, प्रशांत गायकवाड.

# जलजीवनचा ३८ कोटींचा निधी परत

● जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभाग ठेकेदारांचे एकमेकांकडे बोट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून जिल्ह्यात जलजीवन मिशनची कामे सुरू आहेत. त्या कामांसाठी आलेल्या निधीतून मागील दोन वर्षांत ३८ कोटी रुपयांचा निधी शासनाकडे परत गेला आहे. ग्रामीण पाणीपुरवठा विभाग आणि जलजीवनची कामे घेणारे ठेकेदार चुकी तुमचीच असे म्हणत एकमेकांकडे बोट दाखवत आहेत.



ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या वतीने जिल्ह्यात एक हजारांपेक्षा जास्त जलजीवन मिशनची कामे सुरु आहेत. २०२२-२३ आणि २०२३-२४ या दोन वर्षाच्या कालावधीतील ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी वेळेवर बिले न टाकल्यामुळे निधी परत गेल्याचा आरोप ठेकेदारांनी केला आहे. तर ठेकेदारांनी वेळेवर बिले जमा केली नसल्याने तो निधी परत गेल्याचा दावा ग्रामीण पाणीपुरवठ्याचे अधिकारी, कर्मचारी करत आहेत. दरम्यान, जलजीवनच्या कामांचा निधी मिळत नसल्याने जिल्ह्यातील ठेकेदारांनी कामबंद करण्याचा निर्णय घेतला आहे. तर चालू असलेली कामे बंद करता येणार नाहीत. अन्यथा संबंधित ठेकेदारांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने दिला आहे.

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचा पदभार घेतल्यापासून जलजीवन मिशनअंतर्गत आलेल्या सर्व निधीचे वितरण योग्यप्रकारे केले आहे. माझ्या काळात निधी परत गेला नाही. त्याआदी ३८ कोटी रुपयांचा निधी शासनाकडे परत गेला होता. जलजीवन कामांचा आलेला सर्व निधी तत्काळ ठेकेदारांना वितरण करण्यात येईल, त्यामुळे ठेकेदारांनी कामे बंद ठेवू नयेत.

**- संजय धनशेट्टी**
**कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, झेडपी**

### चौकशीच्या नावाखाली थांबली कामे

जलजीवन मिशनअंतर्गत जिल्ह्यात एक हजारांपेक्षा जास्त कामे सुरू आहेत. त्यातील १८९ कामे चौकशी सुरू असल्याने थांबली आहेत; मात्र प्रत्यक्षात कोणतेही चौकशी सुरू नाही. तसेच त्यातील १२५ कामांचा निधी ठेकेदारांना वितरण होणार आहे. तरीही चौकशीच्या नावाखाली जिल्ह्यातील शंभरपेक्षा जास्त कामे बंद ठेवण्यात आली आहेत.

# माजी सैनिक पत्नी, पाल्यांना गौरवासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर-**

विविध क्षेत्रात अति उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व देशाची प्रतिष्ठा वाढविणाऱ्या जिल्ह्यातील माजी सैनिक, पत्नी व पाल्यांना विशेष गौरव पुरस्कारांचे निवड करण्याकरीता दि. २७ सप्टेंबरपर्यंत जिल्हा सैनिक कार्यालय, सोलापूर येथे अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

विशेष गौरव पुरस्कार म्हणून एकरकमी १० हजार व २५ हजार रुपये प्रदान केले जाणार आहेत. या पुरस्काराकरिता राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळातील पुरस्कार प्राप्त खेळाडू, साहित्य, संगीत, गायन, वादन, नृत्य, नाट्य व इतर क्षेत्राातील अतिउत्कृष्ट कामगिरी पुरस्कार विजेते, यशस्वी उद्योजकांचा पुरस्कार मिळविणारे, संगणक क्षेत्रात अतिउत्कृष्ट कामगिरी करणारे, पूर, जळीत, दरोड, अपघात अगर इतर नैसर्गिक आपत्तीमध्ये बहुमोल कामगिरी करणारे तसेच देश, राज्याची प्रतिष्ठ वाढवतील अशा स्वरूपाचे लक्षणीय काम करणारे माजी सैनिक, पत्नी, पाल्य इत्यादी यांना तसेच सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वी १२ वी मध्ये ९० टक्के पेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण होणाऱ्या पदवी किंवा पदव्युत्तर परिक्षेत विद्यापीठात सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या व आय.आय.टी, आय.आय.एम, ए.आय.आय.एम.एस अशा नामवंत व ख्यातीप्राप्त संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या माजी सैनिक, विधवांच्या पाल्यांनी विशेष गौरव पुरस्कारासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांचेकडे कागदपत्रासह दिनांक २७ सप्टेंबरपूर्वी अर्ज करावेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### उपळे दुमाला येथे ज्येष्ठ नागरिकांना कायद्यावर मार्गदर्शन

**बार्शी, दि. २६ सप्टेंबर-**

तालुक्यातील उपळे दुमाला येथे बार्शी विधी सेवा समिती व बार्शी वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त सहारा वृद्धाश्रम येथे ज्येष्ठ नागरिकांना कायद्यावर मार्गदर्शन करण्यात आले. अध्यक्षस्थानी न्या. हर्षदा पाटील होत्या. न्या. पाटील यांनी ज्येष्ठ नागरिक कायदेविषयक माहिती दिली तर ॲड. संजय कोकाटे यांनी ज्येष्ठ नागरिकांना असणाऱ्या सवलतीची माहिती दिली. वृद्धाश्रमाचे संस्थापक राहुल भड यांनी वृद्धाश्रमातील देखभाल व अडीअडचणी या विषयी माहिती दिली. यावेळी ॲड. रणजित गुंड, ॲड. रणजित तांबारे, शेख, निमकर, पाटील, ज्येष्ठ नागरिक दत्तात्रय पुजारी, दीपक जाधव, विनायक बाराते, सुभाष ठोंगे, श्याम बुरगुटे, किरण महानवर, धनंजय ताटे, कृणाल ठोंगे, नाना बुरगुटे, दीपक बुरगुटे, पोलीस पाटील सुरेश ठोंगे, होमगार्ड गोपाळ बुरगुटे, मयूर ताटे, राज तांबारे उपस्थित होते. सूत्रसंचालन ॲड. रत्नमाला पाटील यांनी केले तर आभार ॲड. रणजित गुंड यांनी मानले.



### शालेय समितीच्या अध्यक्षपदी घाटगे तर उपाध्यक्षपदी तनवीर शेख यांची निवड

**अक्कलकोट, दि. २६ सप्टेंबर-**

तालुक्यातील सांगवी बुद्रुक जिल्हा परिषदेच्या शाळेच्या शालेय समितीच्या अध्यक्षपदी प्रवीण घाडगे तर उपाध्यक्षपदी तनवीर शेख यांची बहुमताने निवड झाली. दरम्यान शालेय समितीच्या सदस्य म्हणून आनंदी जाधव, कल्पना मोरे, नंदिनी रेड्डी, आकाश सोनकांबळे, स्वाती वाघमारे, रूपाली गायकवाड, दाऊद चाबुकस्वार, निसार पठाण, मनोज मोरे यांची निवड करण्यात आली. यावेळी माजी सरपंच अबुबकर शेख, मुख्याध्यापक पोपट कोरेकर, परमेश्वर किणगे, महावीर येणगुरे, शरबसप्पा अष्टगी, अशोक सुतार, चारुलता पाटील, ज्योती निकाळजे, परवीनबानो मुल्ला, गणेश मोरे, बाळासाहेब भोसले, प्रविणकुमार बाबर, प्रदीप सलबत्ते, देविदास रेड्डी, बबन गायकवाड, आकाश सोनकांबळे, पिंटू वाघमारे, निसार पठाण, सागर मोरे, समर्थ घाडगे उपस्थित होते.

### पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक योजनांचा लाभ घ्या : डॉ. शिंदे

**सदाशिवनगर, दि. २६ सप्टेंबर-**

पशुसंवर्धन विभाग अंतर्गत जिल्हा परिषद सेस मधून विविध योजना सुरु करण्यात आल्या असून या वैयक्तिक योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी डॉ प्रवीण शिंदे यांनी केले आहे. पशुसंवर्धन विभाग अंतर्गत जिल्हा परिषद सेस सन २०२४-२०२५ साठी जिल्हा वार्षिक योजना २०२३-२०२४ या वर्षासाठी आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या शेतमजूर व शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदानावर ४ शेळ्या व १ बोकड गट वाटप करणे, ५० टक्के अनुदानावर पशुपालकांना मिल्किंग मशीन पुरवणे, ५० टक्के अनुदानावर मुरघास निर्मितीस प्रोत्साहन देणे अंतर्गत सायलेज बग वाटप करणे ,खनिज मिश्रण वापरासाठी कमल २ दुधाळ पशुधनासाठी ३३ टक्के अनुदान या योजना सुरु करण्यात आल्या आहेत. त्यासाठी खालील कागदपत्र आवशक आहेत..फोटो ओळखपत्र, अपंग प्रमाणपत्र (लागू असल्यास),दारिद्र्य रेषेचा दाखला (लागू असल्यास), ७/१२ व ८ अ उतारा, ग्रामपंचायत नमुना ८, जातीचा दाखला (लागू असल्यास),रेशन कार्ड ,अपत्य दाखला, बचत गट प्रमाणपत्र (लागू असल्यास), रोजगार कार्ड (लागू असल्यास), प्रशिक्षण (गोपालन वा शेळी पालन) (लागू असल्यास) या कागदपत्रासह सदर योजनेचे अर्ज ऑफलाईन पद्धतीने दि २३ सप्टेंबर ते २२ ऑक्टोंबरपर्यंत पंचायत समिती माळशिरस पशुधन विभागात जमा करावेत.



### चोरीतील दागिने फिर्यादीला परत

**करकंब, दि. २६ सप्टेंबर-**

करकंब पोलिसांनी कसोशीने तपास करून चोरीचा गुन्हा उघडकीस आणून दोन आरोपींना अटक केली होती. अटक आरोपींकडून गुन्ह्यात चोरीस गेलेले दागिने, सोन्याचे गंठण व अंगठी जप्त केले. जप्त मुद्देमाल फिर्यादिंची पत्नी मनीषा कैलास हरिहर यांना परत करण्याबाबत प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी पंढरपूर यांचा आदेश झाल्याने त्यांना चार तोळ्याचे सोन्याचे पदक व गंठण, ४ ग्रॅम सोन्याची अंगठी असा मुद्देमाल ३ लाख रुपयेच्या बंदपत्रावर तपासी अंमलदार पोहेका आर. आर. जाधव यांनी सुपूर्त केले. पंचनाम्याप्रमाणे दोन पंचासमक्ष फिर्यादीची पत्नी मनिषा हरिहर यांना देण्यात आला. सदरचा मुद्देमाल परत दिल्याने मनीषा कैलास हरिहर यांनी करकंब पोलीस ठाणे तपासी अंमलदार पोलीस हवालदार आर. आर.जाधव, प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर यांचे आभार मानले.



### सोलापूरमधील आक्रोश मोर्चात करकंबच्या शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग

**करकंब, दि. २६ सप्टेंबर-**

जिल्हा प्राथमिक शिक्षक संघटना समन्वय समितीच्यावतीने बुधवारी शासनाच्या चुकीच्या धोरणाच्या विरोधात चार हुतात्मा पुतळा ते जिल्हा परिषद उपोषण गेटपर्यंत पायी आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यात करकंबमधील शिक्षकांचा मोठा सहभाग होता. करकंब येथील रमेश खारे, शेखर रसाळ, संतोष थोरात, किशोर गोडसे, किरण ढोबळे, जयवंत कापसे, पोपट कापसे, चंद्रकला खंदारे, मंगल माने, शोभा पवार, कापसे यांच्यासह इतर शिक्षकांनी सहभाग घेतला.

# अक्कलकोट पंचायत समितीत बदली नियमाला तिलांजली

## ● सर्वस्तरातून आश्चर्य; अधिकाऱ्यांच्या हितसंबंधामुळे कर्मचारी एकाच ठिकाणी ठाणमांडून, निर्णयाकडे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२६ सप्टेंबर**

तिसऱ्या वर्षी टेबल बदली, पाचव्या वर्षी विभाग बदली आणि दहाव्या वर्षी तालुका बदली करण्याच्या शासनाच्या निर्णयाला तिलांजली देऊन गेल्या दहा वर्षांपासून अक्कलकोट पंचायत समितीमध्ये अनेक कर्मचारी एकाच टेबलावर ठाण मांडून कार्यरत आहेत. यामुळे त्यांच्यात एकाधिकारशाही निर्माण झालीआहे.

अक्कलकोट पंचायत समितीमध्ये सद्या प्रशासक राजवट सुरू आहे. गटविकास अधिकारीपदी शंकर कवितके कार्यरत असून सहायक गटविकास अधिकारीपद रिक्त आहे. सद्या २७ कर्मचारी कार्यरत असून १८ कर्मचारी अनुकंपावर तर नऊ कर्मचारी सरळसेवांतर्गत कार्यरत आहेत. सन २०१४ मध्ये राहुल आणप्पा शिंदे, अनिता श्रीशैल कनाळ हे रुजू होऊन दहा वर्षे झाली. नियमानुसार



त्यांची टेबल बदली, विभाग बदली, तालुका बदली करण्यात आली नाही. सन २०१५ मध्ये प्रकाश कोळी ग्रा. पं. विस्तार अधिकारीपदी रुजू होऊन नऊ वर्षे होत असतानाही त्यांचीही विभाग बदली झाली नाही. सन २०१६ मध्ये महेश भोरे आरोग्य विस्तार अधिकारी आणि रंगनाथ निकम क. सहाय्यकपदी रुजू होऊन ८ वर्षे पूर्ण होत असताना नियमानुसार त्यांचीही बदली करण्यात आली नाही. सन २०१७ मध्ये सहिद हारून जमादार हे विस्तार अधिकारी सांख्यिकपदी रुजू झाले. त्यांनाही सात वर्षे पूर्ण झाली. नोकरी लागल्यापासून अक्कलकोट पंचायत समितीमध्ये सिद्धय्या मठ हे घरकुल टेबल सांभाळत आहेत.

मध्यंतरी फक्त चार-पाच वर्षे त्यांची अन्यत्र बदली झाली होती. परत सन २०१७ मध्ये सिद्धय्या मठ हे घरकुल विभागातच रुजू झाले. आता त्यांच्या कार्यकिर्दीला सात वर्षे पूर्ण होत असताना ते मात्र घरकुल विभागातच घर करुन राहिले नाहीत. त्यांना हाच विभाग का देण्यात आला, याचीही चर्चा रंगत आहेत. एकाच विभागात अनेक वर्षे काम करण्यात येत असल्याने त्या अधिकाऱ्यांमध्ये एकाधिकारशाहीपणा आला असून, सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारीकडे ते लक्ष देत नाहीत. यामुळे अनेक लाभार्थ्यांना अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या वागण्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

> अक्कलकोट येथे मी चालू वर्षी रुजू झालो आहे. तिसऱ्या वर्षी टेबल बदली, पाचव्या वर्षी विभाग बदलीबाबत वरिष्ठ कार्यालयाशी चर्चा करणार आहे. वरिष्ठांच्या आदेशानंतर तात्काळ निर्णय घेऊन कार्यवाही करण्यात येईल.
>
> **- शंकर कवितके,**
> गटविकास अधिकार, पंचायत समिती, अक्कलकोट

### अधिकाऱ्यांचे असे वागणे योग्य आहे?

तत्कालीन गटविकास अधिकारी सचिन खुडे यांना दर्शनाळ येथील ग्रामपंचायत सदस्य व गावकऱ्यांनी भ्रष्टाचाराला पाठीशी घालू नका, अपहार, भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कारवाई का केली जात नाही, याची विचारणा केली. याचा राग मनात धरून गटविकास अधिकारी, कर्मचारी, ग्रामसेवकांसह अनेकांनी पोलिस ठाणे गाठून त्या सदस्यांसह ग्रामस्थांवर शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान तत्कालीन गटविकास अधिकाऱ्यांना भ्रष्टाचार झाल्याचे खरे वाटल्याने ते गुन्हा दाखल न करताच माघारी फिरले. अधिकाऱ्यांचे असे वागणे योग्य आहे का, असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

# करकंबच्या ग्रामस्थांचा पंढरपूरच्या पंचायत समितीवर हलगीनाद

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २६ सप्टेंबर-**

करकंब येथील ग्रामस्थांनी करकंब ग्रामपंचायतच्या अनागोंदी कारभाराला कंटाळून गटविकास अधिकारी कार्यालय पंढरपूर येथे ग्रामस्थांच्यावतीने हलगीनाद आंदोलनासह मोर्चा काढला.

करकंब इंदिरानगर येथील रहिवासी गेल्या ४० ते ५० वर्षांपासून करकंब ग्रामपंचायतीच्या सरकारी जागेवर वास्तव्यास आहेत. येथे वास्तव्यास असणाऱ्या काही लोकांना ठराव नं ५६/७ ने ३० सप्टेंबर २०१९ रोजी अर्जावरुन भोगवटा अतिक्रमण नियमानुसार नोंद मंजूर करून करकंब ग्रामपंचायतीला कंस करून काही लोकांना खुद्द मालक करून त्यांना उतारे दिले आहेत. त्याच धर्तीवर इंदिरानगर येथे वास्तव्यास असणाऱ्या इतर रहिवाशांना खुद्द मालक करून उतारा मिळावा, अशी






> महाराष्ट्र शासनाने मागेल त्याला घरकुल योजना राबविली आहे. परंतु गेल्या ५० वर्षांपासून इंदिरानगर करकंब येथील रहिवाशांना आपल्या हक्काची जागा नसल्यामुळे घरकुलापासून वंचित राहावे लागत आहे. गटविकास अधिकाऱ्यांनी इंदिरानगर येथे वास्तव्यास असणाऱ्या सर्वांना मूळ मालक केल्यास त्यांना आपल्या हक्काचा निवारा मिळेल.
>
> **-मनोज पवार,**
> ग्रामीण पश्चिम जिल्हाध्यक्ष, भाजपा कामगार मोर्चा

इंदिरानगर येथील सर्व रहिवाशांची मागणी आहे.परंतु करकंब ग्रामपंचायत यासाठी टाळाटाळ करीत आहे. त्यामुळे राहिवाशांना घरकुलापासून वंचित राहावे लागत आहे. शासनाने मागेल त्याला घर दिलेले असूनही करकंब ग्राम पंचायतीच्या मनमानी कारभारामुळे या गोरगरिबांना आपल्या हक्काच्या घरापासून वंचित राहावे लागत आहे. इंदिरानगर येथे शुध्द पाणी, गटार, रस्ते, लाईट अशा भौतिक सुविधांचा अभाव आहे. एकाच रस्त्याला वेगवेगळी नावे देऊन शासनाच्या लाखो रुपयांची फसवणूक करून ग्रामपंचायतीचे रेकॉर्ड बेकायदेशीररीत्या बदलणाऱ्या सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी प्रणव परिचारक, माजी जि. प. सदस्य बाळासाहेब देशमुख, प्रा. पाटील, पंचायत समिती सदस्य राहुल पुरवत, भाजपा भटक्या जमाती तालुका उपाध्यक्ष लक्ष्मी धोत्रे, भाजपा कामगार मोर्चा ग्रामीण जिल्हाध्यक्ष मनोज पवारसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# रविवारी टेंभुर्णी-अकलूज युवा सन्मान रॅली

**● नाना-भैय्या युवा मंचाच्यावतीने आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २६ सप्टेंबर-**

माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांच्या उपस्थितीत जिल्ह्याचे भूमिपुत्र माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा अभिष्टचिंतन सोहळा व नवनिर्वाचित खासदारांचा सत्कार रविवारी २९ सप्टेंबर रोजी दु २ वा. विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल, अकलूज येथे होणार आहे.



या निमित्त माढा विधानसभा मतदारसंघातील युवकांची टेंभुर्णी ते अकलूज अशी भव्य मोटारसायकल रॅली काढण्यात येणार असून त्याचे आयोजन नाना-भैय्या युवा मंचाच्या वतीने करण्यात येणार आहे. या मोटारसायकल रॅलीमध्ये सहभागी होण्याचे आवाहन रावसाहेब देशमुख यांनी केले आहे. यावेळी माजी महसूल मंत्री आ. बाळासाहेब थोरात, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील उपस्थित राहणार आहेत. रॅलीत वाहतुकीचे सर्व नियम पाळूनच या रॅलीची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, करमाळा चौक, टेंभुर्णी येथून दुपारी १२.३० करण्यात येणार आहे. या रॅलीत सहभागी होणाऱ्या एका सहकारी युवकांस कुपनव्दारे बुलेट गाडी बक्षीस देण्यात येणार आहे. या रॅलीमध्ये सहभाग होण्याचे आवाहन सूरज देशमुख यांनी केले आहे.

### फेसबुकवर वादग्रस्त फोटो पोस्ट; एकावर गुन्हा

**बार्शी, दि. २६ सप्टेंबर-**

स्वतःच्या फेसबुक अकाऊंटवरुन वादग्रस्त फोटो पोस्ट करुन भावना दुखावल्याप्रकरणी एकाविरुद्ध बार्शी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अमर बन्सीधर शुक्ला यांनी शहर पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरुन मोहसीन भाईजी तांबोळी (रा.गांधी स्टॉप, परांडा रोड, बार्शी) या संशयिताविरुद्ध शहर पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे. १४ सप्टेंबर रोजी मोहसीन तांबोळी याने त्याचे फेसबुक अकाऊंटवरुन एक फोटो शेअर केलेला दिसला. त्या फोटोमध्ये भावना दुखावण्याचे उद्देशाने जाणीवपूर्वक पोस्ट करुन शेअर केलेला दिसल्याने सदर फोटोचा स्क्रीनशॉट काढून घेऊन मोहसीन तांबोळीविरुद्ध फिर्याद दिली आहे.

# बार्शीत अद्ययावत मराठा मंदिराची ३४ वर्षांनंतर स्वप्नपूर्ती

**● राज्यातील मराठा संघटनांच्या प्रमुखांनी केले कौतुक**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ सप्टेंबर-**

येथील मराठा एकता मंडळाच्या वतीने पुनर्निर्माण करण्यात आलेल्या अद्ययावत मराठा मंदिराचा लोकार्पण सोहळा लखुजीराजे जाधव (सिंदखेडराजा) यांचे वंशज बाबाराजे जाधवराव व रणजितसिंहराजे जाधवराव यांच्या हस्ते करण्यात आले. ३४ वर्षांनंतर स्वप्नपूर्ती झाल्याचा आनंद सगळ्यांनी व्यक्त केला.

अध्यक्षस्थानी रणजितसिंह नाईक-निंबाळकर हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अण्णासाहेब पाटील अर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील, आमदार राजेंद्र राऊत, मराठा



आरक्षण समन्वय समिती, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष सुभाषदादा जावळे, मराठा आरक्षण अभ्यासक बाळासाहेब सराटे, अखिल भारतीय छावा संघटना अध्यक्ष नानासाहेब जावळे, संस्थापक अध्यक्ष संभाजी सेना सुधाकरराव माने, प्रदेशाध्यक्ष अ.भा.मराठा सेवा संघ विजयसिंह महाडिक, प्रदेशाध्यक्ष शंभूराजे युवा क्रांती संघटना सुनील बप्पा मोरे, प्रदेशाध्यक्ष संभाजी सेना रामेश्वर शिंदे, संस्थापक अध्यक्ष छावा महासंघ धनाजी येळकर पाटील, समन्वयक मराठा क्रांती मोर्चा सुनील रसाळे, मराठा क्रांती मोर्चा दास शेळके, समन्वयक मराठा क्रांती मोर्चा दिलीप कोल्हे, बाळासाहेब गव्हाणे, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.बी. वाय. यादव यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

मराठा मंदिर उभारणीस आर्थिक मदत केल्यामुळे सकल मराठा समाजातर्फे आमदार राजेंद्र राऊत यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. मराठा मंदिराच्या जागेच्या योगदानाबद्दल देशमुख परिवाराचा तसेच निगा राखल्याबद्दल विनोद गायकवाड यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. अण्णासाहेब पाटील यांच्या सोबत काम केलेले मराठा महासंघाचे माजी अध्यक्ष तथा मार्गदर्शक बाळासाहेब गव्हाणे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक किरण गाढवे यांनी केले. सूत्रसंचालन खंडू डोईफोडे यांनी केले.बार्शी शहराच्या वैभवामध्ये भर टाकणाऱ्या मराठा मंदिरच्या वास्तूची उभारणी मोठ्या दिमाखात आणि युद्ध पातळीवर करण्यात आली. मराठा समाजाची अस्मिता असणारा मराठा मंदिराचा विषय गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेला होता. परंतु आमदार राजेंद्र राऊत यांच्या प्रयत्नातून मराठा मंदिरचे पुनर्निर्माण करण्यात आले आहे. अशा प्रकारचे तालुकास्तरावरील पहिले मंदिर असल्याचे कौतुक यावेळी मान्यवरांनी केले.

> **१९९० ला मराठा एकता मंडळाची स्थापना**
>
> १९९० च्या सुमारास मराठा एकता मंडळाची स्थापना झाली. समाजासाठी हक्काचे सभागृह असावे यासाठी मराठा मंदिराची संकल्पना पुढे आली. या जागेत चांगले सुसज्ज मराठा मंदिर असावे, अशी सर्वांची भावना होती. समाजबांधवांच्या सहकार्यातून सुमारे ३४ वर्षानंतर ही स्वप्नपूर्ती होत असून याचा विशेष आनंद होत आहे, असे आमदार राजेंद्र राऊत म्हणाले.

# फार्मासिस्टची जागतिक आरोग्य सेवांमधील भूमिका

**आज आपल्याला फार्मासिस्टची जागतिक आरोग्य सेवांमधील भूमिका या विषयावर सखोल विचार करायचा आहे. हा विषय महत्त्वपूर्ण आहे. कारण सध्या जगभरात आरोग्यसेवा क्षेत्राला विविध आव्हाने आणि समस्यांचा सामना करावा लागत आहे. औषध वितरणाच्या प्रक्रियेत फार्मासिस्टची भूमिका जितकी आवश्यक आहे, तितकीच त्यांची आरोग्य व्यवस्थापन, प्रतिबंधात्मक उपाय आणि समुदाय आरोग्य शिक्षणातील भूमिका महत्त्वपूर्ण ठरते.**

### औषध उपचार आणि सुरक्षितता

फार्मासिस्ट हे आरोग्य सेवांचे आधारस्तंभ आहेत. ते रुग्णांना योग्य औषध निवडण्यात, योग्य डोसेज ठरवण्यात आणि औषधांचे दुष्परिणाम टाळण्यात मदत करतात. जगभरात अनियमित औषधोपचार आणि चुकीच्या औषधांच्या वापरामुळे अनेक रुग्णांचे आरोग्य धोक्यात येते. अशा परिस्थितीत फार्मासिस्ट हे अशा त्रुटी रोखण्यासाठी एक महत्त्वाचा घटक ठरतात. ते औषधांच्या परिणामकारकतेवर लक्ष ठेवतात, तसेच रुग्णांना औषधांच्या वापराविषयी योग्य मार्गदर्शन देतात.सध्या जगभरात औषधांच्या चुकीच्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या समस्या गंभीर बनल्या आहेत. प्रतिकारक्षम जीवाणू (ntimicrobial Resistance-MR) ही एक मोठी समस्या आहे. यासाठी योग्य औषधांचा वापर, वेळेवर औषध संपवणे आणि औषधांचा अतिरेक टाळणे याविषयी फार्मासिस्ट प्रभावी जनजागृती करतात.

### -वैश्विक आरोग्य समस्यांमध्ये सहभाग

जगभरात प्रत्येक देशाला आरोग्यसेवा पुरवठ्यात विविध आव्हाने आहेत. काही ठिकाणी आरोग्य सेवा सहज उपलब्ध नाहीत, तर काही ठिकाणी ती परवडणारी नाही. औषधांचा तुटवडा, खोट्या औषधांचा वापर आणि औषधांच्या उच्च किंमती यामुळे अनेकवेळा रुग्णांना योग्य उपचार मिळत नाहीत. अशा समस्यांवर उपाययोजना करण्यात फार्मासिस्ट महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.



उदाहरणार्थ, महामारीसारख्या परिस्थितीत फार्मासिस्ट हे आरोग्य सेवा पुरवण्यात प्रमुख भूमिका घेतात. COVID-१९ महामारीमध्ये हे सिद्ध झाले आहे की फार्मासिस्टांनी लसीकरण मोहिमा, मास्क आणि सॅनिटायझर्सचे वितरण, आणि रुग्णांना आवश्यक औषधांचे वेळेवर वितरण करून मोठा हातभार लावला. अशा परिस्थितीत फार्मासिस्टांनी जागतिक आरोग्य गरजांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे.

### प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा

फार्मासिस्ट हे आरोग्य व्यवस्थेतील एक महत्त्वाचे अंग बनले आहेत, जे केवळ उपचारांवर नाही तर आजारांचे प्रतिबंध करणाऱ्या उपाययोजनांवर देखील लक्ष केंद्रित करतात. लसीकरणाच्या मोहिमा, समुदायातील आरोग्य शिबिरे, आरोग्यविषयक जनजागृती कार्यक्रम आणि आरोग्य शिक्षण यामध्ये फार्मासिस्ट मोठे योगदान देत आहेत. उदाहरणार्थ, ग्रामीण किंवा दुर्गम भागात आरोग्य सेवा पोहोचवण्याची मोठी गरज आहे. अशा ठिकाणी फार्मासिस्ट लसीकरण मोहिमा राबवून आणि आरोग्य शिबिरे आयोजित करून जागरूकता वाढवतात. मधुमेह, उच्च रक्तदाब, आणि इतर दीर्घकालीन आजारांसाठी प्रतिबंधात्मक उपचार उपलब्ध करून देण्यात फार्मासिस्ट मदत करतात.

### आरोग्य शिक्षण आणि समुदाय जनजागृती

समाजात जागरूकता निर्माण करणे हे फार्मासिस्टचे आणखी एक महत्त्वाचे कर्तव्य आहे. रुग्णांना योग्य औषधोपचार, त्यांच्या दुष्परिणामांचे व्यवस्थापन आणि जीवनशैलीत बदल करून आरोग्य सुधारण्यासाठी ते मार्गदर्शन करतात. उदाहरणार्थ, एचआयव्ही-एड्स किंवा मलेरियासारख्या आजारांबद्दल लोकांना जागरूक करणे, औषधांचे योग्य वापर आणि त्याचा अपव्यय कसा टाळावा हे शिकवणे या बाबतीत फार्मासिस्ट प्रमुख भूमिका घेतात. आरोग्य शिक्षणामध्ये फार्मासिस्ट विविध आरोग्य समस्या सोडवण्यासाठी समुदायासोबत काम करतात. अशिक्षित किंवा कमी आरोग्य शिक्षण असलेल्या भागांमध्ये फार्मासिस्टांचा सहभाग महत्त्वपूर्ण ठरतो. ते रुग्णांना औषधांचे योग्य उपयोग, दुष्परिणाम, आणि प्रतिबंधक उपाय समजावून सांगतात.

### धोरण निर्माणामध्ये सहभाग

फार्मासिस्ट केवळ औषधांच्या वितरणातच नव्हे, तर आरोग्य धोरणांची आखणी करण्यासदेखील मदत करू शकतात. जागतिक आरोग्य संस्थेच्या विविध उपक्रमांमध्ये फार्मासिस्टनी धोरणांच्या विकासात योगदान दिले आहे. उदाहरणार्थ, जेनेरिक औषधांच्या उपलब्धतेसाठी, औषधांच्या किंमती नियंत्रणासाठी, आणि नवीन औषधांच्या चाचण्यांसाठी फार्मासिस्ट सक्रियपणे सहभागी होतात. फार्मासिस्टांच्या या भूमिकेमुळे औषध पुरवठा शृंखला अधिक परिणामकारक होते, ज्यामुळे जागतिक स्तरावर औषधांचा तुटवडा कमी करण्यास मदत होते.

> **निष्कर्ष :** फार्मासिस्ट हे जागतिक आरोग्य सेवांमध्ये एक महत्त्वाचे अंग आहेत. त्यांचे काम केवळ औषध वितरणापुरते मर्यादित नाही, तर ते जागतिक आरोग्याच्या विविध गरजांची पूर्तता करण्यासाठी सक्रिय सहभाग घेतात. औषधांचे योग्य व्यवस्थापन, जनजागृती, धोरण निर्माण आणि रुग्णांना चांगल्या आरोग्य सेवांचा लाभ देण्याच्या प्रक्रियेत फार्मासिस्टांची भूमिका अविस्मरणीय आहे. भविष्यात, फार्मासिस्ट जागतिक आरोग्य सेवांमध्ये अधिक महत्त्वाची भूमिका बजावतील आणि आपली क्षमता अधिक परिणामकारकपणे सिद्ध करतील. त्यांच्या मार्गदर्शनामुळे रुग्णांना केवळ औषधोपचार मिळणार नाही, तर त्यांचे एकूणच आरोग्य सुधारेल. शेवटी माझ्या सर्व फार्मासिस्ट बंधू भगिनींना जागतिक फार्मसी दिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.

**-सुजित करपे,**
**प्राचार्य, सोजर कॉलेज ऑफ फार्मसी, खांडवी**

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# करमाळ्यात नवरात्रोत्सवानिमित्त आराधी गीत गायन स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २६ सप्टेंबर-**

करमाळ्याची कुलस्वामिनी आई कमला भवानीच्या शारदिय नवरात्रोत्सवानिमित्त प्रा. रामदास झोळ फाउंडेशनच्यावतीने आराधी गीत स्पर्धेचे करणार असल्याचे दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांनी सांगितले.

आराधी लोकांना व्यासपीठ मिळून देण्यासाठी प्रा. रामदास झोळ फाउंडेशनतर्फे ४ ते ९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत अथर्व मंगल कार्यालय,



श्रीदेवीचा माळ, करमाळा येथे आराधी गीत स्पर्धा होणार आहे. करमाळा तालुक्यातील आराधी मंडळे, आराधी गाणी गाणारे गायक, सर्व भाविक भक्तांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. आई श्री कमलाभवानी शारदीय नवरात्र महोत्सवाच्या या स्पर्धेमध्ये बहुसंख्येने सहभागी व्हावे. आपल्या सांस्कृतिक शारदीय महोत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन प्रा. रामदास झोळ व सचिव मायाताई झोळ यांनी केले आहे. आराधी गीत स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी ९९२१४७४५२० व ९४०५३१४२९६ या मोबाईल क्रमांकावर नाव नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### माळशिरसमध्ये पुरवठा नायब तहसीलदार, पुरवठा निरीक्षक, गोदामपालांचा सत्कार

**अकलूज, दि. २६ सप्टेंबर-**

माळशिरस येथे रविकिरण शेटे यांची माळशिरस तालुका पुरवठा विभाग येथे पुरवठा नायब तहसीलदार अधिकारी म्हणून व गोदमपालपदी रोहित बनकर यांची नियुक्ती झाल्याबद्दल व माळशिरस तालुक्याचे कर्तव्यदक्ष म्हणून ओळख असलेले पुरवठा निरीक्षक सुशांत केमकर व पुरवठा अव्वल कारकून सुप्रिया वजाळे, गोदमपाल सलिम शेख यांचा अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार महासंघ संघटने कडून सत्कार करण्यात आला. यावेळी महासंघ संघटनेचे मार्गदर्शक सुरेश पांढरे, अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार संघटना सोलापूर जिल्हा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय मंडलिक, सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील संघटनेचे तालुका उपाध्यक्ष किरण टकले, माळशिरस तालुक्याचे कार्याध्यक्ष साजिद भाई सय्यद, जिल्हा संघटक प्रकाश गायकवाड, सहकार महर्षी संघटनेचे खजिनदार मिलिंद रेडेकर, सहकार महर्षी संघटनेचे सदस्य विश्वास सिद्ध यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी नितीन वाघमोडे, बाळासाहेब आवटे, विक्रम शिंदे, समीर सोरटे, विक्रम शिंदे, शिवाजी लोखंडे, उत्तम कोकरे, उद्धव रणवरे, पोपट निंबाळकर, राजेंद्र शिंदे, संजय खराडे, अरूण जाधव, नानासाहेब काकडे, रणजीतसिंह भगत, अक्षय मिले, अमीर तांबोळी, अनिल बडे, आझार मणेरी, आकाश कदम उपस्थित होते.



### सत्यशोधक कामगार संघटनेतर्फे पंढरीत कामगारांना गृहोपयोगी वस्तू संचांचे वाटप

**पंढरपूर, दि. २६ सप्टेंबर-**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून सक्रिय जीवित नोंद असणाऱ्या कामगारांना गृहोपयोगी साहित्य संचाचे वाटप सत्यशोधक कामगार संघटनेच्या माध्यमातून पंढरपुरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर येथे करण्यात आले. यावेळेस संचाचे वाटप प्रशांत परिचारक यांच्या हस्ते करण्यात आले. परिचारक यांनी कामगारांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कामगारांचा घरकुल प्रश्न प्राधान्याने सोडवून, पंढरपूर नगर परिषदेच्या माध्यमातून पंतप्रधान आवास योजनेची घरे कामगारांना देण्यासाठी प्रयत्नशील राहणार. कामगारांना शैक्षणिक, आर्थिक, आरोग्य, सामाजिक योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणार. सामाजिक कार्य करताना उपेक्षित, वंचितांसाठी काम करणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. यावेळी रवी सर्वगोड, प्रदीप परकाळे, शाहू सर्वगोड, किशोर कदम, समाधान भोसले, सतीश सर्वगोड, सिद्धनाथ सांवत, राजेंद्र सर्वगोड, लक्ष्मण बंगाळे, तुकाराम मोळावडे, शरद सोनवणे, इत्यादी उपस्थित होते.



### करकंबच्या रामभाऊ जोशी हायस्कूलमध्ये चित्रकला स्पर्धेला उत्साहात सुरुवात

**करकंब, दि.२६ सप्टेंबर-**

करकंब येथील रामभाऊ जोशी हायस्कूलमध्ये शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेस सुरुवात झाली. २५ ते२६ सप्टेंबर रोजी इलेमेंटरी तर २७ ते२८ सप्टेंबरदरम्यान इंटरमिजिएट परीक्षा होणार आहेत. विद्यार्थ्यांचे स्वागत केंद्रसंचालक प्राचार्य हेमंत कदम यांनी गुलाबपुष्प देऊन केले.या परीक्षेमध्ये ९ शाळांचे ५६६ विद्यार्थी प्रविष्ट झाले असून यात मुलींची संख्या ३५५ आहे. २११ मुले परीक्षांना बसले आहेत. पटवर्धनकुरोली प्रशालेचे देशमुख, विद्या विकास मंदिर उंबरे भोसले, विनायकराव पाटील प्रशाला परिते पारसे, न्यू. इंग्लिश स्कूल करकंब चव्हाण, आदर्श प्रशाला कदम, खेडभोसे विद्यालय पाटील, घोटी विद्यालय जाधव, भैरवनाथ विद्यालय कान्हापुरी वसावे, लक्ष्मी आनंद विद्या मंदिर टेंभुर्णी साळुंखे या विविध ठिकाणांहून आलेल्या चित्रकला शिक्षकांचे स्वागत करण्यात आले. केंद्र उपसंचालक म्हणून एम. के. पुजारी तर केंद्र समन्वयक म्हणून परीक्षेची संपूर्ण तयारी ज्ञानेश्वर कुंभार यांनी केली असून सलग चार दिवस ही परीक्षा चालणार आहे.

# जागेच्या पाहणीनंतरच माढा मतमोजणीचा निर्णय

## जिल्हाधिकारी आशीर्वाद : माढा प्रशासकीय कार्यालय बचाव समितीला आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २६ सप्टेंबर-**

माढा विधानसभेची मतमोजणी माढ्यात व्हावी यासाठी माढा शहर व परिसरातून मोठे आंदोलन उभारले जात असून गेल्या तीन दिवसांपासून माढा प्रशासकीय कार्यालय बचाव समितीच्या वतीने हे आंदोलन करण्यात येत आहे. दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले, यावेळी त्यांनी जोगच्या पाहणीनंतरच मतमोजणीचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगितले.

ठिय्या आंदोलन, रस्ता रोको, हलगीनाद, मोर्चा या प्रकारचे आंदोलन करून प्रशासनाला जागे करण्याचा नागरिकाकडून प्रयत्न केला जात आहे. २५ सप्टेंबर बुधवारी बचाव समितीकडून माढा शहरातून मोर्चा काढून तहसीलदारांना निवेदन देण्यासाठी गेले असता माढा तहसीलदार उपस्थित नसल्याने बचाव समितीच्या शिष्टमंडळाने सोलापूर येथे जिल्हाधिकाऱ्याला निवेदन देण्याचे ठरवले. या शिष्टमंडळात नगराध्यक्षा मीनलताई साठे, अभिजीत पाटील, दिनेश जगदाळे, अरुण कदम, विकास साठे, दिनेश गाडेकर,



भैय्या खरात, अरविंद खरात यांच्यासह बचाव समितीचे इतर सदस्य उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांनी निवेदन स्वीकारून समितीच्या सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतले. वरिष्ठ अधिकाऱ्याकडून माढा शहरातील मतमोजणी ठिकाणाची पाहणी करण्यात येईल. तसेच आलेल्या अहवालावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले आहे. तत्पूर्वी माढा शहरातून काढण्यात आलेल्या मोर्चाचे रूपांतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात सभेत झाले. यावेळी बचाव समितीच्या इतर सदस्यांनी देखील आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या. या मोर्चात माढा शहर आणि परिसरातील नागरिकांनी सक्रिय सहभाग घेत प्रशासनाचा निषेध केला. यावेळी झुंजारनाना भांगे, शहाजी साठे, गुरुराज कानडे, शहाजी चवरे, गंगाराम पवार, जहीर मणेर, मदन मुंगळे, गोरख वाकडे, महादेव जगदाळे, शहाजी चवरे, किरण पवार यांच्यासह माढा प्रशासकीय कार्यालय बचाव समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

> “ माढा विधानसभेचे मतमोजणी करमाळा विधानसभा मतदारसंघात असलेल्या कुर्डूवाडी येथे होते.ही माढा शहरावर अन्याय करणारी गोष्ट आहे. गेल्या तीन दिवसांपासून माढ्यासह परिसरातील नागरिक आंदोलन करत आहेत. परंतु प्रशासन यावर गांभीर्याने निर्णय घेत नाहीत. मतमोजणी माढा शहरात घेण्याचा निर्णय होत नाही. तोपर्यंत हे आंदोलन असेच चालू ठेवणार आहे.
>
> **-ॲड. मीनल साठे, नगराध्यक्षा, माढा**

> “ प्रशासनाची वागणूक ही संशयास्पद असून यावर योग्य निर्णय न घेतल्यास अधिकाऱ्यांवर कारवाई होण्यासाठी आम्ही आंदोलन करू. माढा विधानसभेची मतमोजणी ही माढ्यातच झाली पाहिजे अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे.
>
> **-अभिजीत पाटील, चेअरमन, विठ्ठल सहकारी साखर कारखाना, वेणूनगर, पंढरपूर**

# फसवणूक टाळल्यास शेतकरी समृद्ध होतील

**उद्योजक शिवशरण यांचे प्रतिपादन**

**घोडेश्वरच्या शेतकरी मेळाव्यात प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २६ सप्टेंबर-**

खते, बियाणे आणि शेतीविषयक विविध औषधे या माध्यमातून होणारी फसवणूक टाळल्यास शेतकरी निश्चितच समृद्ध होईल असे प्रतिपादन उद्योजक जनार्धन शिवशरण यांनी केले.




घोडेश्वर येथील शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सचिन वराडे होते. यावेळी दामाजी सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक राजीव बाबर, पं.स.चे माजी सदस्य रामराजे कदम, जगदीश पाटील, नामदेव माने, दत्तात्रय पाटील,नारायण गुंड, भारत शिवशरण उपस्थित होते. जनार्दन शिवशरण म्हणाले, समर्पित भावनेतून आणि उद्योगाचा दर्जा देऊन शेती केली तर शेतीतसुद्धा करिअर करता येते हे शेतकऱ्यांनी सिद्ध करून दाखविले आहे. पाण्याचा आणि रासायनिक खतांचा वापर कमी करून शेतीमध्ये अनेक प्रयोग साकारण्यात येत आहेत, ही बाब कौतुकास्पद आहे. आभार जगदीश पाटील यांनी मानले.

# आ. आसगावकर देणार शाळांना शैक्षणिक साहित्य

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२६ सप्टेंबर-**

पुणे विभागाचे शिक्षक आमदार प्रा.जयंत आसगावकर यांच्या आमदार फंडातून हे विविध शाळांना शैक्षणिक साहित्याची वाटप होणार आहे. त्यात करमाळा, माढा, बार्शी तालुक्यातील अनुदानित शाळांना आमदार फंडातून प्रिंटर व संगणक वितरण होईल.



हा कार्यक्रम जयप्रकाश बिले पब्लिक स्कूल झरे येथे होईल. २७ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता होणार आहे. अध्यक्षस्थानी प्राचार्य जयप्रकाश बिले राहणार आहेत. यावेळी शाळा संघटनेचे सचिव जयंत दळवी, नितीन भोगे, ब्रिजेश बारकुंड, संदिपान गुटाळ, अमोल दुरंगे, तानाजीराव करचे, युवराज बिले उपस्थित राहणार आहेत.

# मैंदर्गीत राज्यपक्षी हरियालचे प्रथमच दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २६ सप्टेंबर-**

महाराष्ट्र राज्याचा राज्यपक्षी असलेला हरियाल या पक्षाचे प्रथमच दर्शन अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथे झाले आहे. सुमारे ४० ते ५० एवढ्या मोठ्या संख्येत असलेला हरियाल पक्षांचा थवा मैंदर्गीतील ए-वन हॉटेल परिसरात असलेल्या सुमारे ७० ते ८० वर्ष जुन्या वटवृक्षाच्या झाडावर आढळले आहेत.



पिकलेल्या फळावर ताव मारण्यासाठी त्यांचा मुक्काम वाढला आहे. पक्षीप्रेमी अभ्यासकांना निरिक्षणास ही मोठी पर्वणी आहे. महाराष्ट्र शासनाने या पक्षाला राज्यपक्षी म्हणून घोषित केले असून आजही अनेकांना महाराष्ट्राचे राज्यपक्षी हरियाल आहे हे माहिती नाही. कबूतर वर्गात मोडणारा हा पक्षी इतर कबुतरांप्रमाणेच गुबगुबीत असून रंगाने मात्र भिन्न असतात. मुख्य रंग हिरवट पिवळा असतो आणि पायही पिवळे असतात, पिवळ्या पायामुळे या पक्षाला ओळखणे सोपे जाते. हरीयाल महाराष्ट्राचा राज्यपक्षी आहे. त्याचा आकार ३३ सेमी असून मुख्यतः झाडांची फळे आहार असून सद्या वडाच्या झाडाला फळे आलेले आहेत. त्यामुळे आपल्याकडे स्थानिक स्थानांतरण करतात. कुरनूर धरण परिसरात गेल्या ८ वर्षापासून दरवर्षी हरियालचे आगमन होत आहे. धरण परिसर गर्द झाडी, निसर्ग सौंदर्याने नटलेला असून विविध पक्ष्याचे आगमन होत असते.

# ‘चैतन्य’मध्ये लाडकी लेक योजनेला चांगला प्रतिसाद

**नानासाहेब देशमुख : चैतन्य पतसंस्थेची सर्वसाधारण सभा**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२६ सप्टेंबर-**

३१ मार्च २०२४ पर्यंत ६६५ एवढे सभासद असून वार्षिक उलाढाल २ कोटी ३८ लाख रुपये एवढी आहे. ३१ मार्चपर्यंत ६५ हजारांचा नफा झाला आहे. चालू आर्थिक वर्षात ५२ लाख रुपये कर्जाचे वाटप केले आहे. कर्ज वसुली ४४ टक्क्यावरुन ५६ टक्क्यापर्यंत गेली आहे. सोनेतारण व्याज दरात कपात केली असून १५ टक्क्यावरुन ती १२ टक्के एवढी केली आहे. लाडकी लेक योजना साडेसहा वर्षात पैसे दुप्पट देण्यात येत असल्यामुळे या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे, असे चेअरमन



नानासाहेब देशमुख यांनी सांगितले.

पिलीव येथील चैतन्य ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन नानासाहेब ऊर्फ रामचंद्र देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली, यावेळी ते बोलत होते. अहवाल वाचन सचिव रघुनाथ नरळे यांनी केले. संचालक आरिफखान पठाण यांनी ठेवी व पिग्मी भरण्याचे आवाहन केले. यावेळी माजी सरपंच अमोल मदने, राजेंद्र जामदार, दामोदर लोखंडे, व्हाईस चेअरमन शोभाताई रोकडे, संचालक तुकाराम पडळकर, प्रदीप चोबे, प्रभाकर वाघमारे, नामदेव देशमुख, मीनाक्षी देशमुख, जगन्नाथ करडे, संजय रोकडे, नारायण करांडे, सचिव रघुनाथ नरळे, कर्मचारी विठ्ठल जाधव, गणेश ढेकळे यांच्यासह सभासद उपस्थित होते.

# मुख्यमंत्र्यांचे विश्वासू राजू खरे वाजवणार ‘तुतारी’ ?

**माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांची घेतली भेट**

**राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २६ सप्टेंबर-**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विश्वासू नेते अशी ओळख असलेले उद्योजक राजू खरे यांनी राष्ट्रवादी पक्षाचे प्रमुख खा.शरद पवार यांच्या भेटीने मोहोळ राखीव विधानसभा मतदारसंघातून खरे हे 'तुतारी' घेऊन लढणार असल्याच्या चर्चांना बळ मिळाले असून प्रस्थापित नेतेमंडळींसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

मोहोळ राखीव मतदारसंघात पंढरपूर तालुक्यातील १७, उ. सोलापूर मधील २४ गावे आणि मोहोळ तालुका मिळून हा मतदारसंघ बनलेला आहे. गेल्या तीन निवडणुकीत या ठिकाणी ऐनवेळी बाहेरचा उमेदवार देऊन राष्ट्रवादी काँग्रेसने विजय मिळविला आहे. मात्र, बाहेरच्या, गेटकेन उमेदवारांमुळे मतदारसंघ विकासापासून वंचित राहिल्याचा मुद्दा उपस्थित करीत राजू खरे यांनी गेल्या दोन-तीन वर्षांपासून जोरदार रान उठवले आहे. कोणत्याही परिस्थितीत



या मतदारसंघातून निवडणूक लढविण्याचा निर्धार करून जोरदार तयारी चालविली आहे. मागील ३० वर्षांच्या शिवसेनेतील संबंधांचा फायदा घेत थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आ.भरतशेठ गोगावले, खा. संदीपान भुमरे यांच्या माध्यमातून विविध योजनांमधून मतदारसंघात कोट्यावधींचा निधी खेचून आणला. याच बरोबर स्वखर्चाने 'मागेल त्याला रस्ता, मागेल त्याला पाणी' तसेच शिक्षण, आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करण्याचा धडाका लावला आहे. दुष्काळी परिस्थितीत त्यांनी तब्बल ७० दिवस अनेक गावांना स्वखर्चातून टँकरने पाणी पुरविले. गावोगावी, वाडी-वस्तीवर जनतेच्या जिव्हाळ्याची कामे पोहोचल्याने खरे यांच्यासाठी एक वेगळा माहौल मतदारासंघात तयार झाला आहे. दरम्यान, महायुतीत मोहोळची जागा राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला सुटणार हे निश्चित असल्याने विद्यमान आ.यशवंत माने यांनी प्रचार सुरू केला आहे. या प्रकारामुळे सर्व विरोधकांसह खरे समर्थकांमध्ये अस्वस्थता होती. त्यातूनच खरे यांनी महाविकास आघाडीतून खा.शरद पवार यांच्या पक्षाच्या 'तुतारी' चिन्हावर ही निवडणूक लढवावी, असा आग्रह समर्थक, कार्यकर्त्यांनी धरला होता. यासंदर्भात अनेक बैठकाही पार पडल्या होत्या. अनेक नेतेमंडळी खरे यांच्याशी संपर्क साधत होते. अखेर मंगळवारी खरे यांनी खा. शरद पवार यांची भेट घेतली. मतदारसंघात आजवर केलेल्या कार्याचा अहवाल सुपूर्द केला. खा. पवार यांनी तब्बल ३५ मिनिटे वेळ देत खरे यांच्याशी विविध विषयांवर सकारात्मक चर्चा केली. या भेटीची छायाचित्रे सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने संपूर्ण मतदारसंघात चर्चेला उधाण आले. एकीकडे विद्यमान आमदार माने यांच्यासह अनेकजण 'तुतारी' हाती घेण्यास आतूर असल्याच्या चर्चा असताना खरे यांनी खा. पवार यांची भेट घेतल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या.

### नेतेमंडळींचा ‘ग्रीन सिग्नल’ ?

मोहोळ मतदारसंघात राजू खरे यांनी मोठे काम करून वेगळी ओळख निर्माण केली आहे. याची दखल राष्ट्रवादीने घेतल्याचे बोलले जात होते. त्यातूनच प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील, जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठे यांच्यासह वरिष्ठ नेतेमंडळींनी खरे यांच्या नावाला 'ग्रीन सिग्नल' दिल्याचे समोर येत आहे. अखेर या पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून खरे यांची पक्षाध्यक्ष खा.शरद पवार यांच्याशी भेट घडली. राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला 'चितपट' करण्यासाठी स्वत: खा.शरद पवार यांनीच हा डाव टाकल्याची चर्चा होत आहे.

### सामाजिक समतोल साधण्याचा प्रयत्न

मोहोळ राखीव मतदारसंघात बौद्ध समाजाचे मतदार मोठ्या प्रमाणावर आहेत.मात्र, गेल्या तीन निवडणुकीत या समाजाला उमेदवारी दिली गेली नसल्याची खंत आणि कमालीची अस्वस्थता व्यक्त होत आहे. चळवळीतील कार्यकर्ते असलेल्या खरे यांच्या रूपाने खा. पवार ही अस्वस्थता दूर करतील, असे या भेटीनंतर जाणकारांमधून चर्चिले जात आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## विश्वास जगताप यांचे धनंजय सावंत यांच्याकडून सांत्वन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२६ सप्टेंबर -**

परंडा तालुक्यातील इनगोदा येथील विश्वास जगताप यांचे वडील मजुर सोसायटीचे आध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते विश्वंभर श्रीरंग जगताप (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने पुणे येथील डी.वाय. पाटील हॉस्पिटलमध्ये उपचारा दरम्यान निधन झाले.



त्यांच्यावर इनगोदा येथील त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांना दुःखातून सावरण्यासाठी जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांनी विश्वास जगताप यांच्या इनगोंदा येथील राहत्या घरी भेट देऊन त्यांचे सांत्वन केले व आम्ही तुमच्या दुःखात सहभागी असल्याच्या भावना व्यक्त केल्या. यावेळी शिंदे गटाचे शिवसैनिक उपस्थित होते.



## ▶▶संक्षिप्त वृत्त...



### डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या वतीने जवळा येथे आरोग्य शिबिर

**परंडा, दि.२६ सप्टेंबर -**

जवळा (नि, ता. परंडा) येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे सरचिटणीस डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या वतीने 'जागर आरोग्याचा' या संकल्पनेतून जवळा गाव व परिसरातील जवळपास ९०० गरजू नागरिकांनी आयोजित केलेल्या आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. यामध्ये मोफत डोळे तपासणी, गरजूंना मोफत चष्मे वाटप, औषधे उपचार तसेच फिजियोथेरपी अंतर्गत सर्व आजाराचे निवारण या आरोग्य शिबिरामध्ये करण्यात आले. यावेळी डॉ. प्रतापसिंह पाटील, हनुमंत कातुरे, अशोक गवारे, कुंडलिक गवारे, बालाजी गवारे, ज्ञानेश्वर गवारे, अश्रू कातुरे, दादासाहेब गवारे, अक्षय गवारे, शंकर टारकर, सुरज गवारे, ज्ञानेश्वर गवारे तसेच जवळा पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते.



### श्री साई श्रध्दा एज्युकेशनच्या वतीने मुस्कान पठाणचा सत्कार

**धाराशिव, दि.२६ सप्टेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील वाणेगावची मुस्कान पठाणचा धाराशिवच्या शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयात पहिल्याच फेरीत प्रवेश मिळाल्याबद्दल श्री साई श्रध्दा एज्युकेशनचे संचालक प्रा. सोमनाथ लांडगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मुस्कान पठाण ही मुलगी सामान्य कुटुंबातील असून तीने यशवंतराव चव्हाण कॉलेज सातारा येथे बारावी विज्ञान ७५ टक्के गुण घेऊन चांगल्या गुणाने उत्तीर्ण झाली. तीने नीट परीक्षेची तयारी स्वतःची चांगल्या पद्धतीने अभ्यास करून व वारंवार परीक्षा अर्थात टेस्ट देऊन केली. तीला नीट परिक्षेत ५७६ गुण मिळाले आहेत. यावेळी तिची आई शावर पठाण, जावेद पठाण, मुहिद्दिन पठाण व श्री साई श्रध्दा मुलींच्या वस्तीगृहाच्या संचालिका उषा लांडगे उपस्थित होत्या. मुस्कान पठाणच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.




### कै. कुलकर्णी यांच्या स्मृतीनिमित्त मतिमंद विद्यार्थ्यांना खाऊ वाटप

**कळंब, दि.२६ सप्टेंबर -**

अखिल भारतीय साने गुरुजी कथा मालेचे जिल्हाध्यक्ष सेवा निवृत्त मुख्याध्यापक डी.के. कुलकर्णी यांनी वडील कमलकरराव कुलकर्णी स्मृती निमित्त सोजर मतिमंद विद्यालय कळंब येथील मतिमंद विद्यार्थ्यांना केळी, बिस्किट वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष हभप. महादेव महाराज अडसूळ हे होते. तर प्रमुख उपस्थिती कुलकर्णी परिवारातील डि.के. कुलकर्णी, जयंत कुलकर्णी, डॉ. गिरीष कुलकर्णी, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश टेकाळे, प्रकाश भडंगे, जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष लक्ष्मण मोहिते, माधवसिंग राजपूत, भाजपचे मकरंद पाटील, बंडू, सोपान पवार, प्रदीप यादव, बाळासाहेब यादव यांची उपस्थिती होती.

### शिवानंद धुमाळ यांचे निधन

**कळंब, दि.२६ सप्टेंबर -**



कळंब तालुक्यातील हासेगाव (केज) येथील इंजिनियर शिवानंद महालिंग धुमाळ (वय ४२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्याने आठ महिन्यापूर्वी त्यांच्या वडिलांनी एक किडनी दिली होती. पण अचानक त्यांची प्राण ज्योत दि.२४ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ११ वाजता मालवली. त्यांच्या पश्चात आई-वडील, एक मुलगा, मुलगी पत्नी, दोन भाऊ, दोन भाऊजया असा परिवार आहे.

### बाळासाहेब चव्हाण यांचे निधन

**धाराशिव, दि.२६ सप्टेंबर -**



शहरातील उंबरे कोठावरील निवासी व कोर्टा शेजारी समर्थनगर भागातील झेरॉक्स कॉम्प्युटरचे व्यवसायिक बाळासाहेब उर्फ महादेव लक्ष्मण चव्हाण (वय ४२) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने बुधवार दि.२५ सप्टेंबर रोजी सकाळी जिममध्ये व्यायाम करताना निधन झाले. त्यांच्यावर औसा तालुक्यातील एकंबी तांडा येथे दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. बाळासाहेब चव्हाण यांच्या मागे आई, वडील, बहीण, भाऊ, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, पुतने असा परिवार आहे.

## शेतामध्ये सोयाबीन काढून ठेवल असेल, पाऊस झाला तर असा मिळवा अतिरिक्त विमा

### जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने यांची प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ सप्टेंबर -**

धाराशिव जिल्ह्यामध्ये सरासरी ६०३ मि.मि. पाऊस पडतो. आज दिनांक २६ सप्टेंबर अखेर ७२४ मि.मि पाऊस झालेला आहे. म्हणजेच सरारीच्या १२५ टक्के पाऊस झालेला आहे. जिल्ह्यात एकुण ५७ महसूल मंडळे असून त्यापैकी जवळपास २५ महसूल मंडळात अतिवृष्टी झालेली आहे. शेतामध्ये सोयाबीन काढून ठेवलेले असेल व पाऊस झाला तर अतिरिक्त विमा मदत मिळण्यासाठी पूर्वसूचना देण्याची कार्यपद्धतीची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने यांनी दिली आहे.

या अनुषंगाने शेतकऱ्यांना मार्फत विमा कंपनीला शेतीपिकांचे नुकसान झाले म्हणून पूर्वसुचना (तक्रारी) देत असतो.

यामध्ये बरेच शेतकरी पूर्वसुचना देताना चूक करतात व बऱ्याच शेतकऱ्याकडून nimal ttack, nimal infestation, Deficit Rainfall, Diseases, Drought, Pest ttack, Prolonged Dry Spells, Storm असे पर्याय निवडून पूर्वसुचना दिली जाते. आपल्याकडे सध्या पाऊस चालू आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी Heavy Rainfall, Excess Rainfall किंवा Inundation यापैकी एक पर्याय निवडून पूर्वसुचना दिली तर ती तक्रार ग्राह्य धरली जाईल.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे आत्ता बरेच शेतकरी Cut Spread हा पर्याय निवडून पूर्वसुचना देत आहेत. अशा सर्व पूर्वसुचना ह्या स्थानिक आपत्तीमध्ये गाह्य धरली जाते. धाराशिव जिल्ह्याचा काढणीचा कालावधी हा दि.१ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर असा असून १ ऑक्टोबर पूर्वी ज्या शेतकाऱ्यांनी Cut Spread हा पर्याय निवडून पूर्वसुचना दिलेली आहे अशा पूर्व सुचना ह्या स्थानिक आपत्तीमध्ये ग्राह्य धरल्या जातील. परंतु ज्या शेतकऱ्यांचे सोयाबीन १ ऑक्टोबर नंतर शेतात राहील व पाऊस पडला तर त्या शेतकऱ्यांना सुध्दा परत एकदा पूर्वसुचना देण्याची संधी आहे.



पूर्वसुचना देताना सोयाबीन साठी Cut Spread हा पर्याय निवडून पूर्वसुचना दिल्या तर त्या पूर्वसुचना काढणी पश्चात आपत्तीमध्ये ग्राह्य धरल्या जातील. काढणी पश्चात आपत्तीमध्ये पूर्वसुचना दिली तर स्थानिक आपत्तीमध्ये जी विमा भरपाई मिळणार आहे. त्याच्या व्यतिरीक्त हि विमा भरपाई मिळणार आहे.

त्यामुळे शेतकरी बांधवांना विनंती आहे की, आपल्याकडे १ ऑक्टोबर नंतर जर पाऊस झाला तर काढणी पश्चात आपत्तीमध्ये वेगळी पूर्वसूचना देऊ शकतो याची सर्व शेतकरी बांधवांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी रविंद्र माने केले आहे.

## तुळजापूर विधानसभा मतदार संघातून भाजपने उमेदवारी द्यावी

### अॅड. व्यंकट गुंड यांची भाजपा पक्षश्रेष्ठीकडे मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ सप्टेंबर -**

तुळजापूर विधानसभा मतदार संघातून यावेळी विधानसभेला आपल्याला संधी मिळावी अशी विनंती आपण भाजपच्या प्रदेशाध्यक्षांकडे केली असून या मतदार संघातील शंभर गावांचा आपला संपर्क दौरा पूर्ण झाला आहे. विकासाचे व्हिजन असलेल्या आणि रूपामाता परिवाराच्या माध्यमातून दूध, ऊस आणि बँकिंग क्षेत्रात काम केलेल्या आपल्यासारख्या कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या परंतु भाजपमध्ये अनेक वर्ष काम केलेल्या कार्यकर्त्याला विधानसभेला भाजपाने संधी द्यावी, अशी मागणी प्रदेश कार्यकारिणी सदस्य अॅड. व्यंकटराव गुंड यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

या पत्रकार परिषदेला सुधाकरराव गुंड गुरुजी तसेच बाबुराव पुजारी हे उपस्थित होते. यावेळी बोलताना अॅड. व्यंकट गुंड पुढे म्हणाले की, धाराशिव जिल्ह्यातील सहकार क्षेत्र प्रस्थापित पुढाऱ्यांनी देशोधडीला लावले असून जिल्ह्यातील मध्यवर्ती सहकारी बँक दूध संघ यांची दुरावस्था केली आहे. दूध संघाच्या जागा विकून टाकले आहेत. शेतकऱ्यांची आर्थिक नाडी समजली जाणारी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक डबघाईला आणली आहे.

#### तुळजापूर मतदार संघाचा अपेक्षित विकास झाला नाही...

तुळजापूर मतदार संघातून भाजपचे विद्यमान आ. राणाजगजितसिंह पाटील यांना आपण कळंब विधानसभा मतदार संघातून यावेळी विधानसभा लढवण्याचा सल्ला दिला असून यावर त्यांनी योग्य वेळी निर्णय घेऊ आपण बोलू असे सांगितल्याचे अॅड. गुंड म्हणाले. कृष्णच पाणी आणतो, विकास करतो अशी भाषा ऐकलेल्या मतदारांनी पाच वर्षात वेगळे पाहिले नाही, मतदार संघाचा कसलाच अपेक्षित विकास झाला नाही असे म्हणून अॅड. गुंड यांनी आ. राणाजगजितसिंह पाटील यांचे नाव न घेता त्यांच्यावर अप्रत्यक्ष टीका या पत्रकार परिषदेत केली.



तेरणा आणि तुळजाभवानी हे दोन्ही साखर कारखाने अन्य व्यावसायिकांना चालवायला दिले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील प्रस्थापित पुढाऱ्यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या सुशिक्षित बेरोजगार तरुणाईला हाताला रोजगार शोधण्यासाठी पुणे मुंबईकडे जाण्याची परिस्थिती निर्माण केली आहे.

याउलट रूपामाता परिवाराने जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी रुपामाता दूध उद्योग, रुपामाता मल्टीस्टेट आणि रुपामाता शुगर उद्योग या माध्यमातून जिल्ह्यातील सहकार क्षेत्र पुन्हा जिवंत करण्याचा प्रयत्न केला आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतीसोबतच दुधाच्या व्यवसायातून आणि उसाचा चांगला भाव देऊन आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी रूपामाता मल्टीस्टेटच्या माध्यमातून प्रयत्न केले आहेत.

कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना आपण बँकिंग, दूध आणि शुगर इंडस्ट्रीच्या माध्यमातून हजारो तरुणांना रोजगार देऊन मतदार संघाचा कायापालट करण्यासाठी प्रयत्न सुरू केले असून आगामी काळात आपल्याला विधानसभेला संधी मिळाल्यास जिल्ह्याचा औद्योगिक विकास, यासह जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्ते सुधारणा यावर काम करण्यात असल्याचा मनोदयही अॅड. गुंड यांनी यावेळी बोलून दाखवला.

आपल्याला भारतीय जनता पार्टीने उमेदवारी द्यावी अन्यथा आपण अन्य पर्यायांचा विचार करू, असे वक्तव्य ही अॅड. गुंड यांनी यावेळी केले.

## सर्वसामान्य जनतेच्या आग्रहास्तव निवडणूक लढविणार : कैलास शिंदे



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२६ सप्टेंबर**

सर्वसामान्य जनतेच्या आग्रहास्तव मी निवडणूक लढविणार असून उमरगा विधानसभेसाठी मी इच्छुक आहे असे कैलास शिंदे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी पुढे बोलताना सांगितले की, तालुक्यात मागील २५-३० वर्षांपासून समाजकारण व राजकारणात सक्रिय सहभाग असून मी ९० टक्के समाजकारण व १० टक्के राजकारण करून सामाजिक हित जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. एक वेळेस विधानसभा निवडणूकही लढवली होती. मात्र कार्यकर्ते, समर्थक व जनतेच्या आग्रहाखातर उमरगा-लोहारा विधानसभेची निवडणूक भाजप पक्षा कढुन लढवण्यास इच्छुक आहे. उमरगा-लोहारा विधानसभा मतदार संघात मोठ्या प्रमाणात समस्या आहेत. प्रत्येक गावात स्वच्छ पाणी पुरवठा होत नाही, शेतकरी यांना दिवसा विज मिळत नाही, कामगारांच्या हाताला कामे नाहीत, चौरस्ता येथील एमआयडीसी मध्ये नवनवीन उद्योग धंदे येत नाहीत. त्यामुळे रोजगार निर्मिती झाली नाही. उद्योग धंदे निर्माण करून बेरोजगार युवकांना संधी उपलब्ध करून देणार, उमरगा येथे रेल्वे आलेली नाही त्याकडे विशेष लक्ष देऊन रेल्वे आणणार त्यामुळे दळणवळणास चालना मिळते. उमरगा शहराचा म्हणावे तसा विकास झालेला नाही. शहर स्वच्छ नाही ते स्वच्छ करून लोहारा शहरात पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणार, पुणे, मुंबई, लातूर सारखे स्मार्ट शहरे बनविण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेणार आहे.

पक्षातील माझ्या वरिष्ठ नेत्यांना उमरगा मतदार संघातून उमेदवारीची मागणी करणार आहे. विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने संधी दिली तरच निवडणूक लढविणार आहे, असे शिंदे यांनी यावेळी सांगितले.

## मतदारांचा मिळणारा प्रतिसाद पाहून माझ्या भाजप प्रवेशाच्या अफवा : मधुकर चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ सप्टेंबर**

माझा भाजप प्रवेश ही अफवा असुन मला जनतेचा मिळालेला प्रतिसाद पाहुन माजी प्रतिमा मलीन करण्याचा हा प्रयत्न आहे, असे माजी आ. मधुकर चव्हाण यांनी बुधवार दि.२५ रोजी शासकय विश्रामधाम येथे पत्रकार परिषद घेवुन केले.



यावेळी बोलताना चव्हाण पुढे म्हणाले कि, मी काँग्रेसचा तुळजापूर विधानसभेसाठी इच्छुक उमेदवार आहे. मी केलेल्या विकासकामांचा जोरावर मतदारांन समोर जाणार आहे. मी २१ टीएमसी पाणी आणण्यासाठी प्रयत्न केले. आता किती आले हे पहा मी दूरदृष्टी ठेवुन विकास कामे केल्याने त्याचा लाभ तालुक्यातील जनतेला होत आहे. बॅनर लावून, जाहीरात करुन विकास होत नसतो, असे यावेळी म्हणाले.

मी कुणावर आरोप करणार नाही. मी जनता व अधिकारी वर्गाशी चर्चा करुन विकास कामे करीत होतो. त्यामुळे विकास करताना संघर्ष वातावरण निर्माण झाले नसल्याचे शेवटी म्हणाले.

यावेळी मुकुंद डोंगरे, अभिजीत चव्हाण, शिवाजी गायकवाड, रुषीकेश मगर, अँड. ढवळे, रवि कापसे उपस्थितीत होते.

## तुळजापूर मतदार संघात महाविकास आघाडीचा झेंडा फडकणार : अॅड. पाटील

### बेंबळी येथे निष्ठावंत कार्यकर्ता मेळावा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ सप्टेंबर**

येत्या निवडणुकीत तुळजापूर मतदार संघात भाजपच्या उमेदवाराचा पराभव करून महाविकास आघाडीचा उमेदवार निश्चित विजयी होणार असा विश्वास काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अॅड. धीरज पाटील यांनी व्यक्त केला आहे.



आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने तुळजापूर मतदार संघातील धाराशिव तालुक्यातील ७२ गावातील महाविकास आघाडीच्या निष्ठावंत कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. बेंबळी येथे अतिशय उत्साहात पार पडलेल्या या मेळाव्याला हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

याप्रसंगी बोलातना कार्यकर्त्यांनी एकदिलाने कार्यरत राहावे येणारा काळ हा आपलाच असेल असा संदेश काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष विश्वासराव शिंदे यांनी बोलताना दिला. मेळाव्याला काँग्रेसचे मुख्य संघटक राजाभाऊ शेरखाने, उपाध्यक्ष प्रशांत पाटील, सतीश सोमाणी, मेहबूब पाशा पटेल, तालुकाध्यक्ष विनोद वीर, अग्निवेश शिंदे, उमेश राजेनिंबाळकर, बाळासाहेब माने, जीवन बरडे, मोईन पठाण, आयुब पठाण, सिद्धार्थ बनसोडे, धनंजय राऊत, सलमान शेख हजर होते.

यावेळी तुळजापूर मतदार संघातून निष्ठावंत कार्यकर्त्यांस संधी द्यावी अशा सूर उपस्थित कार्यकर्त्यांमधून व्यक्त करण्यात आला. सूत्रसंचालन अग्निवेश शिंदे यांनी केले तर आभार सत्तार शेख यांनी मानले.

## नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्लयातील नर-मादी धबधबा प्रवाही

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२६ सप्टेंबर**

नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्लयातील प्रेक्षनीय व नयनरम्य नर-मादी धबधबा दि.२६ सप्टेंबर रोजी प्रवाहीत झाला असुन आता किल्लयात पर्यटकांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

गेल्या वर्षी कमी पाऊस झाल्यामुळे नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्लयातील नर-मादी तसेच शिलक हे दोन्ही धबधबे सुरु झाले नव्हते त्यामुळे किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची त्यावेळी निराशा झाली होती. मात्र यावर्षी बोरी धरण पाणलोट क्षेत्रात परतीचा पाऊस चांगला झाल्याने नळदुर्ग येथील बोरी धरण दि.२५ सप्टेंबर रोजी पुर्ण क्षमतेने भरून धरणाचा सांडवा सुरु झाला होता. या सांडव्याचे पाणी पुढे बोरी नदीत जाते आणि या नदीवरील किल्लयातील शिलक आणि नर-मादी हे दोन्ही धबधबे सुरु होतात.आणि यामुळेच दि.२६ सप्टेंबर रोजी दुपारी नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्लयातील पर्यटकांचे विशेष आकर्षण असलेले शिलक आणि नर-मादी हे दोन्ही धबधबे सुरु झाले आहेत. नळदुर्गच्या किल्लयातील नर-मादी आणि शिलक हे धबधबे पुर्वीपासुन प्रसिद्ध आहेत. हे धबधबे सुरु झाल्यानंतर किल्लयात लाखो पर्यटक हजेरी लावतात. उत्तरेच्या बाजुने बोरी नदी किल्लयात वाहत येऊन तीला चंद्रकोरीचा आकार देऊन पुन्हा उत्तरेकडे वळविण्यात आली आहे. बोरी नदीच्या शेवटच्या टोकाला पुर्व-पश्चिम असा बंधारा अतिशय कल्पकतेने व भक्कमपणे बांधला आहे.

बंधाऱ्याच्या वरच्या बाजुला नदीच्या पुराचे पाणी वाहुन जावे म्हणुन दोन भले मोठे सांडवे तयार करण्यात आले आहेत. या दोन सांडव्यांनाच नर व मादी अशी नावे देण्यात आली आहेत. यालाच नर-मादी धबधबा असे म्हणतात.



नर-मादी धबधबा सुरु झाल्यानंतर धबधब्यातील पाणी १०० फुट खाली फेसाळत जाऊन आदळते. हा डोळ्याचे पारणे फेडणारा क्षण पाहण्यासाठी पर्यटक हा धबधबा सुरु होण्याची आतुरतेने वाट पाहतात.

किल्लयातील प्रेक्षनीय व नेत्रदीपक नर-मादी धबधबा सुरु झाल्याने यावर्षी पर्यटकांना नर-मादी धबधबा वाहताना पाहता येणार आहे. त्यामुळे येणाऱ्या दोन दिवसात किल्लयात पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे.

# २०४१ ची लोकसंख्या ग्राह्य धरून धाराशिव शहरासाठी तेरणा, रुईभर धरणातून पाणी आणण्यासाठी २३०.३२ कोटीस मान्यता

## मुख्यमंत्री शिंदे, पालकमंत्री प्रा.डॉ.सावंत, आ.राणाजगजितसिंह पाटील यांचे मानले आभार, शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ सप्टेंबर -**

धाराशिव शहराला लोकसंख्येच्या प्रमाणात आवश्यक असलेले पाणी उचलले जात नाही. त्यामुळे ५ ते ६ दिवसाला पाणी पुरवठा केला जातो. त्यासाठी अमृत २ योजनेंतर्गत रुईभर व तेरणा धरणातून नव्याने सन २०४१ साठी योजना करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

तेरणा १६.८२, रुईभर ८.०५ व उजणी १८.०६ एमएलडी पाणी पुरवठा करण्यासाठी २३०.३२ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता दिली आहे. त्यामुळे धाराशिव शहरास दररोज ५३.४६४ एमएलडी पाणी उपलब्ध होणार आहे. त्यासाठी केंद्र शासन ३३.३३ टक्के, महाराष्ट्र शासन ५१.६७ व स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच नगर परिषदेचा १५ टक्के असा अनुक्रमे ७६.८७ कोटी, ११९ कोटी व ३४.५५ कोटी रुपये असा एकूण २३०.३२ कोटी रुपयांच्या निधीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांनी मान्यता दिली आहे. यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा धाराशिव नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुरज साळुंके यांनी शासन दरबारी वारंवार पाठपुरावा केला होता. त्या पाठपुराव्यास यश आले असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख तथा धाराशिव नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुरज साळुंके यांनी दिली आहे. याबद्दल मुख्यमंत्री शिंदे, पालकमंत्री प्रा डॉ. सावंत व आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे साळुंके यांनी आभार मानले आहेत.

पुढे बोलताना साळुंके म्हणाले की, धाराशिव शहरास तेरणा धरण, रुईभर धरण व उजनी (भिमानगर) धरण येथून पाणी पुरवठा केला जात आहे. तेरणा धरणातून सन १९७० साली ४.८० एमएलडी क्षमतेची योजना करण्यात आली होती. तर रुईभर धरणातून सन १९८८ साली ५.८० एमएलडी क्षमतेची योजना करण्यात आली होती.



तसेच युआयडीएसएसएमटी योजनेंतर्गत उजनी धरणातून सन २०१३ साली ८ एमएलडी क्षमतेची योजना करण्यात आली. त्यानंतर सन २०२० साली अमृत योजने अंतर्गत उजनी धरणावरील योजनेत वाढीव कामे करून १६ एमएलडी क्षमता करण्यात आली. तर ही योजना राबवत असताना रुईभर व तेरणा धरणातील योजनेतून प्रत्येकी ५ एमएलडी असे १० एमएलडी क्षमता पाणी धाराशिव शहरास प्राप्त होईल असे गृहीत धरण्यात आले होते. परंतू रुईभर धरणातून येणारी पाईपलाईन एमएसची होती. तर २०१२ व २०१८ च्या दुष्काळात बंद असल्यामुळे गंजून खराब झाली. सन २०१९ पासून ती योजना, पाईपलाईन व मोटारी खराब झाल्यामुळे बंद आहे. तसेच तेरणा धरणातून १९७० साली करण्यात आलेल्या योजनेची पाईपलाईन व मोटारीच्या वारंवार दुरुस्तीमुळे त्या योजनेतून २ एमएलडी पाणी उचलले जात आहे. धाराशिव शहराची २०२४ ची लोकसंख्या अंदाजे १ लाख ४० हजार आहे. तर शहरास दररोज १८ एमएलडी पाणी उपलब्ध होत असल्यामुळे ५ ते ६ दिवसाला धाराशिव शहरास पाणी पुरवठा होत आहे. त्यासाठी अमृत २ योजनेंतर्गत रुईभर व तेरणा धरणातून नव्याने सन २०४१ साठी योजना करण्याचे प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल धुळे येथील मानवसेवा कन्सल्टंट यांच्याकडून तयार करून घेण्यात आला व त्यास छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे मुख्य अभियंता यांच्याकडून पत्र क्र.जा.क्र. मुअमजीप्राछसं/तांश-३/२४८०/२०२४ दि.२९/७/२०२४ रोजी २४३,९८,५२६०० रुपयांच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेण्यात आली असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे या योजनेस अमृत २ मधून प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून दिल्यास धाराशिव शहराची २०४१ पर्यंतच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागणार असल्याचे साळुंके यांनी सांगितले. हा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल साळुंखे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत व आमदार राणाजगजिसिंह पाटील यांचे विशेष आभार मानले आहेत.

## रितेश काळे याने पटकावला प्रादेशिक एसआयपी अबॅकस ब्रेन जिम आणि मानसिक अंकगणित स्पर्धेत द्वित्तीय क्रमांक

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२६ सप्टेंबर -**

येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरचा विद्यार्थी रितेश काळे यांनी प्रादेशिक एसआयपी अबॅकस ब्रेन जिम आणि मानसिक अंकगणित स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकावून उत्तीर्ण झाला. स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर मध्ये इयत्ता सहावी ब मध्ये शिकत असलेला विद्यार्थी रितेश हनुमंत काळे यांनी २२ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित प्रादेशिक एसआयपी अबॅकस ब्रेन जिम आणि मानसिक अंकगणित स्पर्धेत फाऊंडेशन स्तर तीन मध्ये यशस्वीरित्या भाग घेऊन द्वितीय क्रमांक ने उत्तीर्ण झाला.

रीजनल शिप अबॅकस ब्रेन जिम अँड मेंटल अर्थ मॅटिक स्पर्धा ही दरवर्षी विभाग स्तरावर घेतली जाते.

त्यामध्ये रितेश काळे यांनी घवघवीत यश संपादन केल्यामुळे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व मार्गदर्शक डॉक्टर चंद्रकांत महाजन, कार्यवाह डॉक्टर कपिल महाजन, ज्येष्ठ संचालक प्राध्यापक शिवाजीराव वडणे, राजा देशट्टी, प्रवीण अनुदुरकर, मुख्याध्यापिका सविता लोहार व सर्व शिक्षक बांधवांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

## स्वच्छता परववाडानिमित्त महारॅलीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२६ सप्टेंबर -**

५३ महाराष्ट्र, बटालियन एनसीसी लातूर यांच्यावतीने सीटीसी-२२३ कॅम्पचे आयोजन छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा (जि.धाराशिव) येथे करण्यात आले आहे. या कॅम्पअंतर्गत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरपर्यंत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता पखवाडाचे आयोजन संपूर्ण भारतामध्ये करण्यात येते. त्यानिमित्त ५३ महाराष्ट्र एनसीसी बटालियन लातूर यांच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण उमरगा शहरात महारॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीच्या सुरुवातीस कमान अधिकारी लेफ्टनंट कर्नल वाय.बी.सिंग व प्राचार्य डॉ.संजय अस्वले यांनी या रॅलीस हिरवा झेंडा दाखवून शुभेच्छा दिल्या. पुढे ही रॅली महाविद्यालयापासून शहरात मार्गस्थ झाली या रॅलीमधून स्वच्छतेबद्दल जनजागृती करण्यासाठी तयार केलेल्या फलकांचा व घोषणांचा वापर करून जनजागृती करण्यात आली. या रॅलीमध्ये ४५० एनसीसी कॅडेटने सहभाग नोंदविला. या रॅलीस सुभेदार मेजर शंभू सिंग, उपप्राचार्य डॉ.विलास इंगळे, डॉ.पद्माकर पिटले, प्रा.गुंडा मोरे, शैलेश महामुनी, नितीन कोराळे, राजकुमार सोनवणे, कॅप्टन ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले, के.डब्ल्यू. पावडे, आप्पासाहेब वाघमोडे, जाधव, अंधारे महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी सहभाग नोंदविला.

## तुळजापूर तीर्थक्षेत्र; १ हजार ९९९ कोटी रकमेचा अंतिम विकास आराखडा मान्यतेसाठी सादर : आ.राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ सप्टेंबर -**

तुळजापूर तीर्थक्षेत्राच्या वैभवात भर टाकणारा व भाविक भक्त, पुजारी व शहरवासीयांना विश्वासात घेत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणारा परिपुर्ण असा रु. १९९९ कोटींचा विकास आराखडा अंतिम करण्यात आला आहे. पालकमंत्री व मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील उचाधिकार समितीच्या मान्यतेसह या प्रस्तावास पुढील दहा दिवसात मंजुरी मिळेल असा विश्वास आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी सर्किट हाऊस तुळजापूर येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये व्यक्त केला.



आई तुळजाभवानीचे तिर्थक्षेत्र विकसीत करण्यासाठी प्राथमिक विकास आराखडा तयार करण्यात आला होता. या विकास आराखडयास १६ सप्टेंबर २०२३ रोजी छत्रपती संभाजी नगर येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत तत्वत: मान्यता देण्यात आली होती.

तदनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून आयडिया कॉम्पटिशन घेण्यात आली होती. निश्चित केलेल्या वास्तुविशारद कंपनीने आराखड्याचे सादरीकरण केल्यानंतर सदरील आराखडया मंदिर संस्थानच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करून नागरिकांच्या सुचना व हरकती मागवून घेण्यात आल्या.

दि.२० जुलै रोजी आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी शहरवासीयांसोबत बैठक घेतली. आलेल्या सुचनांवर निर्णय घेण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी यांची समिती स्थापन करण्यात आली. पुजारी, भाविक व शहरवासियांच्या सुचनांचा अभ्यास करुन योग्य आक्षेप व सुचनांचा अंतर्भाव करण्यात आला, व दि.२८ ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हाधिकारी यांनी अंतीम आराखडयाचे सादरीकरण केले.

सदरील आराखडा जिल्हाधिकारी यांनी शासनाकडे पाठविला असून पुढील १० दिवसात या प्रस्तावास मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीची मान्यता मिळेल, असा विश्वास आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे. महाद्वाराजवळच दर्शन मंडळ निश्चीत करण्यात आला असुन प्रवेश मार्ग व बाहेर जाण्याचा मार्ग देखील महाद्वारातूनच ठेवण्यात आलेला आहे.

आई तुळजाभवानी छत्रपती शिवाजी महाराजांना भवानी तलवार देतानाचे १०८ फुट उंचीच्या शिल्पाचे काम स्टेनलेस स्टील व ब्राँझ मध्ये सुप्रसिध्द वास्तुविशारद राम सुतार यांच्याकडून करुन घेण्याच्या निर्णय घेण्यात आला आहे. या आराखडयामध्ये मुख्य दर्शन मंडप व तेथील अनुषंगीक सुविधा, घाटशीळ व हडको येथे भाविक सुविधा केंद्र, शहरात व शहराच्या प्रमुख रस्त्यावरील प्रवेशद्वारावर आकर्षक कमान, वृंदावन गार्डन सारखा बाग बगीचा, वृध्द व दिव्यांगाकरिता लिफट, ट्रॅव्हलेटर या बाबींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. तसेच विकास कामांसाठी आवश्यक भुसंपादना करिता देखील निधीची तरतूद ठेवण्यात आली आहे. साधारणत: भुसंपादन, कर व इतर बाबी वगळता,प्रत्यक्षात रु.११०० कोटींची कामे यामध्ये प्रस्तावित आहेत

## महात्मा बसवेश्वर यांच्या पुर्णाकृती पुतळा उद्यान सुशोभीकरणासाठी निधीची आवश्यकता

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२६ सप्टेंबर -**

आलुर येथील महात्मा बसवेश्वर सार्वजनिक उद्यानासाठी २०२२-२३ मध्ये आमदार निधीतून सहा लाख नव्वद हजार रुपये मंजुर करण्यात आले होते त्यामध्ये फक्त कंपाऊंड व गेटचे काम झाले आहे.आता या उद्यानाच्या विकासकामांसाठी जवळपास वीस ते पंचवीस लाख रुपयांची गरज आहे. यामध्ये महात्मा बसवेश्वर यांच्या पुर्णाकृती पुतळा व उद्यान सुशोभीकरण इत्यादी बाबींचा समावेश आहे.



सध्या या नियोजित उद्यानात वीजेची सोय नाही, स्वच्छता नाही. या उद्यानामध्ये विकासकामे न झाल्याने गवत वाढुन त्याची दुरावस्था झाली आहे. तरी गावातील नागरिकांच्या व बसवशरणसंगम बहुद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने बसवेश्वर उद्यानाचे सुशोभीकरण व पुतळा बसविण्यासाठी आमदार व खासदार यांना निवेदन देण्यात आले आहे. पण आजपर्यंत निधी उपलब्ध झाला नाही. तरी लवकरात लवकर या कामासाठी निधी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. भविष्यात लवकर निधी मंजूर न झाल्यास आंदोलन करु असे गावातील नागरिक सतीश वाकडे, बसवराज पांढरे, शरणप्पा काशेट्टी यांनी सांगितले.

## माहिती अधिकाराचा गैरवापर होवू नये : अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव

### माहितीचा अधिकार प्रशिक्षण कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ सप्टेंबर -**

माहितीचा अधिकार कायदा निर्मितीपासून नागरिकांचा सन्मान होण्यास सुरुवात झाली आहे.या कायद्यामुळे जनतेला माहिती उपलब्ध होण्यास मदत झाली आहे. त्यामुळे आवश्यक ती माहिती जनतेला उपलब्ध करुन द्यावी. मात्र, माहिती अधिकारातून मागविण्यात आलेल्या माहितीचा गैरवापर होवू नये. असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव यांनी केले आहे.



यशदा पुणे आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आज २६ सप्टेंबर रोजी जिल्हा नियोजन भवन सभागृह येथे माहिती अधिकार कायदा यावर आयोजित दोन दिवशीय कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून यादव बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शोभा यादव,जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, उपजिल्हाधिकारी संतोष भोर, संतोष राऊत, उमरगा उपविभागीय अधिकारी गणेश पवार, भूम उपविभागीय अधिकारी वैशाली पाटील, धाराशिव तहसीलदार मृणाल जाधव,तुळजापूर तहसीलदार अरविंद बोळंगे,यशदा प्रशिक्षक संपत जळके व शिवाजी पवार आदी उपस्थित होते.

यादव पुढे म्हणाले की,माहितीचा अधिकार कायदयाबाबतीत कर्मचारी यांना सखोल माहिती व्हावी यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.तसेच हा कायदा जनतेला आवश्यक माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी तयार करण्यात आला आहे.समाजातील अपप्रवृत्ती या कायद्याचा गैरवापर करतांना दिसते.हा कायदा वापरताना अनेक गैरप्रकार घडतात.यासाठी कायद्यात अशा गैरप्रकारावर आळा बसविण्यासाठी दंडात्मक कारवाई होणे गरजेचे आहे. तसेच शासनाचे नुकसान करणाऱ्यांना आयोगाने काळया यादीत टाकावे. कर्मचारी पदभार घेतो तेव्हा काही कागदपत्रांच्या फाईल ह्या गहाळ असतात. त्याबाबत मागविलेली माहिती यावर कायद्यात काय तरतूद आहे तसेच कर्मचारी यांनी माहिती अधिकाराबाबत प्रभावी कामकाज करण्यासाठी मार्गदर्शन होणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. प्रशिक्षक शिवाजी पवार यांनी कर्मचाऱ्यांना माहिती अधिकाराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.तसेच संपत जळके यांनीही कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. उपस्थित कर्मचाऱ्यांचा प्रश्नांना दोन्ही प्रशिक्षकांनी उत्तरे दिली. कार्यशाळेला तहसीलदार, नायब तहसीलदार,अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच सर्व शाखा, पुरवठा कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, महसूल विभाग, नियोजन, भूसंपादन, मांजरा प्रकल्प, कार्यालयातील कर्मचारी संख्येने उपस्थिती होती.

**तहसिल कार्यालय परंडा**
**बार्शी रोड,परंडा पिनकोड-४१३५०२**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/महसुल/जन्म-मृत्यू नोंद/क्रमांक दिनांक २/०९/२०२४**

**जाहीरनामा**

व्यामधी अर्जदार मुजावर नियाजुद्दीन बशिरोद्दीन रा. परंडा ता. परंडा जि धाराशिव यांची जन्म दिनांक ०५/०८/१९५२ रोजी सौ. परंडा तालुका, परंडा जि, धाराशिव येथे झालेला असून, याबाबतची नोद नगरपरिषद कार्यालय परंडा ता. परंडा जि, धाराशिव येथे नसल्याने अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज करून स्वतः व्या जन्माची नोद अभिलेखामध्ये घेणे करीत आदेशीत करण्याबाबत विनंती अर्ज केलेला आहे.
सररहू अर्जदार मुजावर नियाजुद्दीन बशिरोद्दीन रा. परंडा ता. परंडा जि धाराशिव गाध्या जन्मनोंदी बाबत/जन्मस्थळाच्या नोदीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत लेखी स्वरूपात कळविण्यात यावी असे या जाहीरनाम्याद्वारे कळवीण्यात येते, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे अर्जात मागणी केलेनुसार विनती प्रमाणे पुरावा घेऊन आदेश पारित करण्यात येईल.
दिनांक ८/८/२०२४ रोजी सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी दिले.

**स्वाक्षरित /-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार परंडा**

**तहसिल कार्यालय परंडा**
**बार्शी रोड,परंडा पिनकोड-४१३५०२**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/महसुल/जन्म-मृत्यू नोंद/क्रमांक दि. २४/०९/२०२४**

**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार मुजावर अजिजोद्दीन बशिरोद्दीन साहेब रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांची जन्म दिनांक. १५/०३/१९५३ रोजी मौ. परंडा तालुका. परंडा जि. धाराशिव येथे झालेला असून, त्याबाबतची नोंद नगरपरिषद कार्यालय परंडा ता. परंडा जि. धाराशिव येथे नसल्याने अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज करून स्वतः च्या जन्माची नोंद अभिलेखामध्ये घेणे करीत आदेशीत करण्याबाबत विनंती अर्ज केलेला आहे.
सररहू अर्जदार मुजावर अजिजोद्दीन बशिरोद्दीन साहेब रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांच्या जन्मनोंदी बाबत/जन्मस्थळाच्या नोंदीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत लेखी स्वरूपात कळविण्यात यावी असे या जाहीरनाम्याद्वारे कळवीण्यात येते, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे अर्जात मागणी केलेनुसार विनंती प्रमाणे पुरावा घेऊन आदेश पारित करण्यात येईल.
दिनांक २५/९/२०२४ रोजी सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी दिले.

**स्वाक्षरित /-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार परंडा**

**तहसिल कार्यालय परंडा**
**बार्शी रोड,परंडा पिनकोड-४१३५०२**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/महसुल/जन्म-मृत्यू नोंद/क्रमांक-२ दि. २४/०९/२०२४**

**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार सायरा बानु सरफराज मुजावर रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांची जन्म दिनांक. २२/०५/१९६९ रोजी मौ. परंडा तालुका. परंडा जि. धाराशिव येथे झालेला असून, त्याबाबतची नोंद नगरपरिषद कार्यालय परंडा ता. परंडा जि, धाराशिव येथे नसल्याने अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज करून स्वतः व्या जन्माची नोद अभिलेखामध्ये घेणे करीत आदेशीत करण्याबाबत विनंती अर्ज केलेला आहे.
सररहू अर्जदार सायरा बानु सरफराज मुजावर रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांच्या जन्मगोंदी बाबत/जन्मस्थळाच्या नोदीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत लेखी स्वरूपात कळविण्यात याची असे या जाहीरनाम्याद्वारे कळवीण्यात येते, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे अर्जात मागणी केलेनुसार विनंती प्रमाणे पुरावा घेऊन आदेश पारित करण्यात येईल.
दिनांक २५/९/२०२४ रोजी सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी दिले.

**स्वाक्षरित /-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार परंडा**

**तहसिल कार्यालय परंडा**
**बार्शी रोड, परंडा पिनकोड-४१३५०२**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/महसुल/जन्म-मृत्यू नोंद/क्रमांक दि. २४/०९/२०२४**

**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार तसनीम बानु बशीरुद्दीन इनामदार रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांची जन्म दिनांक. ०७/०७/१९६८ रोजी मौ. परंडा तालुका. परंडा जि. धाराशिव येथे झालेला असून, त्याबाबतची नोंद नगरपरिषद कार्यालय परंडा ता. परंडा जि. धाराशिव येथे नसल्याने अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज करून स्वतः च्या जन्माची नोंद अभिलेखामध्ये घेणे करीत आदेशीत करण्याबाबत विनंती अर्ज केलेला आहे.
सररहू अर्जदार तसनीम बानु बशीरुद्दीन इनामदार रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांच्या जन्मनोंदी बाबत/जन्मस्थळाच्या नोंदीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत लेखी स्वरूपात कळविण्यात यावी असे या जाहीरनाम्याद्वारे कळवीण्यात येते, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे अर्जात मागणी केलेनुसार विनंती प्रमाणे पुरावा घेऊन आदेश पारित करण्यात येईल.
दिनांक २५/९/२०२४ रोजी सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी दिले.

**स्वाक्षरित /-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार परंडा**

**तहसिल कार्यालय परंडा**
**बार्शी रोड,परंडा पिनकोड-४१३५०२**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/महसुल/जन्म-मृत्यू नोंद/क्रमांक दिनांक २/०९/२०२४**

**जाहीरनामा**

ज्याअर्थी भाग्यश्री बाळासाहेब महाडिक यांचा जन्म दिनांक १३/७/१९७० रोजी मौ. परंडा तालूका परंडा जि. धाराशिव येथे झालेला असून त्याबाबतची नोंद नगर परिषद परंडा ता. परंडा जि. धाराशीव येथे नसल्याने भाग्यश्री बाळासाहेब महाडिक रा परंडा यांनी या कार्यालयात अर्ज करुन स्वतः चे जन्माची नोंद जन्म /मृत्यू नोंद अभिलेखामध्ये घेणे करीता आदेशीत करण्याबाबत विनंती अर्ज केलेला आहे.
सररहू भाग्यश्री बाळासाहेब महाडिक यांच्या जन्माच्या नोंदी बाबत कोणाचा आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महीन्याच्या आत या कार्यालयात हजर होवून आपली हरकत लेखी स्वरुपात कळविण्यात यावी असे या जाहीरनाम्याव्दारे कळविण्यात येते, विहीत मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे अर्जात मागणी केलेनुसार विनंती प्रमाणे पुरावा घेवून आदेश पारीत करण्यात येईल.
दिनांक ८/८/२०२४ रोजी सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी दिले.

**स्वाक्षरित /-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार परंडा**

## संक्षिप्त वृत्त



### कोतवाल संघटनेच्या काम बंद आंदोलनास सुरुवात

**चाकूर, दि.२६ सप्टेंबर**

महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटनेचे राज्यस्तरीय कामबंद आंदोलन, मंत्रालय स्तरावरील कोतवाल संवर्गास चतुर्थ श्रेणीचा दर्जा मिळावा व इतर प्रलंबित मागण्यांसाठी चाकूर तालुका कोतवाल संघटनेने तहसिल प्रशासनास निवेदन देऊन सोमवारपासून कामबंद आंदोलन सुरु केले आहे. निवेदना असे म्हटले आहे की मंत्रालय स्तरावरील कोतवाल संवर्गास चतुर्थ श्रेणीचा दर्जा व इतर प्रलंबित मागण्या पुर्ण न झाल्यास शासनाच्या विरोधात नसुन नाईलाजास्तव केवळ शासनाचे लक्ष वेधण्याच्या हेतुने जिल्हास्तरीय काम बंद, दि.२५ सप्टेंबरपासून राज्यभर कामं बंद आणि दि.२६ सप्टेंबरपासून आझाद मैदान मुंबई येथे मागण्या पूर्ण होईपर्यंत काम बंद आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनावर चाकूर तालुका कोतवाल संघटनेचे तालुकाध्यक्ष कृष्णदास देवरवाडे,उपाध्यक्ष सदानंद क्षिरसागर,सचिव दतात्रय तेलंगे, गणेश चिंतनपल्ले,नागेश तेलंगे,सुरज क्षिरसागर,कैलास राजुरे, इसामोद्दीन शेख, अफसाना पठाण,सुवर्णा गायकवाड,प्रियंका गोटमुखले,इलियास पठाण, निवृत्ती हलसे,आकाश राठोड, रघुनाथ झांबरे आदींच्या स्वाक्षरीचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले आहे.




### लातूर फार्मसी महाविद्यालयात जागतिक फार्मासिस्ट दिन साजरा

**औसा दि. २६ सप्टेंबर -**

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी येथे जागतिक औषध निर्माता दिन उत्साहात साजरा करण्यात आला.प्रकाश सर्जिकलचे संचालक प्रकाश रेड्डी यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचलिका माधुरी बावगे, प्राचार्य डा. श्रीनिवास बुमरेला उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात फार्मासिस्ट प्रतिज्ञा घेऊन करण्यात आली.संस्थाध्यक्ष भीमाशंकर बावगे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरुवात करण्यात आली. रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी विशिष्ट प्रकारचे जन प्रभोधनपर घोषवाक्य तयार करून उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला. तसेच महाविद्यालयात मधुमेह, उच्च रक्तदाब, दमा आणि बॉडी मास इंडेक्स ऑक्सीजन मोजणी, हिमोग्लोबिन यांची मोफत आरोग्य तपासणी यानिमित्ताने करण्यात आली. अशा अनेक आजारावर विद्यार्थ्यांनी घरोघरी जाऊन रुग्णांना मार्गदर्शन केले . वृक्ष लागवडीनंतर विशेष कार्य केलेल्या फॉर्मासिस्टांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रा.अतुल कदम, प्रा.माधुरी पोळकर, प्रा. शबनम शेख, प्रा.सुप्रिया जाधव. प्रा.चैतन्य पवार, प्रा अमोल मुळे आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.




### मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात समर्थ विद्यालय तृतीय

**उदगीर, दि. २६ सप्टेंबर-**

तालुक्यातील एकुर्का रोड येथील समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान टप्पा २ खाजगी शाळा गटात जिल्ह्यात तृतीय आली आहे. महाराष्ट्र शासनातर्फे राज्यभरातील खाजगी, मनपा व जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान मागच्या वर्षापासून राबविण्यात येत आहे. मागील वर्षी खाजगी शाळा गटातून उदगीर तालुक्यातून पहिला येण्याचा मान मिळाला असून ३ लाखाचे पारितोषिक मिळाले आहे. यावर्षी ही या स्पर्धेत लातूर जिल्ह्यात खाजगी शाळा गटात तृतीय क्रमांक प्राप्त झाले असून ३ लाख रूपयांचे पारितोषिक जाहीर झाले आहे. या यशाबद्दल क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री तथा परभणीचे पालक मंत्री संजय बनसोडे, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, शिक्षणाधिकारी माध्यमिक नागेश मापारी, शिक्षणाधिकारी प्राथमिक वंदना फुटाने, गटविकास अधिकारी प्रविण सुरडकर, गटशिक्षणाधिकारी शफी शेख, विस्तार अधिकारी नितीन लोहकरे, केंद्रप्रमुख आर. डी. घंटेवाड, संस्थासचिव प्राचार्य प्रमोद चौधरी, पर्यवेक्षक सिद्धार्थ बोडके, संस्थासदस्य प्रा. एम. व्ही. स्वामी, प्रा. बी. एस. बाबळसूरे, रसूल पठाण आर्दीनी अभिनंदन केले.

# उदगीरच्या दोघांचा गाणगापूरच्या नदीत बुडून मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२६ सप्टेंबर-**

गाणगापूर येथील नदी संगमात स्नानासाठी गेलेल्या दोघा सख्या भावांचा नदीत बुडून मृत्यू झाला तर डोईजोडे यांचा मुंबईचा मित्रही पाण्यात बुडाल्याने गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडली. उदगीर येथील रहिवासी व सध्या मुंबई येथे राहत असलेले सिने दिग्दर्शक व भाजपाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य ॲड. महेश डोईजोडे हे आपल्या मित्रांना सोबत घेवून कुटुंबियांसह मुंबईहून गाणगापूर येथे दर्शनासाठी गेले होते.



महेशने त्याचा भाऊ बाळासाहेब डोईजोडे यालापण उदगीरहून कुटुंबियांसह गाणगापूरला येण्यासाठी सांगितल्याप्रमाणे बाळासाहेब डोईजोडे यांनीही आपले कुटुंब घेवून उदगीरहून गाणगापूरला पोहचले होते. डोईजोडे व पाटील कुटुंबातील सर्व सदस्य बुधवारी एका लॉजवर थांबले होते. गुरुवारी सकाळी ॲड. महेश डोईजोडे (४७) व त्यांचा भाऊ बाळासाहेब डोईजोडे (४९), मुंबईचा मित्र कैलास पाटील हे तिघेजण गाणगापूरच्या भीमा-अमरजा नदी संगमात स्नानासाठी गेले असता ॲड. महेश व बाळासाहेब या दोघा भावांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला तर कैलास पाटील यांच्या तोंडात व पोटात पाणी गेल्यामुळे ते जखमी झाले आहेत. त्यांच्यावर गाणगापूरच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मयत बाळासाहेब डोईजोडे हे उदगीर येथील शेटकार इस्टेटमध्ये असलेल्या श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राची सेवा करीत होते. गाणगापूर येथे ॲड. महेश व बाळासाहेब यांच्या प्रेताची उत्तरीय तपासणी करून दोघांचेही प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले असुन दोघांही भावांवर शुक्रवारी सकाळी उदगीर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे



## 'शिवलिंगेश्वर'च्या ऋषिकेश, साक्षीला सुवर्णपदक

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. २६ सप्टेंबर-**

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठनांदेड यांच्या क्रिडा विभागातर्फे आंतर महाविद्यालयीन स्पर्धा औसा येथील आझाद महाविद्यालयाच्या मैदानावर संपन्न झाल्या. या स्पर्धेत आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत असलेल्या शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी फार्म डी महाविद्यालयातील ऋषीकेश भोसले याने पॉवर लिफटींग स्पर्धेत ६६ किलो व बेस्ट फिजीक ७० किलो वजनगटातून सुवर्ण पदक पटकावले आहे तर महिला पावर लिफटींग स्पर्धेत ४७ ते ५२ किलो गटातून साक्षी पाटील या विद्यार्थीनीने सुवर्ण पदक जिंकले आहे.

बेस्ट फिजिक ७० किलो वजनगटातून गणेश जावळेकर आणि पावर लिफ्टिंग स्पर्धेत ९३ किलो गटातून रितेश चव्हाण या विद्यार्थ्यांनी सिल्वर पदक जिंकले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक प्रा.डॉ. प्रसाद कटारे यांचा संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, सर्व संचालक मंडळ, प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

# लातुर जिल्ह्यात 'स्वच्छता ही सेवा' अंतर्गत नेहरु युवा केंद्रामार्फत उपक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २६ सप्टेंबर-**

स्वच्छता ही सेवा हा कार्यक्रम १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. लातूर जिल्ह्यातील नेहरू युवा केंद्रामार्फत स्वच्छता शपथ , नुक्कड नाटक , स्वच्छता रॅली, वाल रायटिंग, स्वच्छता अभियान संपूर्ण लातूर जिल्ह्यात राबविले जात आहे.

२५ सप्टेंबर, २०२४ रोजी लातूर नेहरू युवा केंद्र व दयानंद वाणिज्य महाविद्यालय यांच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क व गांधी चौकात स्वच्छता अभियान राबविले गेले. तसेच चाकूर व रेणापूर तालुक्यामध्ये वॉल रायटिंगच्या माध्यमातून स्वच्छतेची जनजागृती करण्यात आली. त्याच बरोबर लातूर जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये स्वच्छता जनजागृती व शपथ देण्यात आली.




२६ सप्टेंबर, २०२४ रोजी नेहरू युवा केंद्र व दयानंद कला महाविद्यालय यांच्यावतीने दयानंद महाविद्यालय ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत स्वच्छता जनजागृती रॅली काढण्यात आली. त्या कार्यक्रमात 'माय भारत' स्वयंसेवक, एनएसएस, एनसीसी, व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमात कला महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजी गायकवाड, जिल्हा युवा अधिकारी साक्षी समैय्या, उप प्राचार्य दिलीप नागरगोजे, प्रा. गोपाळ बाहेती, प्रा. जगताप,प्रियंका मोरे, प्रशांत साबणे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

## राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत लातूर टीमची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २६ सप्टेंबर-**

कालिदास स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स मुलुंड मुंबई येथे झालेल्या राज्य कराटे स्पर्धेत लातूरच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले आहे. १६ वर्षे वयोगटामध्ये आदित्य स्वामी याने कुमते या प्रकारांमध्ये तर बालाजी राठोड याने कुमिते या प्रकारात सुवर्णपदक पटकाविले. अनिकेत अंधारे याने खुल्या वयोगटात काता या प्रकारामध्ये तसेच ऋषिकेश बिराजदार याने कांस्यपदक संपादिले. या विद्यार्थ्यांना सेन्साई वैभव बजरंग अंधारे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांना पुढील स्पर्धेसाठी सिहान अनिल पाटील, सेन्साई अभिषेक पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.

## जिल्हा रुग्णालयासाठी माझं लातूर परिवार आक्रमक

**१ ऑक्टोबर २०२४ पासून आमरण उपोषण**

**तभा वृत्तसेवा ,**
**लातूर, दि. २६ सप्टेंबर-**

जिल्हा रुग्णालयाचा रखडलेला प्रश्न मार्गी लावण्यासाठी आता माझं लातूर परिवाराने आक्रमक पवित्रा घेतला असून २८ सप्टेंबर २०२४ रोजी लातूर शहरात भीक मागून निधी जमा करण्याचा तर १ ऑक्टोबर २०२४ पासून परिवारातील अनेक सदस्य आमरण उपोषणाला बसणार असा इशारा जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि मनपा आयुक्त यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून मंजूर असूनही प्रलंबित असलेला लातूर जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न मार्गी लावावा यासाठी माझं लातूर परिवाराने २ ऑक्टोबर २०२३ पासून शासनदरबारी पाठपुरावा करण्यास सुरुवात केली होती. बेमुदत साखळी उपोषण करून शासनाचे लक्ष वेधले. चक्क मंत्रालयात जाऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्यमंत्री, पालकमंत्री यांना साकडे घातले. जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना निवेदन देऊन हा प्रश्न मार्गी लावावा यासाठी विनंती केली होती.

अखेर १९ जून २०२४ रोजी राज्य सरकारने आदेश काढून कृषी महाविद्यालयाची १० एकर जागा ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये कृषी विभागास वर्ग करून ताब्यात घ्यावी असे निर्देश दिले. विशेष म्हणजे ही प्रक्रिया ६० दिवसात पुर्ण करावी असा स्पष्ट उल्लेख शासन आदेशात करण्यात आला. मात्र दुर्दैवाने ही मुदत संपून १ महिना उलटून गेला आहे. या संपूर्ण विषयाची सविस्तर माहिती वेळोवेळी पालकमंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री यांना माझं लातूर परिवाराच्या वतीने प्रत्यक्ष भेटून, निवेदन सादर करून आणि ईमेल द्वारे देण्यात आली आहे.

शासनाकडे लातूर जिल्हा रुग्णालयासाठी ३ कोटी निधी उपलब्ध नाही का? म्हणून २८ सप्टेंबर २०२४ रोजी शहरात भीक मागून निधी गोळा करण्यात येईल आणि १ ऑक्टोबर २०२४ पासून शहरातील गांधी चौक येथे परिवारातील अनेक सदस्य आमरण उपोषण करणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या आंदोलनात लातूरच्या सर्व सुजाण नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन माझं लातूर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## एम.ए. तत्त्वज्ञान विभागात सूर्यवंशी विद्यापीठात प्रथम

**बसवेश्वर महाविद्यालयाचे उज्वल यश**

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २६ सप्टेंबर-**

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय द्वारा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत घेण्यात आलेल्या पदवी आणि पदव्युत्तर उन्हाळी परीक्षा - २०२४ मध्ये उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. एम.ए. तत्त्वज्ञान विभागात साक्षी सूर्यवंशी विद्यापीठात प्रथम तर वैशाली सूर्यवंशी द्वितीय व अजय राठोड हा तृतीय आला आहे.

पदव्यूत्तर विभागातील एम. ए. तत्त्वज्ञान विभागातील साक्षी सूर्यवंशी हिने १४६३ (८६.०६%) गुण घेऊन विद्यापीठात प्रथम तर वैशाली सूर्यवंशी हिने १३९० (८१.७६%) गुण घेऊन विद्यापीठात सर्वद्वितीय आणि अजय राठोड यांनी ११०८ (६५.१८%) गुण घेऊन विद्यापीठात सर्वतृतीय येण्याचा बहुमान मिळविला आहे.

एम. ए. समाजशास्त्र विभागातील पूजा गोविंद माने हिने १२६९ (७४.६५ टक्के) गुण घेऊन विद्यापीठात सर्वद्वितीय तर हनमंते तानाजी नवनाथ याने १२६७ गुण (७४.५३ टक्के) घेऊन विद्यापीठात सर्वतृतीय येण्याचा बहुमान मिळविला आहे. समाजकार्य पदवी अभ्यासक्रम (बी. एस.डब्ल्यू.) मध्ये समाजकार्य विभागातील कांबळे पूजा साहेबराव ही ३२९५ (८६.९१ टक्के) गुण घेऊन विद्यापीठात सर्वप्रथम आली आहे तर शेख सुमेय्या दस्तगीर यांनी ३२१२ गुण (८४.५३ टक्के) घेऊन विद्यापीठात सर्व द्वितीय येण्याचा बहुमान मिळविला आहे.

या उज्वल यशाबद्दल श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसे चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे व संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. शितल येरूळे, समाजकार्य विभाग प्रमुख डॉ. दिनेश मौने, प्रा. काशिनाथ पवार यांनी अभिनंदन केले.

## पक्षाचे ध्येय धोरणे जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार

**निलंगा विधानसभा मतदारसंघात काँग्रेसची आढावा बैठक**

**तभा वृत्तसेवा ,**
**लातूर, दि. २६ सप्टेंबर-**

काँग्रेस भवन लातूर येथे माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वात तसेच लातूर जिल्ह्याचे काँग्रेस पक्ष निरीक्षक तथा कर्नाटक प्रदेश काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष ए. वसंतकुमार यांच्या उपस्थितीत आढावा बैठक झाली. तसेच याप्रसंगी काँग्रेस पक्षाचे विचार व ध्येय धोरणे, न्याय जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार या बैठकीत सर्वानुम ते करण्यात आला. तसेच लातूर जिल्ह्यासह निलंगा विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी यांच्याशी आगामी विधानसभा निवडणूकी




संदर्भात चर्चा करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अशोक शिवाजीराव पाटील निलंगेकर, प्रदेश सरचिटणीस मोईजभाई शेख, मा. आमदार त्र्यंबकनाना भिसे, प्रदेश सचिव अभय साळुंके, जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य उटगे, शहर जिल्हाध्यक्ष. ॲड. किरण जाधव, निलंग तालुका अध्यक्ष. विजयकुमार पाटील, शिरूर अनंतपाळ तालुकाध्यक्ष आबासाहेब पाटील उजेडकर, देवणी तालुका अध्यक्ष ॲड. अजितराव बेळकोणे, माजी सभापती अजित माने, महिला काँग्रेस प्रदेश सचिव उषाताई कांबळे, महिला काँग्रेस जिल्हाध्यक्ष विद्या पाटील, माजी महापौर. प्रा. स्मिता खानापुरे, ओबीसी काँग्रेस जिल्हाध्यक्ष एकनाथ पाटील आदी उपस्थित होते.

## मूलभूत नागरी सुविधेसाठी वंचितकडून निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२६ सप्टेंबर**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या सूचनेनुसार लातूर शहरातील अश्फाक कॉलनी, सम्राट अशोक नगर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर येथील मूलभूत नागरी सुविधेबाबत जिल्हाधिकारी व आयुक्त यांना वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनचे जिल्हाध्यक्ष अमोल बनसोडे व परिसरातील नागरिकांच्या वतीने निवेदन देण्यात आले.या भागात पक्के रस्ते ,आरोग्य सुविधा नसल्यामुळे येथील जनतेला मोठा त्रास सहन करावा लागत आहे.त्याचबरोबर शाळेतील विद्यार्थ्यांना चालणे मुश्किल झाले असल्याचे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

या भागातील मूलभूत नागरी समस्या न सोडवल्यास परिसरातील नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन करण्याचा इशारा वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनच्या वतीने जिल्हाध्यक्ष अमोल बनसोडे यांनी दिला आहे. यावेळी महिला शहराध्यक्ष सुजाताताई आजनीकर ,वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनचे जिल्हा उपाध्यक्ष प्रसेंजित कांबळे, जिल्हा संघटक मारुती कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष शरद देंडे ,जिल्हा महासचिव जीवन सूर्यवंशी, अंगद इसाळे अनिल लोंढे,जावेद शेख, सीमा शेख, योगेश वाघमारे , तसेच वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## मॅरेथॉनमध्ये निलंगा ग्रुपची उत्कृष्ट कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २५ सप्टेंबर-**

माथेरान येथे महाराष्ट्रातील अतिशय खडतर मार्ग असलेल्या माथेरान च्या वन विभागाच्या ट्रेल रोडवर ५ कि.मी, १० कि.मी, १२.५ कि.मी व २५ कि.मी अशा विविध कॅटेगरी असलेल्या मॅरेथॉनचे आयोजन रविवार, दि. २२ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते.

हा मार्ग संपूर्ण दगड गोटे, निसरडा रस्ता व तीव्र चढ उतार असल्याने या मॅरेथॉन मध्ये स्पर्धकांचा चांगलाच कस लागतो, म्हणूनच या मॅरेथॉनला एन्डयुरेथॉन असे म्हटले जाते.

या खडतर मॅरेथॉनमध्ये निलंगा मॅरेथॉन ग्रुप च्या ५ सदस्यांनी भाग घेतला होता. यात १० कि.मी कॅटेगरी मध्ये हरिविजय सातपुते व डॉ. सचिन जाधव यांनी सहभाग घेतला होता तसेच १२.५




कि.मी मध्ये डॉ. सचिन बसुदे व डॉ. नितीश लंबे यांनी सहभाग घेतला होता तर २५ कि.मी कॅटेगरी मध्ये गणेश एखंडे यांनी सहभाग घेतला होता. सर्व रनर्स नी विक्रमी वेळात मॅरेथॉन पूर्ण करून मेडल्स पटकावले.

लातूर
# दिनांक
**लातूर तरुण भारत**, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

## मालमत्ता करावर आकरण्यात आलेल्या व्याजामध्ये १०० टक्के सवलत

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.२६ सप्टेंबर-**

लातूर शहर महानगरपालिका, हद्दीतील मालमत्ता कराची थकबाकी मोठया प्रमाणात वसूल होणे बाकी असल्याने व मालमत्ताकर हा महानगरपालिकेच्या उत्पान्नाचा मुख्य स्त्रोत असल्याने थकीत कराच्या वसूलीसाठी मालमत्ता कराची प्रकरणे.दि २८ सप्टेंबर रोजी आयोजीत करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोक अदालत मध्ये ठेवण्यात आली आहेत. व त्यारबाबतच्या नोटीस मालमत्ता धारकांस देण्यात आल्या आहेत.

त्यानुसार लातूर शहर महानगरपालिकेमार्फत दि. २८ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतमध्ये ठेवण्यात आलेल्या प्रकरणासाठी तसेच इतर सर्व थकीत मालमत्ताधारकांसाठी थकबाकीसह एकरक्कमी कर भरणा-या करदात्यास एक आनोखी भेट म्हणून व्याजामध्ये १०० टक्के माफी देण्यात येत आहे. तरी लातूर शहर महानगरपालिका, हद्दीतील सर्व मालमत्ताधारकांनी या सूवर्णसंधीचा लाभ घेऊन आपल्याकडे देय असलेल्या कराचा भरणा वरील देण्यात आलेल्या मुदतीमध्ये करावा. जे मालमत्ताधारक थकीत कराचा भरणा करणार नाहीत अशा मालमत्तालधारकांवर थकीत कराच्या वसूलीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदीनुसार १ ऑक्टोंबरपासून कार्यवाही करण्यात येणार आहे.तरी शास्ती माफी मध्ये दिलेली १०० टक्के माफी ही शेवटची संधी राहील तरी सर्व मालमत्ताधारकांनी कर भरणा करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे, उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त



### डॉ. सोनटक्के यांना स्मार्ट ग्रंथपाल पुरस्कार

**देवणी, दि. २६ सप्टेंबर-**

सॉफ्टटेक सोल्युशन्स अँड सर्विसेस, पुणे यांच्या वतीने कोहा आणि डीस्पेस या आज्ञावलीवर दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा नुकतीच सफायर हॉटेल, लोणावळा येथे पार पडली. कार्यशाळेमध्ये महाराष्ट्रातील ४० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. यामध्ये संशोधक विद्यार्थी आणि महाविद्यालयीन ग्रंथपाल यांचा समावेश होता. प्रस्तुत कार्यशाळेमध्ये सॉफ्टटेक सोल्युशन्स अँड सर्विसेस पुणे आणि जे.एस. एंटरप्राइजेस पुणे यांच्यातर्फे दिला जाणारा स्मार्ट ग्रंथपाल पुरस्कार २०२३-२४ देवणी येथील कै. रसिका महाविद्यालयाचे ग्रंथपाल तथा उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सेवानिवृत्त सहाय्यक ग्रंथपाल डॉ.भाऊसाहेब पानगे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी सॉफ्टटेक सोल्युशन्स अँड सर्विसेसचे संचालक चेतन टाकसाळे, प्रलाद जाधव, राहुल देशमुख,डॉ. शहाजी वाघमोडे, संतोष चव्हाण, इद्रिस खान, रोहिणी टाकसाळे उपस्थित होते. डॉ. सोनटक्के यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर, सचिव गजाननजी भोपणीकर, प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.



### एनसीडीसीमार्फत मच्छिमारांना मार्गदर्शन

**लातूर, दि. २६ सप्टेंबर-**

'एनसीडीसीचे' लक्ष्मणराव इनामदार नॅशनल अ‍ॅकॅडमी फॉर को-ऑपरेटिव्ह रिसर्च अँड डेव्हलपमेंट प्रशिक्षण केंद्र आणि केंद्र शासनाच्या मत्स्य व्यवसाय विभाग, दयानंद विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मच्छीमारासाठीप्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. पंतप्रधान मत्स्य संपदा योजनेअंतर्गत आयोजित या कार्यशाळेला प्रशिक्षणादरम्यान महाराष्ट्र शासनाच्या मत्स्य व्यवसाय विभागाचे प्रादेशिक उपआयुक्त शिरीष गाताडे, सहाय्यक आयुक्त तेजस्विनी कराळे व दयानंद महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एस. एस. बेल्लाळे, पुणे राष्ट्रीय सहकारी विकास निगम उपनिदेशक सुनिल शिंदे उपस्थित होते. राष्ट्रीय सहकारी विकास निगमचे उपनिदेशक गणेश गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. मत्स्य शेतकरी उत्पादक संस्थांसाठी असलेल्या विविध योजनांसाठी प्रस्ताव तयार करण्याबाबत यासंदर्भात ठाणे जिल्हा मत्स्य व्यवसाय सहकारी संघाचे अमोल साळगावकर यांनी मार्गदर्शन केले. मच्छीमार बांधवांसाठी झालेल्या सादरीकरणांमध्ये प्रादेशिक उपआयुक्त शिरीष गाताडे यांनी मत्स्य व्यवसाय यांना किसान क्रेडिट कार्ड, अपघात गटविमा तसेच पंतप्रधान मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाच्या विविध योजनांची तपशीलवार माहिती गायकवाड यांनी दिली. यंग प्रोफेशनल आशिष सिरसाट यांनी आभार मानले.



### महाराष्ट्र फार्मसीत औषध निर्माण दिन साजरा

**निलंगा, दि. २६ सप्टेंबर-**

महाराष्ट्र फार्मसी कॉलेज आणि केमिस्ट अ‍ॅन्ड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने निलंगा येथे जागतिक औषध निर्माण दिन साजरा करण्यात आला. या विशेष प्रसंगी फार्मासिस्ट शपथ, स्वच्छता अभियान, रांगोळी स्पर्धा आणि इंडस्ट्री एक्सपर्टचे मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीमध्ये फलकाद्वारे विद्यार्थ्यांनी विविध आजार व त्या संदर्भात उपचारा संदर्भात प्रबोधन केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर, केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे जिल्हा उपाध्यक्ष ओमप्रकाश बाहेती, तालुका अध्यक्ष बालाजी थेटे, तालुका उपाध्यक्ष सोमनाथ आग्रे,अनिल धुमाळ, वीरभद्र आग्रे, हंसराज शिंदे, बाबुराव महाजन, विकास साळुंखे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भागवत पौळ, प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर पाटील, प्रा. डॉ संजय दुधमल, प्रा. डॉ. चंद्रकांत ठाकरे, प्रा. डॉ अमोल घोडके, प्रा. अविनाश मुळदकर, आणि प्रा. व्ही. एन. कारभारी, प्रा डॉ. सुनील गरड, प्रा. परवेज शेख, प्रा रविराज मोरे, प्रा विनोद उसनाळे, प्रा डॉ शरद उसनाळे, एस एन पवार, श्रीमती नंदा भालके, श्री इरशाद शेख उपस्थित होते. प्रा रामराव फड यांनी बिल्डिंग एडवर्स ड्रग रिएक्शन रिपोर्टिंग फॉर पेशंट सेफ्टी या औषध निर्माण शास्त्रातील विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. शपथविधीने औषध निर्माण शास्त्रातील तत्त्वे वाचून डॉक्टर सुनील गरड यांनी सामूहिक शपथ दिली. रांगोळी स्पर्धेत विद्यार्थ्यांनी औषधनिर्माण शास्त्राशी निगडित कलाकृती सादर केल्या. स्वच्छता अभियानांतर्गत निलंगा बस स्टॅन्ड परिसराची स्वच्छता करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या डॉक्टर अमोल घोडके, डॉक्टर सुनील गरड, इरशाद शेख यांचे सहकार्य लाभले.

## डोंगरगाव मांजरा नदीच्या बॅरेजवर धनगर, ओबीसींचे आंदोलन

### खिलारे कुटुंबीयांचे खोटे जात प्रमाणपत्र रद्द करण्याच्या मागणीला जोर

**तभा वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळा, दि. २६ सप्टेंबर-**

महाराष्ट्रातील राजकारणात आरक्षण या मुद्यावर अनेक मार्गांनी आंदोलने केली जात आहेत. यातच शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मौजे डोंगरगाव येथील मांजरा नदीच्या बॅरेजवर बहुसंख्येने धनगर समाजाचे तसेच ओबीसी समाजाचे लोक एकत्र येऊन आंदोलनात सहभागी झाले होते.

धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाच्या संबंधी व खिलारे कुटुंबीयांचे खोटे जात प्रमाणपत्र रद्द करावे या मागणीसाठी गेल्या १५ दिवसापासून समाजाच्या वतीने लातूर येथे अनिल गोयकर व चंद्रकांत हजारे, तसेच पंढरपूर येथे सहा जण व नेवासा येथे काही समाज बांधवांनी आमरण उपोषण केले व २०१३ च्या सुमारास समाजातून आरक्षण आमलबजावणीसाठी प्रचंड उठाव झाला होता.त्यावेळेस भाजपा नेत्या द्वारे २०१४ च्या मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत आरक्षणाचा निर्णय घेवू असे आश्वासन देण्यात आले होते. पण अद्याप राज्यात भाजपचेच सरकार असून देखील आजपर्यंत काहीही ठोस निर्णय न झाल्यामुळे समाज शासनावर उदासीन आहे म्हणून समाजातील तरुण उद्वेगाने जलसमाधी,रस्तारोखो व आमरण उपोषणासारखे निर्णय घेत आहेत.

घटनेमध्ये धनगर जात ही एसटी मध्येच नोंदली गेली आहे पण लिहत असताना धनगड असे झाल्याने आजपर्यंत धनगर समाजाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तरतूद केलेल्या सवलतीपासून समाज आजपर्यंत वंचित राहिला.दि.२३ रोजी मंत्री मंडळाच्या बैठकीत काहीतरी ठोस निर्णय होईल अशी आशा होती.पण बैठक संपन्न होवून देखील आमच्या मागण्याचा किंवा उपोषणकर्त्याच्या प्रकृतिचा शासनाने कसलाही विचार न केल्यामुळे समाजातील तरुणाच्या भावणेचा उद्रेक होवून डोंगरगाव येथील महेश ज्ञानोबा भिंगोले व उजेड येथील तुकाराम जीवन काळे यांनी जलसमाधी घेण्याचा निर्णय घेतला. परंतु एनडीआरएफच्या जवानाचा प्रचंड बंदोबस्त असल्याने तरुणांना बॅरेज वर जाता अले नाही त्या कारणाने बॅरेज च्या खालील बाजूस जलसमाधी घेण्याचा प्रयत्न प्रशासनाने हणून पडला व आमची मागणी शासनाकडे पाठवू असा शब्द प्रशासनाकडून देवून तरुणास जलसमाधी पासून प्रवृत्त केले.यावेळी परिसरातील बहुसंख्य समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यात प्रामुख्याने



वैशंपायन जागले, पंडित लवटे, किशन भोजने, कामगुंडा, रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा ओबीसी नेते शिवाजीराव पेठे, नागनाथ बोडके, जयद्रथ शेंडगे,नरसिंग शेंडगे, शिवाजी हजारे, हणमंत गायकवाड, माधव कात्रे, दुष्यंत काळे, गुरुलिंग स्वामी, बालाजी लव्हे, राहुल मेहकरे, बळवंत वाघमारे, सतीश कोरे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी अनर्थ घडू नये म्हणून तहसिल कार्यालयाच्या वतीने नायब तहसीलदार लालासाहेब कांबळे, तलाठी गणेश राठोड तसेच पोलीस प्रशासनाच्यावतीने शिरूर अनंतपाळचे कर्तव्यदक्ष पोलिस निरीक्षक विठ्ठल दराडे त्यांच्या टीमसह,अग्निशमन दलाचे पथक बचाव कार्यासाठी सुसज्ज होते.



## पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २६ सप्टेंबर-**

तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून लातूर चे तुकाराम कोरे व महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. प्रदीप पाटील यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी प्रीतम कल्याणे यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवन व कार्याबद्दल मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. नागनाथ तेलंगे यांनी केले. याप्रसंगी महिला सक्षमीकरण विभागाच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थीनींना स्वसंरक्षणार्थ कराटे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी तुकाराम कोरे यांनी कराटे बाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला सक्षमीकरण विभागाचे समन्वयक डॉ.शीतल गुंजटे यांनी केले व आभार डॉ. सुचिता किडीले यांनी मानले. तसेच महाविद्यालयातील कौशल्य विकास विभागाच्या बिझनेस स्किल्स डेव्हलपमेंट केंद्रांतर्गत बी.सी.ए.द्वितीय वर्षातील दिव्या शिंदे यांनी स्वगृही तयार करून आणलेली गव्हाची खीर विक्रीस ठेवली.

प्रमुख अतिथी तुकाराम कोरे यांनी महाविद्यालयात सुरू असलेल्या विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांचे कौतुक करून समाधान व्यक्त केले. यावेळी कौशल्य विकास विभागाचे समन्वयक प्रो.मोहन बंडे, बिझनेस स्किल्स डेव्हलपमेंट केंद्राचे प्रभारी डॉ. सचिन हंचाटे, डॉ. विकास कुलकर्णी, डॉ. सत्यशीला जोंधळे, प्रा.अंजना मुळे, प्रा. प्रज्ञा कुलकर्णी, प्रा. आकांक्षा मुळे, प्रा.अंजली कळके, विलास होटकर, राजेंद्र बेलुरे, रूपेश मोरे उपस्थित होते.

## लाडक्या बहिणीच्या मदतीसाठी महाबँक कर्मचारी संघटना सरसावल्या

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २६ सप्टेंबर-**

महाराष्ट्र राज्य सरकारने गोरगरीब महिलांसाठी लाडकी बहीण योजना जाहीर केली त्या योजनेचा लाभ घेण्यासाठी बँक खाते असणे आवश्यक आहे म्हणून बँकांमधून महिलांची खूप जास्त गर्दी वाढली. बँकांची दैनंदिन कामे आणि अचानकपणाने होणारी महिलांची गर्दी यामुळे बँकांवर प्रचंड ताण वाढला परिणामी ग्राहक आणि बँक कमर्चारी यांच्यातील ताणतणाव वाढू लागले काही ठिकाणी तर बँकेच्या कमर्चाऱ्यांना मारहाण करण्याचा प्रयत्न झाला.

कामाचा ताण अचानक वाढला परंतु बँकेचा स्टाफ हा अचानक वाढवता येत नसल्यामुळे आहे त्या स्टाफ मध्ये ग्राहकांना सेवा देण्याचे काम सुरू होते परंतु कितीही प्रयत्न केले तरी दिलेल्या वेळेमध्ये ते काम पूर्ण होणे शक्य नव्हते म्हणून IBE आणि IBO शी संलग्न असलेल्या बँक कर्मचारी आणि अधिकारी संघटना यांनी एकत्रित येऊन बँक व्यवस्थापनास सुट्टीच्या दिवशी बँकेत जाऊन कामे करू त्यासाठी बँक व्यवस्थापनाने सहकार्य करावे, अशी विनंती केली आणि ही शिल्लक कामे करून लाडकी बहीण योजेने संदर्भातील उघडावयाचे खाते असोत किंवा आधार, रिपे खात्याला जोडणे, त्याप्रमाणे बँकेच्या रेकॉर्ड वर त्याची (के वाय सी) नोंद घेणे यासाठी पुढाकार घेऊन कसल्याही प्रकारचा मोबदला न घेता सुट्टीच्या दिवशी आपापल्या शाखांमध्ये जाऊन बँक ऑफ महाराष्ट्र्च्या संघटनेच्या कमर्चारी व अधिकारी यांनी काम केले.

संघटनेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेबद्दल बोलताना कॉ. उत्तम होळीकर म्हणाले बँकिंग सेवा हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार असला पाहिजे ही बँक कर्मचारी संघटनेची मागणी आहे आणि म्हणून राष्ट्रीयकृत बँका या फक्त श्रीमंत लोकांसाठीच नाही तर गोरगरीब जनतेसाठी सुद्धा सदैव तत्परतेने काम करत असतात आणि त्याचाच एक भाग म्हणून गोरगरीब महिला लाभार्थ्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारच्या वतीने सुरू केलेली लाडकी बहीण योजना या योजनेपासून कोणीही वंचित राहू नये या योजनेचा सर्वांना वेळेत लाभ मिळावा म्हणून आम्ही बँक ऑफ महाराष्ट्रच्या ९० व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आमच्या संघटनेच्या सभासदांना सुट्टीच्या दिवशी कसल्याही प्रकारचा मोबदला न घेता बँकेमध्ये जाऊन लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांची शिल्लक असलेली उघडावयाची खाते उघडणे, त्यांच्या असलेल्या खात्याचे रिकेवायसीसी-केवायसी करणे अशा प्रकारचे कामे करण्यासाठी आवाहन केले. त्या आवाहनाला आमच्या संघटनेच्या सभासदांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला म्हणून दिनांक १४ सप्टें आणि २२ सप्टेंबर २०२४ रोजी बँकांना सुट्टी असूनही आमच्या IBE आणि IBO संघटनेच्या सभासदांनी बँक ऑफ महाराष्ट्राच्या संपूर्ण मराठवाडा विभागातील विविध शाखांमध्ये जाऊन लाडकी बहीण लाभार्थी योजनेची अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे जी संबंधित कामे अपूर्ण राहून गेली होती ती पूर्ण केली.

## महाराष्ट्र महाविद्यालयात रासेयो शिबीराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २६ सप्टेंबर-**

महाराष्ट्र महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्बोधन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बालाजी सूर्यवंशी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एन. कोलपूके उपस्थित होते.

यावेळी डॉ. सूर्यवंशी म्हणाले, महात्मा गांधींनी खेड्याकडे चला असा संदेश त्यावेळी दिला होता. यानुसार तरुण पिढीच्या मनात देश प्रेमाबरोबर सामाजिक कार्याची जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आलेली आहे. यातूनच ग्रामीण भागातील विकासाला चालना मिळाली. परंतु आज हा प्रवास उलट्या दिशेने होत आहे का? असा प्रश्न उपस्थित करून त्यांनी खंत व्यक्त केली. महात्मा गांधींचे विचार खेड्यापर्यंत पोहोचविण्यासाठी काहीतरी योजना असणे आवश्यक आहे. या विचारातून २४ सप्टेंबर १९६९ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना झाली. आज शेकडो विद्यापीठातून आणि हजारो महाविद्यालयातून लाखो विद्यार्थी एकत्र येऊन समाजसेवेचे काम करत आहेत. त्यामुळे जगातील एकमेव तरुणांची संघटना म्हणून याकडे पाहिले पाहिजे.अध्यक्षीय भाषण प्राचार्य डॉ. एम. एन. कोलपूके यांनी केले. या कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेतून यशस्वी झालेली आणि मुंबई पोलीसमध्ये निवड होऊन प्रशिक्षण पूर्ण करून आलेली महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनी वृंदावन घायाळ हिच्या महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्यांनी केलेल्या सत्कारातून व तिने व्यक्त केलेल्या अनुभव कथनातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या सल्लागार समितीचे सदस्य डॉ.भास्कर गायकवाड यांनी प्रेरणा गीत व रा.से.यो. गीत सादर करून विद्यार्थ्यांची मने जिंकली. प्रास्ताविक राष्ट्रीय कार्यक्रमाधिकारी डॉ. विठ्ठल सांडूर यांनी केले. या उद्बोधन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कमल गोमसाळे हिने तर आभार रा.से.यो. चे कार्यक्रमाधिकारी डॉ. सुभाष बेंजलवार यांनी मानले. यावेळी मंचावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांची उपस्थिती होती तसेच, डॉ. अजित मुळजकर, डॉ. हंसराज भोसले, प्रा. शिवरुद्र बदनाळे, प्रा. दत्ता पवार, प्रा. पूनम सातपुते, प्रा.पौर्णिमा माने ,प्रा.पृथ्वी पावडे, प्रा. सपना मोरे, प्रा. शिल्पा कांबळे यांची उपस्थिती होती.

## बालविवाह मुक्त लातुरसाठी दोन दिवसीय प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.२६ सप्टेंबर-**

जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण जास्त असून ते कमी करण्यासाठी जिल्हा प्रशासनमार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. बालविवाह मुक्त जिल्हा करण्यासाठी व त्याबाबत योग्य ते नियोजन, अंमलबजावणी व निर्णय या कृती दलामध्ये घेण्यात येतात. त्यानुसार सक्षम बालविवाह निर्मूलन कार्यक्रमांतर्गत महिला व बालविकास विभाग, युनिसेफ, एसबीसी-३ व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य, पंचायत, शिक्षण, महिला व बालकल्याण आणि जिल्हा महिला व बालविकास विभाग मधील तालुकास्तरीय तसेच क्लस्टरमधील अधिकारी व कर्मचारी अशा ७५ अधिकारी यांना दोन दिवसीय बालविवाह निमूलन चॅम्पियन्स प्रशिक्षण देण्यात आले.



प्रशिक्षणाचे उद्घाटन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख यांनी केले. यावेळी माध्यमिक शिक्षणाधिकारी एन.एस. मापारी,जिल्हा बाल संरक्षण अधिकारी धम्मानंद कांबळे, एस.बी.सी.-३ संस्थापक तथा व्यवस्थापकीय संचालक निशित कुमार, तसेच एसबीसी ३ प्रकल्प प्रमुख नंदू जाधव, वरिष्ठ प्रकल्प समन्वयक कृपाली बिडवे, विकास कांबळे, सिद्धाराम गायकवाड आणि श्रुती वाघमोडे उपस्थित होते.

प्रशिक्षणामध्ये बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५, पोक्सो कायदा २०१२, विभागनिहाय नियुक्त केलेल्या ईसीएम चॅम्पियन्स यांची भूमिका व जबाबदारी, त्यामध्ये बालविवाह निर्मूलनासाठी कार्यान्वय योजना आखून त्याप्रमाणे नियोजन करणे, साप्ताहिक देखरेखीचे अहवाल तयार करणे व त्यांचा नियमितपणे आढावा घेऊन कार्यालयास सादर करणे, बालविवाह निर्मूलन कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यांचा अहवाल नियमितपणे गुगल लिंक मध्ये भरणे, जिल्हा कृती आराखड्यासाठी सर्व विभागांचे सहाय्य व नियोजन, केलेल्या कार्यांनुसार जिल्हा कृती दल बैठकीमध्ये सादरीकरण अहवाल तयार करणे इत्यादी गोष्टींची माहिती व मार्गदर्शन प्रशिक्षणामध्ये करण्यात आले. प्रशिक्षणासाठी बालविवाह निर्मुलन जिल्हा कृतीदल सदस्य सचिव तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख, जिल्हा परिषद लातूर यांच्या मार्गदर्शनाने प्रमुख प्रशिक्षक म्हणून एसबीसी-३ संस्थापक निशित कुमार, प्रकल्प प्रमुख नंदू जाधव, वरिष्ठ प्रकल्प समन्वयक कृपाली बिडये यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले. कार्यक्रमासाठी एसबीसी-३ वरिष्ठ प्रकल्प समन्वयक विकास कांबळे आणि सिध्दाराम गायकवाड, प्रकल्प समन्वयक श्रुती वाघमोडे, कम्युनिकेशन समन्वयक रूचिका अहिरे यांनी प्रशिक्षण यशस्वितेसाठी प्रयत्न केले.